

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २०१३ । किंमत १५ रुपये






# विज्ञान नवलाई

रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं?
पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे?
जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे?
पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे?
प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का?
सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो?
त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते?
हो! हो! हो!
या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!













**अंतराळ । आपले पूर्वज । भूगोल । खगोल । पशू-पक्षी । प्राणिजगत**

## डॉ. बाळ फोंडके

**६ विषयांचं वैविध्य असणारा आगळा वेगळा संच!**

**किंमत प्रत्येकी ५० रु.**

वरील ६ पुस्तकांचा एकत्र संच घेणे आवश्यक आहे.

DIGITAL EDITION

SAVE PAPER, SAVE TREE

# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २०१३ | वर्ष तेरावे | अंक सातवा

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| दखल | १२ |
| साहित्यवार्ता | २० |
| पुरस्कार | ४८ |
| पुस्तक परिचय | ६२ |
| अभिप्राय | ८४ |
| इंग्रजी पुस्तक परिचय | ९६ |
| श्रद्धांजली | १०२ |
| बालनगरी | १०७ |

संपादक :
सुनील मेहता
कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
पल्लवी धामणे-रेखी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता
पब्लिशिंग
हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३
E-mail : info@mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १००रु. तीन वर्षांसाठी ३००रु. पाच वर्षांसाठी ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

# डिजिटल पुस्तकांची वाढती बाजारपेठ

'बार्नस अँड नोबल' ही अमेरिकेतील पुस्तकविक्री क्षेत्रातील अग्रगण्य संस्था. अमेरिकेतील निरनिराळ्या शहरात बार्नस अँड नोबलची (बी-एन) प्रशस्त ग्रंथदालने आहेत. ॲमेझॉनने किंडल ई-रीडर हे वाचनयंत्र बाजारात आणल्यावर आणि ई-बुक्सची विक्री वाढल्यावर पारंपरिक मुद्रित पुस्तकांचा खप कमी कमी होऊ लागला आणि अनेक ग्रंथदालने तोट्यात गेली. काही ग्रंथदालने बंद करावी लागली. बार्नस अँड नोबलची अडीचशेवर ग्रंथदालने असूनही विक्रीत घट झाल्यामुळे बंद करण्याची चर्चा सुरू झाली. ॲमेझॉनच्या किंडल या इलेक्ट्रॉनिक रीडरला तुल्यबळ पर्याय आपण निर्माण करायला हवा; तरच भविष्यात आपले अस्तित्व टिकून राहू शकेल अशी जाणीव बी-एनला झाली. 'नूक' नावाने हे वाचनयंत्र बी-एनने मार्केटमध्ये आणले. त्याची किंमत ॲमेझॉनच्या किंडलपेक्षा कमी ठेवून, डिजिटल पुस्तकांची किफायतशीर किंमतीत विक्री सुरू केली. किंडल किंवा नूक यावर ई-बुक्स डाऊनलोड केल्यावर ती नेहमीच्या पुस्तकाप्रमाणेच वाचता येतात. पाने मागे-पुढे करता येतात, वाचताना थांबले आणि पुन्हा वाचायला घेतले तर पुढचे नेमके पान सहजपणे समोर येते. त्यासाठी संगणकाची गरज नसते. दीर्घकाळ चालणाऱ्या बॅटरीवर हे वाचनयंत्र चालू राहते. एकावेळी तीनचार हजार पुस्तकेही त्यात राहू शकतात. आपले ग्रंथालयच जणू पुस्तकाच्या आकाराच्या या वाचनयंत्रात सामावलेले असते आणि ते प्रवासात, घरी, कार्यालयात कुठेही वाचता येते. त्यामुळे ग्रंथविक्री दालनांमध्ये पारंपरिक पुस्तकांच्या जोडीने ई-बुक्सची विक्रीही होऊ लागली आणि त्यांचा तोटा कमी झाला. ई-बुक्सची विक्री सातत्याने वाढत राहिली. पारंपरिक पुस्तकांच्या विक्रीवर त्याचा थोडा परिणाम झाला, परंतु एकूण विक्रीचे प्रमाण कायम राहिले.

तीस-चाळीस लाख पुस्तके डिजिटल स्वरूपात उपलब्ध असल्याने आणि

छापील पुस्तकांच्या तुलनेत त्यांच्या किंमती कमी आढळल्याने ग्राहकांचाही डिजिटल पुस्तकांना वाढता प्रतिसाद मिळू लागला. ई-रीडरच्या क्षमतेत वाढहोऊन त्यांचे तंत्रज्ञान अधिक सफाईदार व सोपे होत राहिले. आरंभी पाचशे डॉलर्सची मिळणारे किंडल वाचक यंत्र आता सत्तर-ऐंशी डॉलर्समध्ये मिळू शकते. नूकने तर त्याची किंमत मे महिन्यात २९ डॉलरपर्यंत खाली आणून कमालच केली. ई-रीडर घेणारे तरुण वाचक ई-बुकची सवय झाल्यावर छापील स्वरूपातील पुस्तके विकत घेत नाहीत, ई बुक्सच खरेदी करतात असेही आढळून आले आहे.

अमेरिकेत हार्डकव्हर एडिशनचे एक पुस्तक वीस-बावीस डॉलरना मिळते. त्यामुळे एकदोन पुस्तकांच्या किंमतीत 'नूक' घेण्यासाठी ग्राहकांनी गर्दी करावी यात आश्चर्य नाही. शिवाय काही ई-बुक्स वीस सेंटपासून डाऊनलोड करता येतात. काही मोफतही मिळतात. छापील पुस्तकांपेक्षा त्यांची किंमत ही कमीच असते. त्यामुळे वाचकांचा फायदा होतो. डिजिटल पुस्तकांना जागा वा कपाटे लागत नाहीत. पोस्टेज लागत नाही. वाचनयंत्र जवळ असले की कुठलेही पुस्तक माफक शुल्कात डाऊनलोड करून कुठेही वाचता येते. एकूणच हा प्रकार वाचकाभिमुख आणि फायदेशीर आहे. पुस्तक छापण्याऐवजी ई-बुक स्वरूपात वाचकांपर्यंत पोचवणे अल्प खर्चात शक्य होते.

दि ॲसोसिएशन ऑफ अमेरिकन पब्लिशर्स या संस्थेने सन २०१२ मधील पुस्तकांच्या विक्रीबाबतचा वार्षिक अहवाल मे २०१३ मध्ये प्रसिद्ध केला. त्यामध्ये म्हटले आहे की ई-बुक्सच्या विक्रीत ४३ टक्के वाढझाली, एकूण पुस्तक विक्रीमध्ये ई-बुक्सचा वाटा २० टक्के आहे. सुमारे ४५ कोटी ७० लाख ई-बुक्सची विक्री झाली. ५५ कोटी ७० लाख पारंपरिक छापील पुस्तके विकली गेली. इ.स. २००७ पासून ॲमेझॉनने किंडल रीडर हे वाचन यंत्र बाजारात आणले आणि ई बुक्सची विक्री सुरू केली. पहिल्याच वर्षी १ कोटी ई-बुक्सची विक्री झाली. ॲमेझॉनने नंतर किंडलमध्ये सुधारणा करून किंमत कमी करण्याची रणनीती ठरवून 'किंडल'च्या स्पर्धकांना शह दिला. ई-बुक्सचा खप वाढत गेला तसा पारंपरिक ग्रंथांचा खप घटू लागला. वाचक संभ्रमात पडले. पुस्तकांची दुकाने बंद पडू लागली. बॉर्डर्स, बार्न्स अँड नोबल सारख्या ग्रंथविक्री क्षेत्रातील दिग्गजांनाही त्यामुळे हादरा बसला. काही विक्रेत्यांनी दिवाळखोरी जाहीर केली. बॉर्डर्सची ग्रंथादालने बंद झाली. बार्नस अँड नोबलवर तशीच पाळी आली; परंतु सोनीच्या नूक या वाचनयंत्राचा आधार घेऊन ॲमेझॉनशी टक्कर देत, बी-एन टिकून राहिले.

अमेरिका आणि इंग्लंड या दोन देशातच आरंभी ई-बुक्सचा प्रसार वेगाने

झाला. इंग्लंड मधील वॉटरस्टोन ग्रंथदालनाची मालकी बदलली. इंग्लंडमध्ये ॲमेझॉनच्या किंडलला चांगला प्रतिसाद मिळाला. जर्मन, फ्रेंच भाषांतील उपलब्ध ई-बुक्सची संख्या सीमित राहिली. इंग्लिश ई-बुक्सची संख्या प्रचंड राहिली. जर्मनी, फ्रान्स वगैरे देशात ई-बुक्सना त्यामानाने अधिक वाव मिळाला.

जपानमध्ये कोबो या वाचनयंत्राने तरुण वर्गाला आवडणाऱ्या प्रेमकथांची मंगा बुक्स ही आता ८० टक्के ई-बुक्सच्या स्वरूपात विकली जातात. डिजिटल पुस्तकांची जपानमधील विक्री ७५ कोटी येनच्या घरात जाते. जपानमधली एकूण ग्रंथविक्री ५.२ अब्ज येनच्या पुढे होते. एक लाख डिजिटल पुस्तके उपलब्ध आहेत. किंडल, कोबो, टॅब्लेट, आयपॅड, सोनी रीडर (नूक), स्मार्टफोन याद्वारे जपानमधील तरुणवर्ग डिजिटल मंगा बुक्स वाचतो. ॲमेझॉनने जपानी भाषेत अनुवाद करणारी किंडलची नवी आवृत्ती डिसेंबर २०१२ मध्ये वितरित करण्यास आरंभ केला आहे.

चीनमधील युवायुवतींनाही प्रणयकथांचे आकर्षण आहे. शांडा लिटरेचर म्हणून ते ओळखले जाते. मोबाईलवर ह्या शांडा प्रणयकथा वाचण्याची चिनी तरुणवर्गाला चटक लागलेली आहे. ई-बुक्सच्या एकूण विक्रीत शांडाची टक्केवारी जास्त आहे. ई-बुक्स, डिजिटल बुक्स ही तरुणांना सर्वत्रच आकृष्ट करतात. पुस्तकापेक्षा स्क्रीनवरचे वाचन जास्त सोपे वाटते. एकमेकांत त्यांना आपल्या आवडीनिवडीची देवघेव करता येते. नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे वयस्क प्रौढांना जड जाते. पण तरुणांना ते सहजपणे जमते.

ई-बुक्सचा वाचकवर्ग हा त्यामुळे पुढे वाढतच जाणार आहे. छापील पारंपरिक स्वरूपातील पुस्तके हाताळण्याचीच सवय असलेली पिढी ई-रीडर किंवा टॅबलेट वापरण्यास तितकीशी तयार नसते. त्यामुळे पुढील काही वर्षे छापील पुस्तकांची मागणी ही कायम राहणार आहे. डिजिटल पुस्तकांचे मार्केट वाढत जाणार आहे. नूक सिंपल टच सारखे वाचन यंत्र २९ डॉलर्सला उपलब्ध होत आहे; त्यासाठी संगणकाचा वा इतर तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याची गरज पडत नाही; पुस्तकेही वीस सेंट एवढ्या अल्प किंमतीपासून उपलब्ध होतात. त्यामुळे त्यांची मागणीही वाढत आहे. शिवाय बरीच पुस्तके मोफतही डाऊनलोड करता येतात. नव्या पुस्तकाची खरेदीपूर्वी काही प्रकरणे मोफत वाचता येतात; त्यावरून ते पुस्तक विकत घ्यायचे की नाही हे ठरवता येते.

नूकच्या किंमतीत घट केल्याने ई-बुक्सच्या मागणीत घसघशीत वाढहोत आहे. ॲमेझॉनने जुन्या ई-बुक्सच्या विक्रीच्या संदर्भात एक पेटन्ट मिळवले आहे.

त्यामुळे ई-बुक्स घेणारा प्रत्येक खरेदीदार (ग्राहक) हा स्वत:च विक्रेताही होऊ शकेल. जुनी डिजिटल पुस्तके खरेदी करणे आणि विकणे ही प्रक्रिया अमेरिकेत कायदेशीर, वैध ठरणार आहे. जुनी वापरलेली पुस्तके व इतर वस्तू विकण्याचा अधिकार सर्वत्रच असतो. परंतु डिजिटल पुस्तकांच्या बाबतीत न्यायालयात खटले वगैरे अजून झालेले नाहीत. इ.स. २०११ मध्ये बॉस्टनच्या रेडिजि (Redigi) कंपनीने जुन्या डिजिटल संगीताच्या विक्रीला सुरुवात केली तेव्हा कॅपिटल रेकॉर्ड या न्यूयॉर्कमधील संस्थेने कॉपीराइटचा भंग केल्याबद्दल खटला भरला. रेडिजि एमपी ३ वरून क्लाउड सर्व्हरवर संगीत डिलिट करून दुसऱ्या ग्राहकाला वापरण्यासाठी विशिष्ट शुल्क आकारून उपलब्ध करून देते. आपण फक्त ओरिजिनल माल विक्रेत्याकडून ग्राहकाला ट्रान्सफर करतो; आपण त्याच्या कॉपीज् काढत नाही असा युक्तिवाद करीत ॲमेझॉनने मे २००९ मध्ये याबाबतच्या पेटंटसाठी अर्ज दाखल केला. त्याप्रमाणे पेटंटही मिळवले. त्यामुळे ॲमेझॉनला आधी विकत घेतलेल्या डिजिटल पुस्तकांची पुनर्विक्री आणि भाड्याने देणे (लेंडिंग) याबाबत एकाधिकार मिळाला आहे, असे मानले जात आहे. पेटंटमध्ये इलेक्ट्रॉनिक मार्केट प्लेस आणि जुन्या डिजिटल ऑब्जेक्टसची मालकी दुसऱ्याकडे हस्तांतरित करण्याची कार्यप्रणाली यांचा उल्लेख आहे. ॲमेझॉनने यापूर्वी १९९९ मध्ये आपल्या वन-क्लिक पेटंटच्या भंगासाठी खटला भरला होता. आपल्या या कल्पनेच्या वापराचा परवाना ॲपलला ॲमेझॉनने दिला आहे... एकूण ई-बुक्स पुस्तक विक्रीबाबतही ॲमेझॉन असाच काही प्रकार करण्याची शक्यता आहे.

ई-बुक्स आणि छापील पुस्तके या दोहोंचे सहअस्तित्व व सहजीवन तूर्त काही वर्षे तरी निर्धोक चालू राहणार आहे असेच एकूण स्पष्ट दिसते.

भारतात इंग्रजी ई-बुक्सचे मार्केट वाढत जाईल. प्रादेशिक भाषांत मात्र ई-बुक्सची उपलब्धता आणि विक्री अजून अपवादात्मकच राहील, असे आजचे वास्तव आहे. गुगलने भारतीय भाषांमध्ये डिजिटल प्रणालीचा वापर सुलभ व्हावा म्हणून संशोधन सुरू केले आहे. ही एक स्वागतार्ह बाब आहे.

आगामी




# गेटिंग थिंग्ज डन

लेखक : **डेव्हिड ॲलन**
अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

संपर्क आणि जबाबदाऱ्या वाढलेल्या आजच्या जगात आपल्यासमोरील परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी गतकालातील जुन्या सवयींचा उपयोग होत नाही. मग अशा वेळी काय करावे, कार्यतत्परता कशी साधावी आणि उत्पादकता व सर्जनशीलता कशी वाढवावी यांसाठी या पुस्तकात विविध क्लृप्त्या दिल्या आहेत. यातली सर्वांत कळीची आणि आजच्या काळातली अत्यावश्यक गोष्ट म्हणजे तणावमुक्ती!

या पुस्तकातले गृहीतक अगदी साधे आहे – उत्पादकता आणि ताणापासून मुक्त राहण्याची क्षमता, यांच्यामध्ये थेट संबंध असतो.

आपले मन मोकळे असेल आणि विचार सुसंघटित असतील, तरच आपण तणावमुक्त उत्पादकता साध्य करू शकतो आणि आपल्या सर्जनशील क्षमतांचा मुक्तपणे अविष्कार करू देऊ शकतो.

या पुस्तकातल्या साध्यासोप्या पद्धती वापरून पाहा, आणि आपल्या कामात तसेच वैयक्तिक जीवनातही नीटनेटकेपणा आणा; कार्यक्षमता आणि सर्जनशीलता वाढवा!

आगामी




# सेंड देम टू हेल

लेखक : **सेबॅस्टियन विल्यम्स**
अनुवाद : **अभिजित पेंढारकर**

'सेंड देम टू हेल' हे बँकॉकच्या कुप्रसिद्ध तुरुंग व्यवस्थेत गेली दोन दशके ज्या प्रकारचे आयुष्य परदेशी कैद्यांच्या वाट्याला आले आहे, त्याची थरकाप उडविणारी वस्तुनिष्ठ कहाणी सांगणारे इतिवृत्त आहे.

....

खून, मानवी हक्कांची विटंबना, अमली पदार्थ, ब्लॅकमेलिंग, खंडणी, क्रूर हिंसाचार, वैद्यकीय गैरप्रकार आणि मृत्युदंड देण्याचे असमर्थनीय प्रकार या बँगवँग आणि क्लोंग प्रेम तुरुंगातील नित्याच्या गोष्टी आहेत.

...

थायलंडमधील कायदेव्यवस्था ज्यावर आधारित आहे, ती कल्पनेच्याही पलीकडची अमानवी दुःस्वप्ने एका पाश्चिमात्य कैद्याच्या वाट्याला आली. त्याच्याच नजरेतून सेबॅस्टियन विल्यम्स यांनी हे धक्कादायक वास्तव या पुस्तकातून सर्वांसमोर मांडले आहे.

आगामी




# पॉपी

मूळ लेखक **ग्रेगॉर सेमन**
अनुवाद **डॉ. प्रमोद जोगळेकर**

अफगाणिस्तानात 'पॉपी'चे – अफूचे उत्पादन सर्वांत जास्त केले जाते.

अफूचा वापर मुख्यत: नशा करण्यासाठी होतो.

ऑस्ट्रेलियन पत्रकार ग्रेगॉर सेमन यांनी अफू या एकाच विषयाचा पाठपुरावा करून प्रत्यक्ष अफगाणिस्तानात आलेले अनुभव या पुस्तकात कथन केले आहेत.

जगभरात फोफावणाऱ्या दहशतवादामागे अफूचा पैसा वापरला जातो, अफूच्या

व्यवहारातून मिळणारा नफा कोणाला होतो आणि त्याची किंमत कोणाला मोजावी लागते, या प्रश्नांचा शोध घेताना सेमन यांना अफूच्या व्यवहाराशी निगडित शेतकरी, डॉक्टर, तस्कर, व्यसनी माणसं, राजकारणी, पोलीस अशी विविध माणसं भेटतात. इतकंच नाही, तर इंग्रजी पॉप गाणी आवडणारा तालिबानी कमांडरही भेटतो!

हा प्रवास एक वेगळेच जग आपल्या समोर उभे करतो, आपल्या कल्पनेपलीकडचे; पण वास्तववादी!

आगामी




# ॲन्ड देअरबाय हॅंग्ज अ टेल

मूळ लेखक **जेफ्री आर्चर**
अनुवाद- **डॉ. देवदत्त केतकर**

जेफ्री आर्चर यांना त्यांच्या जगभराच्या भ्रमंतीतून सुचलेल्या १५ गोष्टींचा हा सहावा लघुकथासंग्रह.

‘अ गुड आय’ ही गोष्ट जर्मनीत घडते. एक अमूल्य तैलचित्र एका कुटुंबात दोनशे वर्षं असतं. पण एके दिवशी...

‘मेंबर्स ओन्ली’ या खाडीतल्या बेटावरच्या एका तरुणाला नाताळच्या पोतडीत गोल्फ बॉल मिळतो, आणि त्याचं आयुष्यच बदलून जातं.

इटलीत, ‘नो रूम ॲट द इन’अशा स्थितीत हॉटेलात खोली घ्यायला गेलेला एक तरुण थेट तिथल्या रिसेप्शनिस्टच्या बिछान्यात पोचतो. इंग्लंडमध्ये तयार होणारे ‘हाय हील्स’ बुटांचे जोड सहजासहजी का जळून जाऊ शकत नाहीत, हे एक स्त्री तिच्या नवऱ्याला सांगते.

काही गोष्टींनी तुम्हाला हसू येईल... काहींनी डोळ्यांत पाणी येईल... पण त्या तुम्हाला खिळवून ठेवतील, हे नक्की.




# 'अमृतवेल' ची ५ वर्षे



सह्याद्री वाहिनीवरून दर सोमवारी रात्री साडेआठ वाजता अमृतवेल हा मराठी साहित्यविषयक कार्यक्रम रविराज गंधे गेली ५ वर्षे नियमितपणे प्रसारित करीत आहेत. साहित्यिकांच्या मुलाखतीतून त्यांच्या साहित्याची ओळख करून देण्याचा हा उपक्रम आरंभापासून लक्षवेधी ठरला. आता या कार्यक्रमात नवीन पुस्तकांचा परिचय करून देण्यास प्रारंभ केला आहे. हे परिचय रसिकांना त्या पुस्तकाचे वाचन करण्यास उद्युक्त करावेत; या दृष्टीने सादर करण्यात येतात. त्या पुस्तकातील त्रुटी किंवा मर्यादाही प्रसंगी सांगितल्या जातात; परंतु एकूण रोख असतो तो वाचन संस्कृतीच्या व्यापक अभिवृद्धीचा !

रविराज गंधे हे मूळचे नगरचे. लहानपणापासून वाचनाची गोडी लागली. कथा लेखनाचे प्रयोग सुरू झाले. सत्यकथेनेही त्यांच्या कथा प्रसिद्ध केल्या. लघुनियतकालिकाचेही त्यांनी संपादन केले. मुंबई दूरदर्शनवर नोकरी मिळाल्यावर सुहासिनी मुळगावकर, विनय आपटे यांच्याबरोबर प्रतिभा आणि प्रतिमा, शरदाचं चांदणं वगैरे कार्यक्रमांच्या निर्मितीची संधी मिळाली. टी टाइम, बॉक्स ऑफिस या दोन कार्यक्रमांची स्वतंत्रपणे आखणी करता आली. ५ वर्षापूर्वी वाचनसंस्कृतीला चालना देणाऱ्या 'अमृतवेल'ची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. संजय भुस्कुटे यांनी ती प्रायोजित केला. रसिकांनी त्याला उत्तम दाद दिली. नामवंत साहित्यिकांचा सहवास लाभला. वाचनसंस्कृती बहरली तर समाजात सामंजस्य, सुसंवाद, सहिष्णुता वाढेल अशी त्यांची धारणा आहे. त्यांच्या उपक्रमाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# काव्यदीप

गझलकार म्हणून ख्याती असलेल प्रदीप निफाडकर यांनी ‘काव्यदीप’ हे कवितेला वाहिलेले आकर्षक मासिक मे पासून सुरू केले आहे. “... असे एका साहित्यप्रकाराला वाहिलेले मासिक काढणे हा जुगारच आहे. पण कविता नावाची द्रौपदी आम्ही या जुगारात पणाला लावली ती केवळ तुमच्यासारखे रसिक श्रीकृष्ण आमच्या पाठीशी आहेत म्हणूनच. तुम्हीच तिची लाज राखाल. ...आज एकही वृत्तपत्र कविता छापत नाही. ... या कवितेला ‘काव्यदीप’ तिचे सिंहासन परत मिळवून देणार आहे. आमचे पहिले आणि शेवटचे प्रेम कविता आहे. आम्ही तिच्याशी इमानी राहू हेच सर्वप्रथम पहिल्या अंकात आपल्याला वचन देतो. ... मराठी कवितेच्या एका समृद्ध परंपरेचे आम्ही पाईक आहोत. ...गेल्या २६ वर्षांच्या पत्रकारितेतील अनुभवावर आम्ही हे निश्चितपणे सांगू शकतो की हा अंक दर्जेदार असेल. आज वॉरंटीच्या जमान्यात वाचनीयतेची आणि सर्वोत्तमाची गॅरंटी देणारे हे एकमेव मासिक आहे. ...हे मासिक बंद पडले तर केवळ आम्ही वाचकांची नस न ओळखल्याने बंद पडेल.

*करायचे करून झाले आता न काही करणे,*
*कविचेसाठी जगणे आणिक मरणे... ”*

अशी भूमिका प्रदीप निफाडकर यांनी आरंभीच स्पष्ट केली आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यविषयक बांधिलकीची कल्पना येऊ शकेल.

दुसरी बाजू (कवी विठ्ठल वाघ यांची बिलोरी शब्दचित्रे), इंग्लिशविंग्लिश (इंग्रजी साहित्याचा जनक कवी जेफ्री चॉसर) , कुतूहल (काव्यविषयक प्रश्नोत्तरे), काव्यकोडे, नवी पालवी (नव्या काव्यसंग्रहांची ओळख), कविमंडळ (आपल्या गावातील कवींचे मंडळ), देशोदेशींची राष्ट्रगीते, बंगाली मिष्टी (परभाषक कवी), माझी आवड (आपल्या प्रिय असणारी कविता), चंदेरी ठेव ( चित्रपट परीक्षण), ओळख काव्यप्रकाराची, आठवण (जन्मदिवस-स्मृतिदिन नोंद), दखल (मराठी, भारतीय, परदेशी कविता) अशी सदरे ७ इंच बाय ७ इंच अशा चौकोनी आकारातल्या आर्टपेपरवर छापलेल्या ४८ पृष्ठांमध्ये बसवण्यातील कलात्मकता दाद देण्यासारखी आहे. जाहिरातीतही कविता समाविष्ट करणारे रसिक जाहिरातदार निफाडकरांना भेटले आहेत. त्यामुळे काव्यदीपची वाटचाल निर्वेधपणे चालू रहावी अशीच काव्यप्रेमी वाचकांची अपेक्षा राहील. वार्षिक वर्गणी ६०० रुपये. ई-मेल kavyadeepmagazine@gmail.com संपर्क -२९ रिद्धी-सिद्धी संकुल, आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे ४११०५१ फोन- ९९२२१२७४९२.

# बालसाहित्याच्या विक्रीचा उच्चांक

बालसाहित्य प्रकाशित करणाऱ्या इंग्लंडमधील प्रकाशन संस्थांमध्ये पेंग्विन (विक्री-६ कोटी १० लाख पौंड), हार्पर कॉलिन्स (३ कोटी ६ लाख पौंड), हॅचेट (२ कोटी ८० लाख पौंड), रँडम हाऊस (१ कोटी ८९ लाख पौंड), असबोर्न (१ कोटी ८७ लाख पौंड), पॅन मॅकमिलन (१ कोटी ७५ लाख), एगमॉन्ट (१ कोटी ७५ लाख पौंड), वॉकर (८८ लाख पौंड), पॅरॅगॉन (७४ लाख पौंड) या पहिल्या दहा स्थानावर होत्या (२०१२). त्यातील स्कोलॅस्टिकच्या विक्रीत ८५ टक्के वाढझाली. हार्पर कॉलिन्सच्या खपात ९.५ टक्के वाढझाली. नील्सनच्या बुक स्कॅन नोंदींना आरंभ झाल्यापासून गेल्या वर्षी प्रथमच बालसाहित्याच्या विक्रीने ३१ कोटी ८० लाख पौंडाचा उच्चांक गाठला.

सर्वाधिक खप असणाऱ्या पहिल्या दहा बालसाहित्यकारांची (२०१२ मधील) नावेही नील्सन बुक स्कॅनने प्रसिद्ध केली आहेत. त्यामध्ये सातशे पुस्तके लिहिणाऱ्या एनिड ब्लायटन, नुकतेच दिवंगत झालेले रोआल्ड डाल (Roald dehl) यांचाही समावेश आहे. सुझान कॉलिन्सच्या दि हंगर गेम्स, कॅचिंग फायर, मॉकिंगजे या तीन पुस्तकांनी तेरा लाख प्रतींच्या विक्रीमुळे पहिले स्थान पटकावले आहे. इंग्लंडची बालसाहित्यातील राजकवी (पोएट लॉरेट), ज्युलिया डोनाल्डसन हिच्या झोग, रुम ऑन दि ब्रुम, द ग्रफालो, स्टिक मॅन, दि स्वेल अॅण्ड द व्हेल, मंकी पझल, दि प्रिन्सेस अॅण्ड द विझार्ड वगैरे १२ पुस्तकांच्या १२ लाख प्रतींच्या खपाने तिला दुसरा क्रमांक मिळवून दिला आहे. जेफ किनी, रिचर्ड पारसन्स, डेव्हिड विल्यम्स, जॅकेलिन विल्सन, मिशेल मोरपुर्गो, फिओना वॅट यांच्या पुस्तकांची विक्री ४५ लाख ते १ कोटी पौंडाच्या घरात गली.




## पुरस्कार आणि विक्री

हिलरी मॅन्टेल हिला वूल्फ हॉल या कादंबरीसाठी २००९ चा मानबुकर पुरस्कार मिळाला. तिचे प्रकाशन झाल्यानंतर पहिल्या सहा महिन्यात तिच्या ३० हजार प्रती विकल्या गेल्या होत्या. मानबुकर पुरस्कार जाहीर झाल्यावर एका महिन्यात या कादंबरीच्या ६ लाख प्रती विकल्या गेल्या.




| १ वर्षाची वर्गणी | तीन वर्षाची वर्गणी | पाच वर्षाची वर्गणी |
|---|---|---|
| १००/- | ३००/- | ४००/- |

'ग्रंथजगत' वाचा हवा तेव्हा आणि हवा तिथे
आणि सवलतीत पुस्तके मिळवा.

अधिक माहितीसाठी **www.mehtapublishinghouse.com**
या संकेतस्थळाला भेट द्या.

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वाचकांसाठी सुवर्णसंधी...**

पुणे आणि कोल्हापूर कार्यालयापासून ७ कि. मी. पर्यंतच्या अंतरावर कॅश ऑन डिलिव्हरीची सुविधा!

**५००/- रुपये किंवा अधिकच्या खरेदीवरील पुस्तके कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून आपल्याला घरपोच मिळू शकतात. त्यासाठी वर्गणी मनीआर्डर/डिमांड ड्राफ्टद्वारा कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. अथवा एस. बी. आयच्या खात्यातही पैसे भरता येतील.**

STATE BANK OF INDIA
SBIN0000455 A/C NO 32749992008

# ह.ल. निपुणगे- अमृतमहोत्सव



विशाखा दिवाळी अंक, गृहिणी आणि कृषीवल डायरी, पुष्पक प्रकाशन यांच्या माध्यमातून ग्रंथव्यवहाराशी संबंधित असलेले आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेत वीसपंचवीस वर्षे विविध पदांवर काम करणारे कार्यकर्ते म्हणून ह. ल. निपुणगे यांना पुण्यनगरीत ओळखले जाते. २ मे २०१३ रोजी त्यांनी पंचाहत्तरी पूर्ण केली आणि त्यानिमित्ताने आपले आत्मकथनही त्यांनी लिहून प्रसिद्ध केले आहे. वनखात्यात अधिकारी असलेल्या त्यांच्या वडिलांचे अपघाती निधन झाल्याने, कुमार वयातच दारिद्र्याचे आणि उपेक्षेचे चटके त्यांना भोगावे लागले. आईने काबाडकष्ट करून, नातलगांच्या मदतीने आपल्या दोन मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. घोडेगाव, मंचर, खंडाळा वगैरे गावी वडिलांच्या बदल्यांप्रमाणे आधीपासूनच वेगवेगळ्या गावचे पाणी त्यांना चाखायला मिळाले. पण वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या आईने पुण्यात राहण्याचा निर्णय घेतला. हरिश्चंद्रला व्ह. फा. झाल्यावर आलेपाक, गंधाच्या बाटल्या विकून तसेच वृत्तपत्रांचे वितरण करून, ऑफिसबॉय म्हणून काम करीत रात्रशाळेतून अकरावीपर्यंत मजल मारावी लागली. काही विषयात नापास झाल्याने मॅट्रिक पास ऐवजी नॉनमॅट्रिक म्हणूनच रहावे लागले.

योगायोगाने व्हीनस प्रकाशन, वोरा आणि कंपनी यामध्ये काम मिळाल्याने प्रकाशन व्यवसायाची माहिती झाली. लेखक-ग्रंथविक्रते यांच्याशी संपर्क आला आणि स्वतःची प्रकाशन संस्था काढण्याची प्रेरणा झाली. भांडवल नसल्याने कधी भागीदारीने तर कधी सावकारांकडून पठाणी व्याजाने कर्ज काढून पुस्तके काढावी लागली. ग्रंथविक्रेते, ग्रंथपाल, शाळाकॉलेजे यांच्याकडे जाऊन ते पुस्तके विकत. ह. मो. मराठे (पक्षिणी), वळणावरचं वय, साहेब, अनौरस (उद्धव शेळके), बन्सीभय्या (गो. गं. पारखी), क्रिकेटचा ज्ञानकोश (रवीन्द्र पाटकर), ज्ञानेश्वर आणि कबीर (कृ. ज्ञा. भिंगारकर), वळचणीचे पाणी (बाळ गाडगीळ), कसरत (सुशीला संकपाळ), वावटूळ (बा.ग.केसकर), पापो नावाचे प्रकरण (क. दि. सोनटक्के) वगैरे शंभरदीडशे पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. ती त्यांनी परिश्रमपूर्वक खपवलीही! पण ती फारशी गाजली नाहीत अशी खंत त्यांना आहे.

विशाखा दिवाळी अंकाने त्यांचे संपादकीय कर्तृत्व खऱ्या अर्थाने कसाला

लागले. प्रत्येक अंकासाठी नामवंत लेखकांचे वैविध्यपूर्ण लेख, परिचय, कथा, लघु कादंबऱ्या कसोशीने मिळवत. डॉ श्रीराम लागू, भालजी पेंढारकर, स्वामीकार रणजित देसाई, अमोल पालेकर, नवलमल फिरोदिया, कमलाकर सारंग, चित्रपती व्ही. शांताराम, शंतनुराव किर्लोस्कर, रत्नाकर मतकरी, ना. ग. गोरे, प्रमोद आडकर, राजा फडणीस, ग्रेस यांच्यावर खास पुरवण्या त्यांनी दिल्या. 'वळचणीचं पाणी' या बाळ गाडगीळांच्या पुस्तकावर डॉ. बोकील यांनी बदनामीचा खटला भरला. त्यालाही त्यांना तोंड द्यावे लागले.

प्रकाशन व्यवसायात एवढे कष्ट करूनही मनासारखे यश मिळाले नाही पण विशाखाने त्याची उणीव काही अंशी भरून काढली असे म्हणायला हरकत नाही.

१९९२ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कामात निपुणगे यांनी लक्ष घालायला सुरुवात केली. त्यांनी डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्या विरोधी पॅनेल तयार केले. त्यावेळी निपुणगे कार्यकारिणीवर निवडून आले; पण त्यांचे पॅनेल पडले. त्यांना वाईट वाटले.  पुढे १९९५ मध्ये त्यांच्या पॅनेलला ९ जागा मिळाल्या पण ते स्वतः पडले. संपादक म्हणून निवडून आलेल्या शंकर सारडा यांनी निपुणगे यांना स्वीकृत सभासद म्हणून कार्यकारिणीत घेण्याची कल्पना लढवली. डॉ. जोगळेकर यांना ते रुचले नाही. त्यामुळे डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी सारडा यांच्या विरोधाची भूमिका घेऊन दोन वर्षांनी शंकर सारडा यांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याची खेळी केली. ''सारडांच्या नंतर एक वर्ष निपुणगे संपादक झाले तर काय हरकत आहे?'' असे सांगून त्यांनी निपुणगे यांना संपादकपदाचे आमिष दाखवले. ''या संदर्भात मग मलाही या पदाचा मोह आवरता आला नाही. अविश्वासाच्या ठरावासाठी दोन तृतीयांश सभासद लागतात. त्याला एक सही कमी पडत होती. मी नगरला जाऊन सु. प्र. कुलकर्णी यांची सही आणली.'' असे निपुणगे यांनी प्रामाणिकपणे लिहिले आहे. त्यावेळी शंकर सारडा यांनी संपादकपदाचा राजीनामा दिला.

म.सा.प. मधील एकूणच राजकारण उबग आणणारे होते. त्याची अनेक उदाहरणे निपुणगे देतात. मसापला निपुणगे यांनी जाहिराती व देणग्या याद्वारे आठदहा लाख रुपये मिळवून दिले. व्हीनसचे पाध्ये, केशवराव कोठावळे, रा. ज. देशमुख, श्री. ग. माजगावकर, अनिल मेहता, राजीव बर्वे वगैरे प्रकाशकांच्या संदर्भातील नोंदी शेवटच्या प्रकरणात आल्या आहेत.

अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने निपुणगे आपल्या आयुष्याचे सिंहावलोकन करताना म्हणतात, ''एकंदरीत या प्रकाशन व्यवसायात नशिबाने मला कधीही हात दिला नाही. अनेक विषयांवरील, अनेक चांगल्या लेखकांची पुस्तके मी प्रकाशित केली. पण एकाही पुस्तकाच्या आवृत्त्या निघाल्या नाहीत. साहेब (उद्धव शेळके)

आणि देवाची पावले ( रवींद्र भट) ही पुस्तके चांगली खपतील असे वाटले होते. पण त्यांनीही हात दिला नाही...एक मात्र खरे की विशाखा या अंकाने मला आयुष्यात खूप सावरले. मी चांगले विषय हाताळून उत्तम दिवाळी अंक काढले. माझ्या कौशल्याने जाहिरातीही खूप मिळविल्या. एकंदरीत मी माझ्या आयुष्यात तरलो ते विशाखा दिवाळी अंकामुळे. त्याच्या जोडीला गृहिणी आणि कृषीवल डायऱ्या. एकंदरीत मला प्रकाशनापेक्षा संपादनातच अधिक रस वाटला. ते काम मी आनंदाने उत्तम प्रकारे केले. विशाखा दिवाळी अंकाला वीसाहून अधिक पुरस्कार मिळाले. एकूण विशाखाने मला खूप मानसिक समाधान दिले, असेच हे आत्मकथन लिहून पूर्ण करताना वाटत आहे.''

डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी समकालीन मराठी सारस्वताचा आत्मनिष्ठ दस्तऐवज असे म्हटले आहे. निपुणगे यांच्या संपादकीय, प्रकाशकीय आणि परिषदेतील कार्याची दखल घेण्याची संधी त्यांच्या अमृतमहोत्सवी आत्मकथनामुळे मिळत आहे. मराठीत प्रकाशकांनी लिहिलेली मोजकीच आत्मचरित्रे आहेत. त्यात निपुणगे यांनी लिहिलेल्या 'हलचल'चा उल्लेख एक प्रांजल आणि वास्तव आत्मकथन म्हणून करावा लागेल.

**-शंकर सारडा, मो. ९८२३२६१०२३**

■■■





**४ थी आवृत्ती**

# वाळूचा किल्ला

**व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : ९०/-रु. पोस्टेज : २५/-रु.**

वाळूच्या किल्ल्याचं अस्तित्व केवळ क्षणभंगूर असतं, पण एका चिमुरडीसाठी ते शाश्वत ठरविण्याची धडपड करावी लागते.... हणमंताचं वागणं हे केवळ वेडसरपणा नाही, तर ते एक क्रौर्य आहे.... अनिकेतला कळून चुकलं की, आता काही घडणार नाही; आषाढ, श्रावण, आश्विन, कार्तिक... सगळं सारखंच.... पहिलवान गड्यांनाही न जुमानणाऱ्या एका खोंडापुढे तेरा वर्षांची लिलू धिटाईनं उभी राहिली, त्या दोघांमधलं नातं खास होतं....

'वाळूच्या किल्ल्या'सारखा असणारा मानवी भावभावनांचा हा बंध...
आपल्या सजग लेखणीतून 'तात्यांनी' साकारला आहे.

१८ वी आवृत्ती




# पहिले प्रेम

## वि.स.खांडेकर

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

नाकासमोर जाणाऱ्या सरळ, साध्या माणसाच्या जीवनक्रमाचे चित्रण जसे तुम्हाला वृत्तपत्रात आढळणार नाही, तसेच ते ललितवाङ्मयातही प्रामुख्याने प्रतिबिंबित होणार नाही.

मानवी जीवनातली युद्धे, भूकंप आणि वादळे हे असल्या वाङ्मयाचे मुख्य विषय असतात. रॉबर्ट लिंडचा हा सिद्धांत निरपवाद नसला, तरी वाङ्मयातल्याच प्रीतीच्या चित्रणाच्या बाबतीत ते बव्हंशी सत्य आहे. प्रत्यक्ष आयुष्यात प्रीतीच्या मार्गावर पारिजातकाची पुष्पे पसरलेली असावीत, असे आपण म्हणत असतो. पण गमतीची गोष्ट ही, की वाङ्मयात मात्र मार्गावरल्या काट्याकुट्यांनी पदोपदी रक्तबंबाळ होणारी प्रीतीची मूर्तीच आपल्याला अधिक मनोहर वाटते; आणि शेवटी मनुष्याला जगात जो अनुभव येतो, त्यात फुलेही नसतात आणि काटेही नसतात.

सामान्य मनुष्याच्या प्रीतिमार्गावर फक्त खडे असतात. ते त्याला मधून मधून चांगलेच बोचतात. त्या दुःखाने प्रसंगी तो अगदी रडकुंडीला येतो. पण त्याच वेळी कुठून तरी येणाऱ्या शीतल वायुलहरी त्याचा शीण नाहीसा करून त्याला उल्हसित करीत असतात. तो पुन्हा शीळ घालीत पुढे चालू लागतो.



# साहित्य वार्ता

**• अमेरिकेतील स्पर्धेत सात्त्विक कर्णिकची बाजी**

भारतीय वंशाच्या १२ वर्षीय सात्त्विक कर्णिक याने अमेरिकेतील प्रतिष्ठेची भौगोलिक सामान्य ज्ञान स्पर्धा (नॅशनल जिऑग्राफिक बी कॉन्टेस्ट) जिंकली. या स्पर्धेत अंतिम फेरीत १० पैकी ८ भारतीय वंशाचे विद्यार्थी होते. या स्पर्धेत ४० लाख विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

कर्णिक याने अंतिम फेरीत सर्व पाच प्रश्नांची अचूक उत्तरे दिली. सात्त्विकचे वडील कर्नाटकमधील असून ते सॉफ्टवेअर इंजिनीअर आहेत. कोर्नाड ओबीरहूस उपविजेता ठरला. तिसरा क्रमांक भारतीय वंशाच्याच ११ वर्षीय संजीव उपालुनी याने पटकावला. बक्षीस म्हणून २५ हजार डॉलरची शिष्यवृत्ती तसेच नॅशनल जिऑग्राफिक सोसायटीचे आजीवन सदस्यत्व सात्त्विकला मिळणार आहे.

**• 'मासोळी'चे प्रकाशन**

सर्जनशीलतेचा उत्कर्षबिंदू अनुभवणे हा कलाकारांसाठी आनंदाचा ठेवा असतो, असे मत मुकुंद संगोराम यांनी कवी दिनकर चौगुले यांच्या 'मासोळी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

प्रसिद्ध तबलावादक प. अरविंदकुमार आझाद, अर्कचित्रकार नितिन निगडे या प्रसंगी उपस्थित होते. संगोराम म्हणाले, कवितालेखनासाठी शब्दप्रभुत्व आवश्यक असते. त्यामुळे सामान्य माणूस कवितेच्या वाटेला जात नाही. अभिव्यक्त होण्याची तगमग असल्याखेरीज कविता जन्माला येत नाही. विषयांचे वेगळेपण असलेल्या मासोळी संग्रहातील कवितांनी जगण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवरचे भीषण आणि सुंदर वास्तव मांडण्याचे काम केले आहे. मनातील भाव व्यक्त करण्याचे माध्यम असलेल्या कवितेतील दु:खही आनंददायी असते.

साहित्य आणि संगीत यांचा अनोखा ऋणानुबंध असल्याचे पं. अरविंदकुमार आझाद यांनी सांगितले. नितिन निगडे म्हणाले की कल्पनाविश्वाच्या सागरामध्ये

कवी स्वच्छंदपणे विहरत असतो. त्यामुळे चौगुले यांच्या कवितेला वेळेचे आणि मतमतांतराचे जाळे अपुरे पडते.

## • लंडनवारीचा योग नाही

लंडनच्या महाराष्ट्र मंडळाने विश्व मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याबाबत साहित्य महामंडळाकडे असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे टोरांटोपाठोपाठ आता साहित्यिकांची लंडनवारीही हुकली आहे. सध्या इतर एखाद्या देशाच्या निमंत्रणाची प्रतीक्षा आहे. विश्व मराठी साहित्य संमेलनाबरोबरच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी आलेल्या निमंत्रणावरही चर्चा झाली. त्यानंतर महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य म्हणाल्या, ''मराठी साहित्य संमेलनासाठी सासवड आणि पिंपरी-चिंचवड येथून निमंत्रणे आली. आयोजक संस्थांना १३ जुलैपर्यंत महामंडळाची स्थळ निवड समिती भेट देणार आहे. त्यानंतर १४ जुलैला संमेलनाचे स्थळ जाहीर होईल.''

''महामंडळाने युवा संमेलन आयोजित करावे, असे पत्र सरकारतर्फे आले आहे. या विषयावर बैठकीत चर्चा करून हे संमेलन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याबाबत महामंडळाची समिती सरकारशी चर्चा करून या संमेलनाची रूपरेषा जाहीर करेल,'' असेही डॉ. वैद्य यांनी सांगितले.

शुद्धलेखनाचे नियम अधिक सुलभ असावेत, यासाठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचा प्रकल्प हाती घेतला होता. तो सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. शिवाय, मराठी भाषा व मराठी माध्यमांच्या शाळांसमोरील प्रश्न सुटावेत, यासाठी ठिकठिकाणी चर्चासत्रे घेऊन त्यांचा अहवालही सरकारला पाठविण्यात येणार आहे. असे डॉ. वैद्य यांनी सांगितले.

## • आदर्श आई पुरस्कार

''संगीत, नृत्य या कलाप्रकारात गुरु-शिष्य परंपरा, घराणी आजही अस्तित्वात आहेत. परंतु अशी परंपरा साहित्य क्षेत्रात का नाही, याचा आपण गांभीर्याने विचार करायला हवा. या परंपरा निर्माण झाल्या तरच साहित्य अधिक बळकट होईल. पण, दुर्दैवाने साहित्यक्षेत्रात सध्या फक्त गटबाजी उरली आहे.'' अशी टीका समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी केली.

रंगत-संगत प्रतिष्ठानच्या वतीने सुमन चव्हाण यांना डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते 'आदर्श आई पुरस्कार' प्रदान करण्यात आला. कवी म. भा. चव्हाण, गजलकार प्रदीप निफाडकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद आडकर उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''कविता लिहिण्याआधी कवीच्या मनात धूसर,

गूढअनुभूती असते. कागदावर उतरवताना त्यातून ती अधिकाधिक समृद्ध होते. या आनंदासाठीच कवी कविता लिहितो. पण त्यामागे तयारी नसेल तर ती कलाकृती उत्तम होणार नाही.'' चव्हाण म्हणाले,''बाप हा निबंधाचा तर आई कवितेचा विषय आहे.''

सुमन चव्हाण म्हणाल्या , ''मी एक साधी गृहिणी आहे. घर संसार, मुले हेच माझे विश्व. आई म्हणून जे काही केले ते माझे कर्तव्यच आहे. याची दखल पुरस्काराने घेतली जाईल, असे वाटले नव्हते. पण त्याचा मनापासून आनंद आहे.''

- **गिरीश कार्नाड महोत्सव**

''मला खरे तर इंग्रजी कवी होऊन पुढे नोबेल पारितोषिकापर्यंत पाहोचायचे होते! पण वयाच्या २१व्या वर्षी महाभारत वाचता वाचता अचानक 'ययाती' लिहायला सुरुवात केली. त्या नाटकातील पात्रेच जणू मला नाटक सांगत होती आणि मी लिहून घेत होतो! असा अनुभव पुन्हा कुठल्याही नाटकाच्या वेळी आला नाही. ययाती प्रकाशित झाले आणि माझ्या जीवनाची दिशाच बदलली!''... नाटककारच व्हायचे, असे ठरवल्यानंतरचे गिरीश कार्नाड यांचे कलाजीवन त्यांच्या प्रकट मुलाखतीतून उलगडले.

''राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय' आणि 'आशय सांस्कृतिक'तर्फे आयोजित 'समग्र गिरीश कार्नाड महोत्सवा'च्या समारोपप्रसंगी सरोज देशपांडे यांनी अनुवादित केलेल्या 'वेडिंग अल्बम' आणि प्रदीप वैद्य यांनी अनुवादित केलेल्या 'उणे पुरे शहर एक' या कार्नाड यांच्या नाटकांचे प्रकाशन डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते झाले. विजया मेहता, नाट्यसमीक्षक माधव वझे, 'आशय'चे सचिव सतीश जकातदार, वीरेंद्र चित्राव, पॉप्युलर प्रकाशनाच्या अस्मिता मोहिते या वेळी उपस्थित होत्या. डॉ. सदानंद बोरसे यांनी कार्नाड यांच्याशी संवाद साधला.

कार्नाड म्हणाले,''नाटकात दोन तासांच्या अवधीत बऱ्याच गोष्टी प्रेक्षकांसमोर मांडायच्या असतात, ही मला सर्वात आव्हानात्मक गोष्ट वाटते. त्यामुळेच नाटककार व्हावेसे वाटले. केवळ प्रथम श्रेणी मिळवण्याच्या उद्देशाने, आवडत नसतानाही गणित शिकलो. गणितातील शिस्तीचा फायदा नाटककार म्हणून झाला. सत्यदेव दुबे यांच्या 'पीडे'मुळे मी वयाच्या ७१व्या वर्षी ययाती पुन्हा लिहिले. 'हे नाटक चांगले आहे, पण इमॅच्युअर्ड आहे' असे ते म्हणत! दुसऱ्यांदा ययाती लिहिताना मी माणूस म्हणून अधिक प्रगल्भ झालो होतो. 'शिरसी'ला राहताना आमच्या घराभोवती घनदाट जंगल होते, वीज नव्हती. करमणुकीचे दुसरे साधनच नसल्याने मी गोष्टींच्या आणि 'यक्षगान' सारख्या लोककलांच्या सान्निध्यात वाढलो. 'हयवदन' मध्ये जेव्हा मी यक्षगानाचा वापर केला, तेव्हा मला काहीच

वेगळी तयारी करावी लागली नाही. महाविद्यालयात माझा भाऊ वसंत कार्नाड उत्तम गात असे. तो धोंडूताई कुलकर्णींचा शिष्य होता. तो तबल्याची साथ करायचा; पण मी गाण्यात कधी अडकलो नाही. मराठीमध्ये होतात तशा नाट्यस्पर्धा कन्नडमध्ये होत नाहीत याची खंत वाटते. माझ्या हयवदन, तुघलक या नाटकांना कन्नडपेक्षाही मराठी रंगभूमीकडून अधिक मागणी होते.''

**• 'ययाती' आजच्या राजकारण्यांसारखाच!**

''माझा 'ययाती' आणि खांडेकरांचा 'ययाती' हे एकमेकांपासून भिन्न आहेत. माझ्या नाटकातील ययाती हा आपल्या नसत्या असामान्यत्वाचा साक्षात्कार झालेल्या आजच्या राजकीय पुढाऱ्यांसारखा आहे. शापाने हरपणाऱ्या तारुण्याबरोबरच हा भ्रम टिकवण्याचीही त्याची धडपड आहे. यातली व्यर्थता कळायला त्याला एक हजार वर्षे लागली....!'' असे गिरीश कार्नाड म्हणाले तेव्हा केवळ ययातीकडेच नव्हे, तर नाटकांकडे बघण्याचीच आपली दृष्टी समृद्ध झाल्याचा अनुभव उपस्थित श्रोत्यांना आला.

चित्रपट अभिनेता व दिग्दर्शकही असलो, तरी नाटकांविषयीच युक्तीच्या चार गोष्टी आपण सांगू असे आरंभी स्पष्ट करून 'ययाती' या आपल्या नाटकाची लेखन प्रक्रिया त्यांनी उलगडली. 'ययाती'ची कथा सांगून त्यांनी तिच्यातली मर्मे अधोरेखित केली. नाटकामध्ये ती बांधताना त्यामागचा विचार व रचनेचे तंत्रही समजावून दिले. नात्यांमधल्या विविध तणावांबरोबरच सामान्य असामान्यत्वांमधले बदलते आकलन आहे. भारतीय मिथक कथांमध्ये असणारी पिता-पुत्रांमधल्या संबंधांची मांडणी फ्रॉइड व पाश्चात्त्यांपेक्षा कशी फटकून आहे, यापासून ते शर्मिष्ठा व देवयानी यांच्यातल्या मैत्री व द्वेषाला 'वर्ग' व वर्ण' यांचेही वेगळे पदर आहेत, असे खुशखुशीत शैलीत स्पष्ट केले. भवभूती, कालिदास, शेक्सपिअरपासून ऑसबर्न व तेंडूलकरांपर्यंतच्या नाटककारांच्या सामर्थ्यांची या ओघात उद्बोधक चर्चा झाली.

'अनुभवा'तून आलेली व 'प्रज्ञे'तून आलेली अशी वेगवेगळी सामग्री नसते, हे दोन्ही घटक परस्परांचे पोषण करणारे आहेत, असे विधान त्यांनी केले. पाश्चात्त्य रंगभूमीवरच्या भव्यदिव्य नेत्रदीपक 'ऑपेरां'मध्ये आपल्याला 'जीव' जाणवत नाही. कारण, त्यात मानवी जाणिवांचाच अभाव आढळतो. मातृभाषेपासून तुटत जाणे, मराठीप्रमाणेच कानडीतही घडते आहे. दोन्हीकडे 'टीव्ही'मुळे सादरीकरणांची रेलचेल आहे. पण, दर्जेदार लेखन व कलाकृतींची वानवा चिंताजनक आहे, असे ते म्हणाले.

**• युवा साहित्य संमेलन**

ईशान्येकडचा प्रदेश अत्यंत सुंदर, पण काहीसा दुर्लक्षित. तिथले साहित्य

प्रतिभाशाली असूनही काहीसे दुर्लक्षित. मात्र आजची युवा पिढी वैविध्यपूर्ण आणि सर्जनशील असे लिखाण करते. त्यामुळे आगामी काळात या साहित्यिकांचे भविष्य उज्ज्वल आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी केले.

साहित्य अकादमीच्या वतीने ईशान्य आणि पश्चिम भारतीय युवा राहित्य संमेलनाचे ३० मे रोजी आयोजन करण्यात आले होते. त्याचे अध्यक्ष भालचंद्र नेमाडे होते. ज्येष्ठ गुजराती साहित्यिक धीरूबेन पटेल, साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास आणि विविध राज्यांमधून आलेले कवी या वेळी उपस्थित होते.

कोणती भाषा अधिक जुनी, या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, ''प्रत्येक भाषा जुनीच आहे. त्यामुळे प्रत्येक भाषेचे वेगळे असे महत्त्व आहे. संत चोखामेळा, संत तुकाराम हे वेगळ्या जाती-धर्माचे-बोलीभाषेचे. पण त्यांनी मराठीतून साहित्यनिर्मिती केली. तीच मराठी आज आपण एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापरत आहोत. त्यामुळे साहित्याची निर्मिती ही त्या त्या भाषेला जिवंत ठेवण्याचे काम करत असते.''

**• 'ग्रामीण पत्रकारिता' पुस्तकाचे प्रकाशन**

''आजच्या पत्रकारितेसमोर टीव्ही, मोबाईल यांसारखे नवीन आव्हाने उभी आहेत, त्यांचा अभ्यास पत्रकारांना करावा लागेल. तसेच पत्रकारिता आणि संस्था अबाधित ठेवण्याची काळजीही घ्यावी लागेल. नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे लागेल. ते स्वीकारणारे पत्रकारच टिकून राहतील,'' असे प्रतिपादन श्री. प्रतापराव पवार यांनी केले. त्यांच्या हस्ते 'सकाळ'चे कुर्डुवाडीचे बातमीदार सुरेश शहा यांनी लिहिलेल्या 'ग्रामीण पत्रकारिता' पुस्तकाचे प्रकाशन झाले. शहा यांच्या पत्नी प्रतिमा शहा, पत्रकार डॉ. जयदेव डोळे, सुमेरू प्रकाशनाचे श्रेणिक अन्नदाते व्यासपीठावर उपस्थित होते.

पवार यांनी पत्रकारितेचे बदलते स्वरूप आणि सामान्य घटनांना दिले जाणारे अवाजवी महत्त्व यावर भाष्य केले. ते म्हणाले, ''दर्जेदार मजकूर हा वृत्तपत्राचा आत्मा आहे. त्याचे भान ठेवणारे वृत्तपत्रच स्पर्धेत टिकून राहील. त्यामुळे चटकदार बातमीला किती महत्त्व द्यायचे हेही ठरवावे लागणार आहे. अभिनेता संजय दत्त तुरुंगात गेला, त्याचे वार्तांकन करण्यासाठी पाठलाग केला जातो हे नवीन पत्रकारितेत येत असेल आणि लोकांनाही ते आवडत असेल; पण दीर्घकाळचा विचार करता असे प्रकार लोकांना आवडणार नाहीत. संजय दत्त  चांगला कलाकार असेलही, पण त्याने गुन्हा केला असेल तर त्याचे उदात्तीकरण करायचे का याचा विचार करावाच लागेल.''

डॉ. डोळे म्हणाले. ''ग्रामीण पत्रकारिता हा नेहमी उपेक्षिलेला प्रकार आहे.

तिची मूल्ये शहरी पत्रकारितेसारखी असली तरी ग्रामीण पत्रकारांना कष्ट खूप करावे लागतात. शहा यांच्या पुस्तकातून ते कष्ट समोर आले आहेत.''

शहा म्हणाले, ''पत्रकार होईन असे वाटले नव्हते. मुंबईत कंपनीत काम करताना साप्ताहिक सुरू झाले. त्यावेळी विरोधी कामगार संघटनेच्या हल्ल्यास सामोरे जावे लागले. नोकरी सोडून कुर्डुवाडीला यावे लागले. १९८२ पासून 'सकाळ' साठी पत्रकारिता सुरू केली. ग्रामीण भागातील अनेक समस्या 'सकाळ'मुळे सोडविता आल्या.''

**• 'ज्ञानपीठ' सोहळा**

साहू जैन कुटुंबीयांनी स्थापन केलेल्या 'भारतीय ज्ञानपीठ ट्रस्ट' तर्फे दिला जाणारा, साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा ज्ञानपीठ पुरस्कार प्रख्यात उडिया लेखिका प्रतिभा राय यांना मुखर्जी यांच्या हस्ते जून मध्ये प्रदान करण्यात आला. सात लाख रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तब्बल ४० कादंबऱ्या, प्रवासवर्णने आणि लघुकथांचे लेखन करणाऱ्या प्रतिभा राय प्रख्यात शिक्षणतज्ज्ञही आहेत. त्यांना २०११चा व एकूण सत्तेचाळिसावा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला, तेव्हा ओडिशातील एका नामवंत विदुषीचा आपण सन्मान करीत आहोत, अशीच भावना उपस्थितांच्या मनात निर्माण झाली. राष्ट्रपती मुखर्जी म्हणाले, 'आपल्या शाळा-कॉलेजांनी स्थानिक भाषेतील साहित्य वाचण्यास मुलांना प्रवृत्त केले पाहिजे.'

मुखर्जी यांनी या वेळी भारतीय ज्ञानपीठ ट्रस्टचा गौरवपूर्ण उल्लेख केला आणि हा प्रतिष्ठित पुरस्कार म्हणजे भारतीय साहित्याच्या समग्र दृष्टीचे प्रतीक आहे, असे उद्‌गार काढले.

**• 'सूर रंगी रंगले'चे प्रकाशन**

मराठी रंगभूमीतर्फे 'सूर रंगी रंगले' या जयमाला शिलेदार यांच्या कारकीर्दीवरील माहितीपटाचे प्रकाशन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले. या वेळी जयमालाबाई, कीर्ती शिलेदार उपस्थित होत्या, प्रकाशनानंतर हा माहितीपट दाखविण्यात आला. दुर्मिळ मैफली, मुलाखती, नाटकातील दृश्ये माहितीपटातून दाखवण्यात आली.

अवीट गोडीच्या आवाजाचे वडिलांनी केलेले कौतुक. ...त्यांच्या प्रोत्साहनामुळेच संगीतनाट्याची सेवा करण्याची मिळालेली संधी... याच कलेच्या प्रांतात मिळालेला आयुष्याचा जोडीदार... त्यांनतर 'सौभद्र', 'मानापमान', 'शांकुतल' यांसारख्या लोकप्रिय नाटकांमधील अजरामर भूमिका.. त्यातील दुर्मिळ

नाट्यपदे अन् त्यामागचा रियाज... अशी जयमाला शिलेदार यांची संगीत रंगभूमीवरील तेजस्वी वाटचाल रसिकांसमोर उलगडली गेली.

पुरंदरे म्हणाले,''कलाकारांचा सन्मान ठेवण्याचा प्रयत्न काही प्रमाणात सरकारतर्फे होतो. मात्र, रसिकांनी कलाकारांचा सन्मान करण्याची खरी गरज आहे. कलाकारांची दयनीय अवस्था होऊ नये, यासाठी रसिकांनीच त्यांचा मानमरातब ठेवायला पाहिजे. पाश्चात्त्य देशांमध्ये वृद्ध कलाकारांबद्दल प्रचंड आदर बाळगला जातो. हे आपण लक्षात घ्यायला हवे.'' शाहीर दादा पासलकर यांना पुरंदरे यांच्या हस्ते 'किरण' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

**• ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांची अभिनय कार्यशाळा**

''वेगवान काळात व्यावसायिक अभिनेता म्हणून सिनेमा किंवा नाट्य क्षेत्रात प्रवेश केल्यावर कलाकारांना आपल्या कामाबाबत विचार करण्यास वेळ मिळत नाही. अभिनयातील सूक्ष्म बारकावे अभ्यासले जात नाहीत. व्यावसायिक अभिनेत्याने त्यासाठी वेळ काढण्याची आवश्यकता आहे.'' असे मत ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी व्यक्त केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ फिल्म अँड टेलिव्हिजन'ने विक्रम गोखले यांची अभिनय कार्यशाळा आयोजित केली. या वेळी इन्स्टिट्यूटचे संचालक गिरीश केमकर, 'डीइएस'चे किरण शाळिग्राम, प्रशांत गोखले, श्राकृष्ण कानेटकर आदी उपस्थित होते.

सध्याच्या अभिनेत्यांविषयी गोखले म्हणाले, ''अभिनयात दर्जा असावा लागतो. वेगवान काळात आपल्या कामावर विचार करायला कलाकारांकडे वेळच नाही. मात्र, मी नव्या पिढीविषयी आशावादी आहे.

''पैसा, प्रसिद्धीमुळे करिअर करण्यासाठी या क्षेत्रात असलेले पालकच आग्रह करतात. त्यात कोणताही ठोस विचार नसतो. विक्रम गोखले यांनी या क्षेत्रात भरीव योगदान देताना आपले भानही जागृत ठेवले आहे.'' अशी प्रतिक्रिया राजदत्त यांनी व्यक्त केली.

**• शॉर्टफिल्मसाठी 'शॉर्टकट'**

शॉर्टफिल्म (लघुपट) या माध्यमाविषयी शास्त्रशुद्ध माहिती देण्यासाठी 'शॉर्टकट'चा अक्षरपर्याय अलीकडील तरुण पिढी स्वीकारत आहे.

शॉर्टफिल्मची शास्त्रशुद्ध प्रक्रिया प्रसाद नामजोशी यांनी 'शॉर्टकट' या पुस्तकातून स्पष्ट केली आहे.

जागतिक चित्रपटांविषयी केलेले लेखन; तसेच उत्तमोत्तम शॉर्टफिल्मवरील

रसग्रहणात्मक लेखन संकलित करून पुस्तक करावे, अशी कल्पना होती. चित्रपट किंवा शॉर्टफिल्मविषयक साहित्य मराठी भाषेत फारसे उपलब्ध नाही.

शॉर्टफिल्मची कल्पना सुचल्यावर पटकथा लेखन, फिल्मसाठीची तयारी, प्रत्यक्ष शुटिंग, तयार झालेल्या फिल्म लोकांपर्यंत पोहोचवणे याबाबतचे मार्गदर्शन या पुस्तकात केले आहे. आवश्यक त्या ठिकाणी चित्रेही वापरण्यात आली आहेत. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ केले आहे.

या पुस्तकाविषयी नामजोशी म्हणाले, ''डिजिटल क्रांतीमुळे हल्ली कोणालाही सहजपणे कॅमेरा मिळतो. त्यात शॉर्टफिल्म हे तरुणाईसाठी एक उत्तम अभिव्यक्ती माध्यम असल्याने मोठ्या प्रमाणावर निर्मिती होऊ लागली आहे. चित्रपट किंवा माध्यमांचा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे शॉर्टफिल्मबाबत शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्याची सुविधा नसल्याने या पुस्तकाचा फायदा होऊ शकतो.''

**• ग्रंथालयांच्या समृद्धीसाठी...**

श्याम दाइंगडे यांच्या 'ग्रंथालय समृद्धीची वाटचाल' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. 'सार्वजनिक ग्रंथालयांना डोळ्यासमोर ठेवून हे पुस्तक लिहिले असून, कोलकाता येथील राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाकडून अनुदान कशा प्रकारे मिळविता येते याचीही माहिती त्यात आहे. त्याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालय समृद्ध कसे करता येईल, याचाही ऊहापोह त्यात केला गेला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - ९८९०६५३०४५

**• 'संपादकांच्या खुर्चीवर'**

उत्कर्ष प्रकाशनातर्फे ज्येष्ठ पत्रकार एकनाथ बागूल लिखित 'संपादकांच्या खुर्चीवर' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ साहित्यिक ह. मो. मराठे, 'केसरी'चे कार्यकारी संपादक सुकृत खांडेकर 'अंतर्नाद' मासिकाचे संपादक भानू काळे या वेळी उपस्थित होते. 'महाराष्ट्राच्या पत्रकारितेतील स्थित्यंतरे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त आहे,'' असे डॉ. मोरे यांनी सांगितले. ''सार्वजनिक जीवनातील नैतिकता कमी होत आहे. पत्रकारितेत शिरलेल्या अपप्रवृत्ती दूर करून समाजाची वैचारिक जागृती करण्याची जबाबदारी पत्रकारांवर आहे.'' असे बागूल यांनी सांगितले.

**• 'तुझ्या आठवणीत'चे प्रकाशन**

'स्वरगंधार संगीत व साहित्य प्रसार संस्थे'तर्फे नवोदित कवी सुनील हनवते

यांच्या ‘तुझ्या आठवणीत’ या कविता संग्रहाचे प्रकाशन गझलकार रमण रणदिवे यांच्या हस्ते झाले. कवी म. भा. चव्हाण, शाहू कॉलेजच्या प्राचार्या शोभा इंगवले, पुणे महानगरपालिकेचे कामगार कल्याण अधिकारी नितीन केंजळे आदी या वेळी उपस्थित होते. प्राचार्य स. ना. डांगे यांचा या वेळी विशेष गौरव करण्यात आला.

**• ‘मानवधर्म’चे प्रकाशन**

रत्नाकर ठाकूर तथा रामचरणदास यांनी लिहिलेल्या ‘मानवधर्म’ आणि ‘भारतीय संस्कृती आणि आजचे वास्तव’ या पुस्तकांचे प्रकाशन डॉ. विद्याधर पानट यांच्या हस्ते झाले. पंत मंदिर, आनंदवन येथील स्वरूपदास महाराज, चंद्रकांत फेगडे आदी या वेळी उपस्थित होते. मानवधर्म म्हणजे काय, श्रद्धेचे जीवनातील स्थान कोणते, ज्ञानविज्ञानाचा मानवाशी संबंध, समाजरचना, मानवसंस्कृती, न्यायसंस्था, विवाहसंस्कार आदी अनेक बाबींचा ऊहापोह ‘मानवधर्म’ पुस्तकात करण्यात आला आहे.

**• ‘इझी मनी, स्वीट हनी अँड द लंडन बॅरिस्टर’**

प्रमोद चिंचाणकर यांच्या ‘इझी मनी, स्वीट हनी अँड द लंडन बॅरिस्टर’ या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन झाले. ‘‘भारतीय प्रज्ञावंत तरुणी आणि ब्रिटनमधील तरुण यांची ही कथा असून, कायद्यातील आणि व्यवस्थेतील त्रुटींचा फायदा घेऊन कसा गैरव्यवहार केला जातो हे या कथेत मांडले आहे.’’ असे चिंचाणकर यांनी सांगितले. ही थ्रिलर स्वरूपातील कथा असून, तिच्यात आर्थिक गैरव्यवहारांचा वेध घेतला गेला आहे.

**• हिंदी उर्दू कविसंमेलन**

उर्दू कवी रघुपती सहाय फिराक गोरखपुरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रवासी हिंदी उर्दू साहित्य अकादमीतर्फे मुशायरा आणि कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. प्रा. उद्धव महाजन, डॉ. नजीर फतेहपुरी, अजीज सोलापुरी, अब्दुल अजीज अदिबी, तनवीर शेख, मौलाना तनवीर, हसनखान अशरफी, शमशाद जलीलशाद, यासीन बरारी, नाना माळी, दरवाना सिंग आदींनी गझला सादर केल्या, ज्येष्ठ हिंदी कवयित्री प्रभा मादूर, सय्यद आसिफ या वेळी उपस्थित होते. प्रा. उद्धव महाजन यांनी सूत्रसंचालन केले.

**• नाट्यनिर्मात्यांकडून तारखांचे ‘फिक्सिंग’**

नाट्य व्यवसायातील नव्या लोकांना पद्धतशीरपणे दूर ठेवण्यासाठी नाट्यगृहातील तारखांचे फिक्सिंग होण्यामागे काही बडे नाट्यनिर्माते, नाट्य

व्यवस्थापक आणि नगरसेवक यांच्यातील संगनमत कारणीभूत असल्याची चर्चा आहे. अशी टीका नाट्यव्यवसायातील 'माफियां' कडून केल्या जाणाऱ्या तारखांच्या घोळावर निर्मात्या लता नार्वेकर यांनी केली.

नाट्यगृहांचे बुकिंग तीन महिने आधी खुले होते. त्यात सातत्याने नाट्यनिर्मिती करणाऱ्या निर्मात्यांना महत्त्वाच्या तारखांसाठी प्राधान्य दिले जाते. त्यामुळे नव्या निर्मात्यांना कमी व्यवसाय होणाऱ्या वेळांना नाट्यप्रयोग लावावे लागतात.

''या फिक्सिंगमुळे आमच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळत नाही. काही ठराविक लोक पैशाच्या जोरावर हे खेळ करत असून, त्याबाबत आता ठोस कारवाई होण्याची गरज आहे.'' असे निर्माते अनिल स्वकुळ म्हणाले.

**• 'ऐक सखे' आणि 'बापमाणूस'**

''कविता ही एक प्रभावी कलाकृती असून प्रेम, जिव्हाळा, आपुलकी हा कवितेतला महत्त्वाचा भाग असतो. कवी आपल्या जीवनातील विविध अनुभवांना कवितेतून मोकळी वाट करून देतो. त्यामुळेच रसिकांनी कवितेच्या शब्दांकडे लक्ष न देता त्यातील मर्म आणि मध्यवर्ती आशयसूत्र समजून घेणे गरजचे असते,'' असे मत समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'गवाक्ष' आणि 'काषाय' प्रकाशन संस्थांतर्फे चंद्रकांत वानखेडे लिखित 'ऐक सखे' आणि नयन सरस्वते लिखित 'बापमाणूस' या काव्यसंग्रहांचे प्रकाशन डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

**• सचिनच्या मुलीचा पहिला चित्रपट**

प्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगावकर यांची कन्या श्रिया हिचा पहिला चित्रपट 'एकुलती एक' मे मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात सचिन आणि श्रिया यांची वडील आणि मुलीचीच भूमिका आहे. वडील आणि मुलगी यांच्या मधील भावस्पर्शी नात्याला विनोदाची जोड देण्यात आली आहे. सचिन यांच्या कारकीर्दीला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या चित्रपटाद्वारे श्रियाप्रमाणेच सिद्धार्थ मेनन हा एक नवा चेहरा यात आहे. सचिन आणि झारापकर यांची पटकथा आहे, तर इरावती कर्णिक यांचे संवाद आहेत. हिंदीतील प्रसिद्ध गायक सोनू निगम याने या चित्रपटासाठी खास दोन गाणी म्हटली आहेत.

**• अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन**

''साहित्याची निर्मिती ही तुकड्यावर लक्ष ठेवून नाही, तर ठोस भूमिका घेऊन

झालेली असावी.'' असे परखड मत राज्याचे पाणीपुरवठा आणि स्वच्छतामंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी नवव्या साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे विचार साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. या वेळी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. बाबूराव गुरव, स्वागताध्यक्ष प्रा. विजय क्षीरसागर, डॉ. शां.ब. मुजुमदार उपस्थित होते.

प्रा. ढोबळे म्हणाले,''अण्णा भाऊ साठे यांना समजून घेण्यात आपली चूक झाली हे मान्य करण्याची गरज आहे. अण्णा भाऊंनी साहित्यात माणूस मांडला. अलीकडे संमेलनांना उत्सवाचे स्वरूप येत असून, विचार बाजूला पडत आहेत. बहुजन समाजातील पिढी चांगल्या वैचारिक साहित्याची निर्मिती करीत आहे.''

तरुणांसाठी आदर्श असलेल्या अण्णा भाऊ साठे यांच्या आयुष्यातील वेदना आपण विसरत असून, जातीभेद नष्ट करणारे त्यांचे साहित्य अन्य भाषांमध्येही प्रसिद्ध होण्याची आवश्यकता डॉ. मुजुमदार यांनी व्यक्त केली.

**• सोमेश्वरनगर येथे भरणार पहिले एकांकिका संमेलन**

रंगकर्मींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या एकांकिकांच्या निर्मितीसाठी राज्यव्यापी चळवळ उभारली जात आहे. अक्षरमानव या संस्थेने ९ ते १२ ऑगस्ट या कालावधीत सोमेश्वरनगर येथे पहिले एकांकिका संमेलन आयोजित केले आहे.

महाराष्ट्राच्या नाट्यचळवळीत एकांकिकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. नाट्यकर्मी घडवण्याच्या या प्रयोगशाळेकडे पाहिजे तितक्या गांभीर्याने पाहिले जात नाही. या नाट्यप्रकाराचा विकास करण्याचा राज्यव्यापी प्रयत्न म्हणून हे संमेलन महत्त्वाचे आहे.

महाविद्यालयीन पातळीवर एकांकिका ही एकप्रकारे चळवळच म्हणावी लागेल. अनेक अडचणी सोसून, प्रचंड कष्ट करून होणाऱ्या स्पर्धांचा माहौल सरल्यावर त्यांचे कौतुक संपते. नाटक, चित्रपट या दोन्ही माध्यमातील कलाकार, तंत्रज्ञ एकांकिकांमधूनच घडतात. उत्साही रंगकर्मींना प्राथमिक प्रशिक्षण देणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

लेखक, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञ, परीक्षक, प्रेक्षक स्पर्धांचे आयोजक या सर्वांनी सहभागी व्हावे अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षभरात गाजलेल्या काही मोजक्या एकांकिकांच्या सादरीकरणासह दिग्गज रंगकर्मी या संमेलनात मार्गदर्शन करणार आहेत. या संमेलनासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. संमेलनाबाबत अधिक माहिती आणि नावनोंदणीसाठी (०२०) ३०४२६६७९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

- **रंगला हास्य महोत्सव**

राम नगरकर यांच्या स्मृतिनिमित्त राष्ट्र सेवा दलाच्या सभागृहात चार दिवसीय हास्य महोत्सव आयोजित करण्यात आला होता. उद्घाटक ज्येष्ठ अभिनेते स्वरूपकुमार म्हणाले, 'एकाच वेळी राम आणि रावण दोघांच्या भूमिका वठवण्याची क्षमता एकपात्री कलाकारात असावी लागते. त्यामुळे एकपात्री प्रयोग ही कस पाहणारी कला आहे.' महोत्सवात 'आम्ही एकपात्री' या संस्थेचे वंदन राम नगरकर, बंडा जोशी, संतोष चोरडिया, उज्ज्वला कुलकर्णी, ज्योती देशपांडे, योगेश सुपेकर, शेखर केदारी, महेंद्र गणपुले, अभय देवरे, सुभाष घैसास या कलाकारांनी





६ वी आवृत्ती

**बाजार**

**व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : ११०/-रु. पोस्टेज : २५/-रु.**

पावसाची सर आली. उंटाचे अंग भिजू लागले. निळू म्हणाला, "चला, पळा! ह्याला निवाऱ्याला ठेवला पाहिजे." आम्हाला कुणाच्यातरी घरात उंटाला ठेवायचे होते, पण वाडीतील सगळी घरे बुटकी होती. माझ्या घरात उंट मावत नव्हता. निळूच्या घरात मावत नव्हता. देवळात मावत नव्हता. उंटाला कुठेच निवारा नव्हता.

मेंढरांना, शेरडांना, कोंबड्यांना, कुत्र्यांना आडोसा होता. माणसांना आडोसा होता, पण उंटाला नव्हता. कारण तो सर्वांत जास्त मोठा, उंच होता. अचानक बाहेरून परका आलेला होता.

सादरीकरण केले. सदानंद चांदेकर यांनी राम नगरकर यांच्या आठवणींना उजाळा दिला.

- **'खारीच्या वाटा'चे प्रकाशन**

अक्षरधारा बुक गॅलरी आणि राजहंस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक ल.म. कडू यांच्या 'खारीच्या वाटा' या कादंबरीचे नुकतेच प्रकाशन झाले. सिद्धार्थ बेंद्रे, अश्विन चितळे यांनी या कांदबरीचे अभिवाचन केले. खेड्यात राहाणाऱ्या शाळकरी मुलाने जखमी अवस्थेत सापडलेल्या खारीला जीवदान दिले, तिचे संगोपन केले असे कथानक यात मांडण्यात आले आहे. हिमांशू बक्षी आणि समृद्धी बेंद्रे यांच्या पार्श्वसंगीताने अभिवाचनाची रंगत वाढवली.

- **रमाबाई रानडे यांनी पाठविलेले एक पत्र**

रमाबाई रानडे यांच्या वळणदार अक्षरातील एक पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे. रमाबाई रानडे यांनी राधाबाई भिडे यांना १२ मे १९२१ रोजी हे पत्र लोणावळा येथून लिहिले होते, अशी माहिती संजय गोडबोले यांनी दिली.

हे पत्र डॉ. नारायण भिडे यांनी उपलब्ध केले. डॉ. भिडे यांचे वडील कृष्णाजी भिडे हे लघुवाद दिवाणी न्यायाधीश होते. न्यायमूर्ती महादेव रानडे यांच्या मृत्यूनंतरही त्यांचा आणि रमाबाई व राधाबाई यांचा स्नेह अबाधित होता.

राधाबाई आजारी पडल्याचे समजल्यानंतर त्यांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी लिहिलेल्या या पत्रात डॉक्टरांची परवानगी असल्यास विश्रांतीसाठी लोणावळा येथे येण्याचे आमंत्रण रमाबाईंनी दिले आहे.

- **रमाबाई रानडे यांचे इंग्रजी चरित्र**

'उंच माझा झोका' या मालिकेमुळे न्या. माधवराव रानडे आणि रमाबाई रानडे यांच्याबद्दल कुतूहल निर्माण झाले आहे. रमाबाई रानडे यांचे इंग्रजीतील चरित्रही (रमाबाई रानडे-हर लाइफ अँड मिशन) प्रसिद्ध झाले आहे. प्रा. एम. एस. विद्वांस (१९०६ ते १९९१) हे रमाबाईचे चरित्रकार. डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या मदतीने त्यांनी हे चरित्र पूर्ण केले. मुकुंद कुर्लेकर यांनी त्याचा इंग्रजीतून अनुवाद केला आहे.

- **'सकारात्मक मानसिकतेची गरज'**

पार्किन्सन मित्रमंडळातर्फे शेखर बर्वे लिखित 'पार्किन्सनशी मैत्रीपूर्ण लढत' या पुस्तकाचे प्रकाशन इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. माया तुळपुळे आणि ज्येष्ठ मज्जाविकारतज्ज्ञ डॉ. प्रदीप दिवटे यांच्या हस्ते झाले.

'पार्किन्सन्ससारख्या दीर्घकालीन आजारामध्ये औषधोपचारासोबत

वि.स.खांडेकर

यांची अप्रतिम साहित्यकृती

३४वी आवृत्ती




किंमत : २५०/-रु.

पोस्टेज : ३०/-

जीवनशैलीतील बदल खूप महत्त्वाचा असतो. हल्ली परिणामकारक औषधे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असली, तरी सकारात्मक मानसिकता असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या आजारात येणाऱ्या नैराश्यावर पेशंटने मात केली पाहिजे,' असे डॉ. दिवटे या वेळी म्हणाले. डॉ. शोभना तीर्थळी यांनी सूत्रसंचालन केले.

- **गिरीश कुलकर्णी 'कान' फिल्म फेस्टिव्हल मध्ये**

'विहीर', 'देऊळ', 'मसाला' आणि 'पुणे ५२' अशा विविध चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची, लेखनाची मोहोर गिरीश कुलकर्णी यांनी उमटवली आहे. अनुराग कश्यपचा 'अग्ली' कानमध्ये प्रदर्शित करण्यात आला. त्याच्या प्रीमिअरसाठी गिरीश कुलकर्णीही कानच्या रेड कार्पेटवर उपस्थित होते.

अपहरण नाट्यावर आधारित या थरारपटात गिरीशबरोबर तेजस्विनी कोल्हापुरे आणि रोनित रॉय यांच्या भूमिका आहेत. 'अग्ली'हा त्यांचा पहिला हिंदी चित्रपट. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात झळकल्यामुळे एक सक्षम अभिनेता म्हणून त्यांचे नाव जगभर पोहोचले आहे.

- **रामायणातील आदर्शाचे 'सीडी'तून चित्रण**

'श्री संत सेवा संघा' तर्फे 'रामायण - आदर्श समाजका स्वर्णचित्र' या सीडीचे प्रकाशन २७ मे रोजी ज्येष्ठ प्रवचनकार सुनील चिंचोलकर यांच्या हस्ते झाले. नेहा भाटे यांनी गीतांवर आधारित नृत्यनाटिका सादर केली. आणि या नृत्यनाटिकेत प्रसिद्ध नर्तक परिमल फडके यांचाही समावेश होता.

या सीडीतील रचना पं. रघुनंदन पणशीकर, पं. संजीव अभ्यंकर, शौनक अभिषेकी, विजय कोपरकर, महेश काळे, चैतन्य कुलकर्णी, पार्थ उमराणी, जीवन धर्माधिकारी, विभावरी आपटे-जोशी आणि मृदुला तांबे यांनी गायल्या आहेत.

- **वानरसेनेचा 'मिनिएचर' सेतू**

श्री रामायणावर आधारित असलेल्या या कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका वैशिष्ट्यपूर्ण होती. लंकेत जाण्यासाठी श्री हनुमानाच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक दगडावर श्रीराम लिहून वानरसेनेने सेतू बंधला होता. त्याची आठवण करून देणारी 'श्रीराम' असे लिहिलेल्या दगडांच्या 'मिनिएचर' प्रतिकृतीच्या सुबक वापराद्वारे निमंत्रण पत्रिका तयार करण्यात आली होती.

- **संभाजी महाराजांची यशोगाथा तत्कालीन 'द लंडन गॅझेट' मध्ये**

''औरंगजेबाविरुद्ध बंड पुकारून आलेला त्याचा मुलगा शहजादा अकबर




**२ री आवृत्ती**

# मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा

मूळ लेखक **डेल कार्नेजी**
अनुवाद **ॲड. शुभदा विद्वांस**

**किंमत :२००/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

तुम्हाला तुमच्या पसंतीचे काम हवे आहे का? ते तुम्हाला सहज मिळेल. तुम्हाला जे काम मिळाले आहे ते तुम्ही आवश्य घ्या आणि त्यामध्ये अधिक सुधारणा करा.

तुम्ही कोणत्याही संकटात सापडला असाल तर त्याचा उपयोग संधी म्हणून करा.

डेल कार्नेजी ह्यांच्या अजरामर आणि काळाच्या कसोटीला उतरलेल्या उपदेशांमुळे आज अगणित लोकांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांना व्यावसायिक यश तर मिळालेच पण त्यांचे व्यक्तिगत आयुष्यही समृद्ध झाले. त्यांच्या कालातीत अनेक उत्तम मार्गदर्शनपर पुस्तकांपैकी 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा' हे पुस्तक तुम्हाला पुढील गोष्टी शिकवते.

लोकांना तुम्ही आवडावे म्हणून करायच्या सहा युक्त्या.

लोक तुमच्याशी सहमत व्हावेत म्हणून करायच्या बारा युक्त्या.

लोकांना राग न येऊ देता त्यांच्यात बदल घडवून आणण्याच्या सहा युक्त्या आणि आणखीही खूप काही.

'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा' ह्या पुस्तकाचा जास्तीत जास्त लाभ घ्या.ठरलेल्या सलमा अहमद यांचं हे विलक्षण अनुभवकथन वाचकाला एका निराळ्या विश्वाची व स्त्रीशक्तीच्या अफाट सामर्थ्याची ओळख करून देते.

याला छत्रपती संभाजी महाराजांनी आश्रय दिल्याने औरंगजेब आणि महाराजांमध्ये संघर्षाची ठिणगी पडली... त्याच वेळी संभाजी महाराजांनी गोव्याच्या पोर्तुगीजांवर आक्रमण केले होते. हे समजताच औरंगजेबाने पोर्तुगीजांच्या मदतीला मुघल सैन्य पाठविले...,'' सन १६८४ मध्ये घडलेल्या या सर्व घडामोडींच्या बातम्या त्या वेळी 'द लंडन गॅझेट' मध्ये छापून येत होत्या.

या संबंधातील दोन बातम्यांचे दस्त प्रणव महाजन यांनी पाठविले आहेत.

सुरतेहून पाठविलेल्या पत्रात औरंगजेबाचा उल्लेख आहे. पण त्याच्या मुलाच्या नावाचा उल्लेख नाही. इतर पुराव्यांवरून तो शहजादा अकबर असल्याचे कळते. या दोन्ही पत्रात शिवाजी महाराजांचे नाव आहे. मात्र, तो उल्लेख संभाजी महाराजांचा आहे. संभाजी महाराजांनी गोव्यावर १६८३-८४ मध्ये स्वाऱ्या केल्या होत्या. त्या वेळी औरंगजेबाने सुरतेचे आरमार गोव्यातील पोर्तुगीजांच्या मदतीला पाठविले. सहा मोठी जहाजे, १२ तोफा, ४५ गलबते दारूगोळा आणि अन्नधान्य होते, असा तपशील त्या बातम्यांत आहे.

- **एक पाय नसलेली अरुणिमा 'एव्हरेस्ट'वर**

माजी राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू असलेल्या अपंग अरुणिमा सिन्हा हिने एव्हरेस्ट शिखरावर पाऊल ठेवून सर्व अडीअडचणी या एखाद्या छोट्याशा डोंगराप्रमाणेच असतात आणि त्यावर सहज मात करता येते, हे दाखवून दिले.

उत्तर प्रदेशातील व्हॉलीबॉलपटू ते एव्हरेस्टवर चढाई करणारी जिद्दी गिर्यारोहक हा अरुणिमाचा प्रवास थक्क करणारा आहे. आंबेडकर नगरची अरुणिमा ही राष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू होती. २०११ मध्ये तिला काही गुंडांनी चालत्या रेल्वेतून बाहेर फेकले. त्यात अरुणिमाला एक पाय गमवावा लागला. मात्र, अशा परिस्थितीतही २५ वर्षीय अरुणिमाने एव्हरेस्टवर तिरंगा फडकविण्याची अजोड कामगिरी केली. एव्हरेस्ट सर करणारी ती पहिलीच भारतीय अपंग महिला ठरली आहे.

गेल्या वर्षी उत्तरकाशी येथील 'टाटा स्टील ॲडव्हेंचर फाउंडेशन'च्या शिबिरात पहिली भारतीय महिला एव्हरेस्टवीर बचेंद्री पाल हिच्या मार्गदर्शनाखाली अरुणिमाने प्रशिक्षण घेतले. गेल्या वर्षी तिने लडाखमधील ६ हजार ६२२ मीटर उंचीचे माउंट चमसेर कांग्री शिखर सर केले होते.

- **स्टीफन हॉकिंग यांच्या जीवनावर कॉमिक बुक**

ब्रिटनचे ख्यातनाम शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र स्तिमित करणारे व प्रेरणादायी आहे. त्यांचे हे चरित्र आता कॉमिक बुकच्या रूपात येणार आहे.

## आगामी

**'द चेकलिस्ट मॅनिफेस्टो'**
या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद




# यशप्राप्तीचा जाहीरनामा!

लेखक : **अतुल गवांदे**
अनुवाद : **सुनिती काणे**

चेकलिस्ट म्हणजे काय?

चेकलिस्ट म्हणजे कुठलेही काम नीटपणे पार पाडण्यासाठी ते सुरू करण्यापूर्वी खातरजमा करायच्या गोष्टींची तपशीलवार यादी!

कल्पना अगदी अळणी आणि सुमार वाटतेय का?

परंतु प्रत्येक व्यवसायात ती किती मोलाची ठरते, ते पाहण्यासाठी डॉक्टरांच्या, वैमानिकांच्या, बिल्डर्सच्या, आर्थिक गुंतवणूकदारांच्या, हॉटेल मॅनेजर्सच्या, स्टेज आर्टिस्टच्या जगात फेरफटका मारू या आणि घेऊ या अनेक थरारक अनुभव!

या कॉमिक बुकमध्ये हॉकिंग यांचे महाविद्यालयीन जीवन, केंब्रिजमधील त्यांचे संशोधन व त्यांचे महत्त्वाचे शोध यांचा समावेश आहे. या कॉमिक बुक मालिकेचे नाव स्टीफन हॉकिंग-काळ व अवकाश यांची कोडी असे असून त्यात हॉकिंग यांचा एक माणूस, मिथक व आख्यायिका या अनुषंगाने विचार केला आहे.

आपल्या काळातील एक महान वैज्ञानिक असलेल्या स्टीफन हॉकिंग यांच्या अंतर्मनाचा वेध घेणे व त्यांनी मांडलेल्या अमूर्त संकल्पना या दृश्यात्मक व गतिशील पद्धतीने मांडणे हा आमचा हेतू आहे. हॉकिंग हे जिवंतपणीच दंतकथा बनले आहेत. त्यांचे 'अ ब्रीफ हिस्टरी ऑफ टाइम' हे पुस्तक, वैज्ञानिक नसलेल्या लोकांनाही विश्वाचे स्वरूप सोप्या भाषेत विशद करते, असे बॅसेट यांनी सांगितले. या अगोदर प्रिन्स हॅरी, केटी पेरी व जॉन लेनॉन यांची जीवनेही सादर करण्यात आली आहेत. या पुस्तकाचे लेखक मायकेल लेंट व ब्रायन मॅकार्थी यांनी सांगितले, की स्टीफन हॉकिंग यांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची तल्लख विनोदबुद्धी. प्रत्येक शोधात त्यांना अगदी लहान मुलांसारखाच आनंद मिळतो. मनाची एकाग्रता साधण्याचे श्रेय ते आपल्या अपंगत्वाला देतात. हॉकिंग यांना अमायोट्रॉफिक लॅटरल स्क्लेरॉसिस हा विकार जडलेला आहे. तो मोटर न्यूरॉन रोगाचा एक भाग आहे. यात मानवी अवयवांच्या स्वेच्छेने होणाऱ्या हालचाली नियंत्रित करणाऱ्या चेतापेशींवर परिणाम झालेला असतो. त्यांना जेव्हा हा रोग झाल्याचे निदान झाले त्या वेळी त्यांचे वय २१ होते, ते फार वर्षे जगू शकतील अशी स्थिती नव्हती, पण वैद्यकीय आडाखे फोल ठरवून वयाची ८० वर्षे पार केली आहेत. आपले बहुतांश आयुष्य चाकाच्या खुर्चीत बसून त्यांनी घालवले. त्यांना बोलता येत नाही. ते संगणकाच्या माध्यमातून संवाद साधतात.

## • एव्हरेस्टवर 'तिरंगा'

भूषण हर्षे, आनंद माळी आणि गणेश मोरे या तीन मावळ्यांनी आठ हजार ८४८ मीटर उंचीच्या 'एव्हरेस्ट'वर तिरंगा फडकवून नवा इतिहास रचला.

गेल्या वर्षी 'गिरीप्रेमी'च्या आठ गिर्यारोहकांनी एव्हरेस्ट शिखर सर करण्याचा विक्रम केला होता. या अनुभवाच्या जोरावर गिरीप्रेमींनी यंदा ल्होत्से-एव्हरेस्ट या पहिल्या नागरी जोडमोहिमेचे आयोजन केले होते. उमेश झिरपे यांच्यासह आशिष माने आणि टेकराज अधिकारी या मोहिमेत सहभागी झाले होते. टेकराज अधिकारीला गेल्या वर्षी एव्हरेस्टला झालेला 'फ्रॉस्टबाईट' बरा झाला नव्हता. त्यामुळे त्याला आशिषसह ल्होत्सेला जाता आले नाही. त्यामुळे आशिष माने या एकट्या एव्हरेस्टवीराने जगातील चौथ्या क्रमांकाचे ल्होत्से शिखर सर केले होते. त्यानंतर हर्षे, आंनद माळी आणि मोरे यांनी एव्हरेस्ट सर करून मोहीम यशस्वी

करून दाखवली.

संघाला ऑक्सिजन सिलिंडरचा तुडवडा जाणवल्याने मोहिमेचा नेता उमेश झिरपे याने बेस कॅम्पला परतण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या तीन सहकाऱ्यांना एव्हरेस्ट सर करण्याची संधी दिली.

- **मोबाईल चार्जिंग फक्त २० सेकंदांत!**

केवळ २० ते ३० सेकंदांत मोबाइल पूर्णपणे चार्ज करू शकेल, अशा सुपर-कपॅसिटर उपकरणाचा शोध कॅलिफोर्नियात राहणाऱ्या ईशा खरे हिने लावून ५० हजार डॉलर्सचे पारितोषिक मिळवले. 'गुगल'नेही तिच्या या क्रांतिकारी संशोधनाची दखल घेतली आहे. ईशाच्या या उपकरणाचे आयुष्य १० हजार चार्ज-रिचार्ज सायकलएवढे आहे. मोबाईलच्या सामान्य बॅटरीचे आयुष्य एक हजार सायकल्स असते. त्यामुळे ईशाने बनवलेले उपकरण मोबाईल चार्जिंगसाठी फारच





**११ वी आवृत्ती**

# गुलमोहर

## व.पु.काळे

**किंमत : १००/-रु. पोस्टेज :२५/-रु.**

काही काही व्यक्तींच्या बाबतीत, 'त्यांचं आणि तुमचं नातं काय?'
– असा प्रश्न विचारला जातो.
नातेवाईकांकडून फटके खाऊनही नात्याचं महत्त्व संपत नाही.
नुसती मैत्री एवढ्यावर समाधान होत नाही. मैत्री आणि नातेवाईक यांच्यामध्ये
एक धूसर पडदा असतो. तो दिसत नाही. जाणवतो.
प्रेरणा आणि प्रमोद काळे यांच्या संदर्भात मला हेच म्हणायचं आहे.
हा गुलमोहर त्या धूसर जाणिवेला.

क्रांतिकारी ठरणार आहे.

ईशाच्या या सुपर-कपॅसिटरची चाचणी सध्या फक्त एलइडी दिव्यांवरच करण्यात आली आहे. अत्यंत लहान आकाराचा हा सुपर कपॅसिटर एनर्जी स्टोरेज डिव्हाइस असून तो मोबाइलच्या बॅटरीमध्ये बसवता येतो. अत्यंत कमी जागेत भरपूर ऊर्जा साठवून ठेवण्याची, चटकन चार्ज करण्याची क्षमता ही या सुपर-कपॅसिटरची वैशिष्ट्ये आहेत. हा सुपर-कपॅसिटर लवचिक असल्याने कपड्यांमध्ये किंवा गुंडाळता येणाऱ्या डिस्प्लेमध्ये तसेच कारच्या बॅटरीमध्येही वापरता येऊ शकेल.

• **सावरकरांवरील 'गीत-मृत्युंजय'चे प्रकाशन**

बीएमसीसी कॉलेजचे माजी प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते सदानंद जोशी यांच्या गीत-मृत्युंजय या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी सुभाष देसाई उपस्थित होते. देशपांडे म्हणाले, ''काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी सावरकर जेव्हा अंदमान तुरुंगाच्या दारात पोहोचले तेव्हा त्यांच्या गळ्यात जन्मठेपेची शिक्षा झाली आहे हे दर्शविणारे दोन बिल्ले होते. तिथला रखवालदार म्हणाला, 'तुम्ही आता दोन पायांवर तुरुंगात येत आहात, जाताना मात्र चार खांद्यांवरच जाल. सावरकर त्या रखवालदाराला म्हणाले, तुझ्या राणीचं राज्य तोपर्यंत टिकायला तर हवं ना! सावरकरांचा आत्मविश्वास आणि जाज्वल्य देशाभिमान होता. जोशींनी लिहिलेल्या काव्यातून सावरकरांचे आयुष्य उत्तमप्रकारे व्यक्त झाले आहे.''

जोशी म्हणाले, 'आमच्या अंदमानच्या भेटीनंतर मला १०८ कडव्यांचे हे काव्य सुचले.' देसाई म्हणाले, 'सदानंद जोशींनी केलेलं काव्य अगदी साधं, सोपं आहे. त्यामुळे ते शाळांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचायला हवे.'

• **'पिनाक'मध्ये साहित्यिक गप्पा**

पिनाक मेमरीज- अवनीश परिसर ज्येष्ठ नागरिक संघाच्या पुढाकाराने गेली पाच वर्षे साहित्यिक, कालवंत, इतिहास अभ्यासक याच्याशी गप्पांचा कार्यक्रम केला जातो. या वर्षीही सलग पाच दिवस झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, अभिनेते श्रीकांत मोघे, चित्रकार रवी मुकुल उर्फ विश्वास मुरलीधर कुलकर्णी, इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, लेखिका शोभा बोंद्रे यांनी आपल्या जीवनातील समृद्ध अनुभवांची शिदोरी खुली केली. विलास निंबोळकर, जयश्री नेने, ह. मो. मराठे, अंजली आपटे, विनीता मेंडजोगे, आशा पाटणकर, अपर्णा ढवळे, डॉ. अमृता मराठे यांचे सक्रिय सहाय्य या उपक्रमाला लाभले आहे.




# जीव जिथे गुंतलेला...

मूळ लेखक : **अतुल गवांदे**
अनुवाद : **नीला चांदोरकर**

सत्य घटनांबद्दल लिहिताना डॉ. अतुल गवांदे आपल्या मनाची अशी काही पकड घेतात की वाटते, वैद्यकशास्त्रविषयाची माहिती मिळवण्यासाठी ते त्याचीच चिरफाड करत आहेत. खरं पाहता, सर्वसामान्यांच्या मनात या शास्त्राविषयी एक प्रकारची उदात्ततेची भावना असते. गवांदे मात्र आपल्यासमोर वास्तव ठेवतात, ते त्याच्या मूळ स्वरूपात. हे वास्तव अत्यंत गुंतागुंतीचे असते, गोंधळात टाकणारे असते आणि कमालीचे मानवी असते.

ज्या वेळी हे शास्त्र संदिग्ध स्वरूपाचे असते, उपलब्ध माहिती अगदी मर्यादित असते, जोखमीचे प्रमाण मोठे असते अन् तरीही निर्णय घेणे अपरिहार्य होऊन बसते, तेव्हा गवांदे आपल्यापुढे सगळी परिस्थिती उघडपणे मांडतात, कसलीही लपवा-छपवी करत नाहीत.

रुग्णांच्याच नव्हेत; तर डॉक्टरांच्या नाट्यपूर्ण कथाही ते आपल्याला सांगतात तेव्हा त्यामागचा हेतू सत्यशोधनाचा आहे, असे जाणवते. डॉक्टरांच्या हातून घडणाऱ्या चुकांमागची कारण

ते आपल्याला प्रामाणिकपणे सांगतात, चांगल्या शल्यविशारदांना रसातळाला नेण्यामागील कारणांची ते शहानिशा करतात, अनाकलनीय असे वास्तव समोर ठाकल्यानंतर वैद्यकीयशास्त्र त्याला कशा प्रकारे तोंड देते, हे प्रश्न सामान्य वाचकांना गवांदे यांनी सांगितल्यामुळेच कळतात, असे म्हणता येईल.

- **‘हलचल’चे प्रकाशन**

“आत्मचरित्र हे कधीही पूर्ण सत्य नसते, असे म्हटले जाते. मात्र, मानवी व्यवहार कधीही संपूर्ण सत्य नसतो. त्यामुळे आत्मचरित्र आस्वादकाच्या भूमिकेतून वाचावे, संशोधकाच्या भूमिकेतून नाही,” असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी ह.ल. निपुणगे यांच्या ‘हलचल’ या आत्मकथनाच्या प्रकाशन समारंभामध्ये व्यक्त केले.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव, ‘लोकसत्ता’चे निवासी संपादक मुकुंद संगोराम वगैरे उपस्थित होते.

या वेळी डॉ. कुलकर्णी म्हणाले, “आत्मचरित्र खरं की खोटं याचा शोध घेण्यापेक्षा, त्याच्या वाचनाचा आस्वाद घ्यावा. वाचकाने तारतम्य बुद्धी वापरली की आत्मचरित्रातील खरे-खोटेपण त्याला कळून येते. आत्मचरित्र वाचताना वाचक तन्मय होतो. निपुणगे यांची आई ही या आत्मकथनाचा मूलाधार आहे. मुलाच्या शिक्षणासाठीची तिची तळमळ अस्वस्थ करते.” डॉ. यादव म्हणाले, “बहुतेक वेळा आत्मचरित्र हे आत्मस्तवन असते. मात्र, निपुणगे यांच्या आत्मचरित्रामध्ये तसे दिसत नाही. त्यांची जडण-घडण कशी झाली हे समजून घेण्यासाठी हे आत्मचरित्र वाचायला हवे.”

संगोराम म्हणाले, “प्रकाशन व्यवसायात असताना, आपले नाते हे सर्जनशील लेखकांशी आणि वाचकांशी आहे, याची जाण निपुणगे यांनी ठेवली. त्यांच्या या आत्मचरित्रामधून माणूसपणाचे छान दर्शन होते. मराठी प्रकाशन संस्था या व्यक्तिकेंद्रित आहेत. कंपनी व्यवस्थापन हे सध्या प्रकाशन व्यवसायात नाही. प्रकाशन संस्था टिकवण्यासाठी तिला संस्थात्मक स्वरूप देणे आवश्यक आहे, याबाबतचे मार्गदर्शन या आत्मचरित्रातून होईल.”

- **‘आवर्त’ कवितासंग्रहाचे प्रकाशन**

कवी बाबू फिलीप डिसोजा यांच्या ‘आवर्त’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन नुकतेच झाले. या वेळी गझलकार ए. के. शेख. डॉ. सुरेश बेरी, ज्येष्ठ पत्रकार धनंजय सिंहासने उपस्थित होते. ‘विविध विषय, स्वभाववैशिष्ट्ये, निसर्ग वर्णन, जीवनाचे तत्त्वज्ञान आणि अध्यात्मचिंतन यांमुळे या कविता जीवनानंद देत मन प्रफुल्लित करतात,’ असे सिंहासने यांनी सांगितले. गायिका चारुशीला बेलसरे यांनी या कवितासंग्रहातील काही कविता संगीतबद्ध करून सादर केल्या. तसेच श्रीकांत उदास, उषा कांबळे, माधुरी बाबू डिसोजा, सुप्रिया कुमठेकर, सुनीता भालेराव यांनी कवितांचे अभिवाचन केले. समाजाचे बंधन नसते. तो मुक्तपणाने कल्पनाविश्वात रममाण होत असतो. या कवितासंग्रहातील कविता म्हणजे असाच

मुक्ताविष्कार आहे.' डॉ. आसावरी पाटणकर यांनी कथक नृत्याची मैफल सादर केली. त्यांना चिन्मय कोल्हटकर यांनी हार्मोनियम आणि पं. आझाद यांनी तबला साथ केली. अस्मिता चौगुले यांनी सूत्रसंचालन केले.

- **'माझी जीवनयात्रा' आत्मचरित्राचे प्रकाशन**

'आयुष्याच्या एका टप्प्यावर आल्यावर भोगलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी जेव्हा इतरांना सांगाव्याशा वाटतात, तेव्हा माणूस आत्मचरित्र लिहितो,' अशी भावना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केली.




**६ वी आवृत्ती**

# बारी

**रणजित देसाई**

**किंमत : १५०/-रु. पोस्टेज :२५/-रु.**

कथाकार म्हणून साहित्यिक कारकीर्द सुरू करणाऱ्या श्री. रणजित देसाईंची ही पहिलीच कादंबरी.

कथा व कादंबरी हे साहित्यप्रकार मूलत:च भिन्न प्रकृतिधर्माचे आहेत. त्यामुळं या दोन्ही साहित्यप्रकारांवर प्रभुत्व असलेले सव्यसाची ललित-लेखक हाताच्या बोटांवर मोजण्याएवढेच आढळतात. श्री. रणजित देसाई त्यांपैकीच एक आपल्या दृढपरिचयाचा भौगौलिक भाग त्यांनी या कादंबरीकरता निवडला आहे. कोल्हापूर ते बेळगाव या रस्त्याच्या वाटेवर सुतगट्टी या नावाचं गाव लागतं. तिथून काकती गावापर्यंतची पंधरा-वीस मैलांची, अगदी दाट गहिऱ्या जंगलानं वेढलेली वाट 'सुतगट्टीची बारी' म्हणून ओळखली जाते. भर दुपारीही अंधारून यावं, असा हा भाग. त्या बारीची, त्या जंगलाच्या आसऱ्यानं वाढणाऱ्या बेरड जमातीची ही कथा आहे.

शकुंतलादेवी नाईक यांच्या 'माझी जीवनयात्रा' या आत्मचरित्राचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ, ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज, डॉ. के. एच. संचेती आदी उपस्थित होते. कुमावत समाजात विशेष कामगिरी करणाऱ्यांचा आणि पाच आदर्श मातांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या शकुंतलादेवी यांनी आपला जीवनप्रवास प्रांजळपणे मांडला आहे. १८२० पासून चार पिढ्यांच्या परिवर्तनाचा इतिहास यात पाहायला मिळतो, असे निरीक्षण जाधव यांनी नोंदवले. 'अडाणीपणा कमजोर नसतो. जगतानाच मागे वळून पाहिले पाहिजे. आपली सावली दुसऱ्याला उपयोगी पडेल असे काम केले पाहिजे,' असे सिंधुताई म्हणाल्या.

- **मुरलीधर खैरनार यांना 'कुसुमाग्रज अभ्यासवृत्ती'**

साहित्यिक, नाट्यकर्मी आणि इतिहासाचे अभ्यासक मुरलीधर खैरनार हे नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या पहिल्या अभ्यासवृत्तीचे मानकरी ठरले आहेत. प्रतिष्ठानच्या वतीने यंदापासून एक लाख रुपयांची अभ्यासवृत्ती देण्यात येणार आहे. हौशी रंगभूमीवर १९७५ ते ८५ या कालावधीत ५० पेक्षा अधिक एकांकिका व नाटकांचे दिग्दर्शन, अभिनय, नाशिकमधून चार व्यावसायिक नाटकांची निर्मिती करून त्यांचे ४०० पेक्षा अधिक प्रयोग अशी खैरनार यांनी रंगभूमीची सेवा केली आहे. अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या स्थानिक शाखेचे खजिनदार व कार्यवाह म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. नाट्य परिषदेच्या नियामक मंडळावरही त्यांनी काम केले आहे. ११ वर्षे पत्रकारिता, १८ माहितीपटांची निर्मिती, १९७६ मध्ये आणीबाणीविरुद्ध सत्याग्रहात सहभाग व तुरुंगवास, १९८५ ते ८७ या कालावधीत शेतकरी संघटनेचे पूर्णवेळ काम, १० वर्षांपासून ते अभ्यासशास्त्र या विषयावर सो सिंपल हा कार्यक्रम करीत आहेत. त्यांनी ईव्हेंट नावाची कांदबरी लिहिली आहे. अभ्यासवृत्तीचा कालावधी १ वर्षाचा आहे.

- **'मालती माधव'मध्ये स्वरशब्दांचा सोहळा**

'मालती माधव'मधील पुलंच्या घरी त्यांच्या स्मृतिदिनी काही ना काही कार्यक्रम होत असत. सुनीताबाईंच्या निधनानंतरच्या यंदाच्या वर्षीही त्यांचे मानसपुत्र डॉ. दिनेश ज्योती ठाकूर मुद्दाम पुण्यात आले. 'माई आते'च्या घराची निगुतीने काळजी घेणारे हे दाम्पत्य त्या दिवशी तेथे आले.

दुपारी मुकूल शिवपुत्र, अरुणा ढेरे, नंदा पैठणकर वगैरे आले. हळूहळू

गप्पांची मैफल रंगायला लागली. त्यात रंग भरण्यासाठी मुकूल शिवपुत्रांना हवी असणारी तंबोऱ्याची संगत होतीच. तबलजी ऐवजी साधा डग्गा तरी हवाच, असं म्हणताच ज्योती ठाकुरांनी तोही आणला.

आधी काहीही न ठरवता अनोख्या आणि अद्‌भुत स्वरानुभवाची मैफिल जमायची. त्या घरात अगदी भल्या पहाटे दारावरची टकटक करणारे मल्लिकार्जुन मन्सुर असायचे किंवा रात्री उशिरापर्यंत शब्दसुरांचा उत्सव साजरा करण्यासाठी साक्षात कुमार गंर्धव हजर असायचे. हे गणगोत पुलंच्या संगीत आणि साहित्यावरील प्रेमानं जमवलेलं होतं. मुकूल शिवपुत्रांनीही आपल्या पिताश्रींची ही परंपरा पुढे चालू ठेवली. दुपारपासून सुरू झालेली ही मैफल रात्री अकरापर्यंत चालली. पुलंच्या साऱ्या जुन्या स्मृती पुन्हा एकदा जाग्या केल्या.

- **'विचारी मना'चे प्रकाशन**

मन म्हणजे काय....विचार म्हणजे काय.. ठराविक व्यक्ती ठराविक वेळी कसे वागायचे हे कसे ठरवते... या सर्व प्रश्नांची सांगोपांग चर्चा झाली. आणि उलगडले 'विचारी मना'चे अंतरंग!

डॉ. अनिल गांधी यांनी लिहिलेल्या 'विचारी मना' या पुस्तकाचे प्रकाशन 'दिव्य मराठी'चे मुख्य संपादक कुमार केतकर यांच्या हसते झाले. ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. ह.वि. सरदेसाई, ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. के. एच. संचेती, डॉ. अनिल गांधी, उन्मेष प्रकाशनच्या मेधा राजहंस, डॉ. शैलेश गुजर अगदी या वेळी उपस्थित होते.

ह. वि. सरदेसाई म्हणाले, ''व्यक्तीच्या ८५ टक्के शारीरिक तक्रारींचा उगम तिच्या अस्वस्थ मनात असतो, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अभ्यासात म्हटले आहे. मन म्हणजे मेंदूच्याच कामाचा एक भाग असल्याचे आधुनिक वैद्यकशास्त्राचे मत आहे. विचारांची व्याख्या करणे अवघड आहे. पण विचार म्हणजे प्रज्ञेवर आलेला स्थलकालबद्ध आणि बोधपूर्ण तरंग असतो. 'चांगले' व्हायचे की 'सशक्त' व्हायचे हा माणसाला पडणारा नेहमीचा प्रश्न आहे. संपत्ती, ज्ञान, अधिकार, वर्चस्व या सगळ्या गोष्टी सशक्त होण्याशी संबंधित आहेत. चांगले होण्याची भावना अधिकार नाही पण समाधान देते. यातील जे मूल्य आपण मानू त्यावर आधारित निर्णय आपली बुद्धी घेते.''

केतकर म्हणाले,''एकाच वातावरणात वाढवलेल्या दोन व्यक्ती स्वभावाने अगदी भिन्न कशा असू शकतात, याचा अभ्यास करणे मोठे मनोरंजक आहे. एखादी व्यक्ती अमूक एकाच पद्धतीने का वागली किंवा वागते यावर अधिक अभ्यास होणे गरजेचे आहे.'' नंदू राजहंस यांनी आभार मानले.

■■■




२ री आवृत्ती

# गोष्टीच गोष्टी

लेखक **द. मा. मिरासदार**

**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज :२५/-रु.**

जादू-बिदू काही नसते; सगळी बनवाबनवी असते, हे दाखविण्यासाठी
बाबू बनला भोकरवाडीतील 'जादूगार'!
हॉटेलमध्ये चोरी झाल्याची कम्प्लेंट बजाबाने दिली, मात्र 'चोरी झालीच नाही',
असेही लिहून दिले!
भोकरवाडीतील 'गावगुंडी'ला कंटाळून नव्या शिक्षिकेने गावच सोडले!
रामाच्या वाट्याला आलेला 'वनवास' बाबू आणि चेंगट्याच्या
वाट्यालाही आला!
सरकारने वटहुकूम काढून 'भ्रष्टाचार' कायदेशीर ठरवला,
पण बाळू सरकारी नोकर असल्यामुळे त्याचे काम दुप्पट झाले!
बापू पाटलाच्या मुलाचा 'दत्तक-विधी' तर झाला, पण बाबू आणि
चेंगटाने घोटाळा केला!
चौथीच्या गणिताचा मारकुट्या मास्तरांचा 'तास',
एकदा दगडू गवळीने घेतला!
शिवा जमदाडे, रामा खरात, गणामास्तर, नाना चेंगट आणि बाबू पैलवान
ही सर्व 'कंपनी' 'ट्रिप'ला निघाली!
अशा या सर्व गोष्टी म्हणजे गमती... उपहास...
उपदेश... बोचरी टीका अन् व्यथाही...
हेच आहे 'गोष्टीच गोष्टी'चं सूत्र!




२ री आवृत्ती

# भोकरवाडीतील रसवंतीगृह

लेखक **द. मा. मिरासदार**

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

दुकानदारीची सदोबांची काय कल्पना होती, कोण जाणे! गिऱ्हाईक वाढवण्यासाठी नित्य काही नवे करावे लागते, निरनिराळ्या योजना आखाव्या लागतात, दुकानाची आकर्षक सजावट करावी लागते, या गोष्टी त्यांच्या गावीही नव्हत्या. अर्थात हा त्यांचा दोष नव्हता. गावचे वातावरणच तसे होते. सगळेच दुकानदार एकाच छापातले गणपती होते. दुकान मांडून बसायचे, गिऱ्हाईक आले तर सौदा करायचा, नाही आले तर निवांत बसायचे. मुद्दाम कसलीही हालचाल करायची नाही, अशीच एकूण पद्धत होती. आधुनिक विक्रीकलेचा गंधही त्या काळात गावाला नव्हता. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. भरभराटीची आणि सुबत्तेची काही वर्षे संपली.

गिऱ्हाईक कमी-कमी होत गेले. फार हाल झाले त्याचे...

शेवटी सदोबा नेवासकर अन्नान्न करीत मेला!



# पुरस्कार

## • लीडिया डेव्हिस यांना मॅन बुकर

यंदाचा मॅन बुकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार अमेरिकी लेखिका लीडिया डेव्हिस (वय ६५) यांना मिळाला आहे. हा पुरस्कार ६० हजार पौंडांचा आहे. त्यांची 'द एंड ऑफ द स्टोरी' व 'व्हरायटीज ऑफ डिस्टरबन्स' यांसारखी लघुकथांची पुस्तके गाजली आहेत.

पाचव्या मॅन बुकर पुरस्काराच्या अंतिम नामांकनाच्या यादीत विख्यात कन्नड लेखक यु. आर. अनंतमूर्ती, चिनी लेखक यान लियांकी आणि रशियाचे वाल्दिमीर सीराकीन यांचाही समावेश होता.

## • विश्वंभर चौधरी यांना पर्यावरण भूषण पुरस्कार

'पुण्याचा डीपी म्हणजे बुद्धिभ्रम आहे. एफएसआय वाढवले जात आहेत, आरक्षणे उठवली जात आहेत. सिमेंट काँक्रिट म्हणजे विकास आहे का?' असा सवाल सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एन्व्हायरन्मेंट क्लब ऑफ इंडिया, पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा पर्यावरण भूषण पुरस्कार चौधरी यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माजी सचिव डॉ. दिलीप बोराळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी 'एन्व्हायरन्मेंट क्लब ऑफ इंडिया'चे विश्वास मुंडे, मुकुंद परदेशी, प्रादेशिक अधिकारी पंडित बारबोले, डी. टी. देवळे आदी उपस्थित होते.

विकासाच्या नावाखाली विस्थापित होणाऱ्यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारत असल्याचे सांगत चौधरी म्हणाले, 'पर्यावरणाचा विचार हा प्रदूषणापुरता न राहता नैसर्गिक संसाधनांशी जोडला गेलाच पाहिजे. प्रदूषणाबरोबरच संसाधनांची लूट ही मोठी समस्या आहे.'

• **विक्रम गोखले यांना जीवनगौरव**

२८ जून रोजी पणजी येथे झालेल्या गोवा मराठी चित्रपट महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विक्रम गोखले यांनी मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत आपला ठसा उमटवला आहे. त्यांच्यासारख्या अनुभवी आणि ज्येष्ठ कलाकाराचा गौरव करण्याची संधी आम्हाला मिळाली हा आमचा सन्मान असल्याचे चित्रपट महोत्सवाचे आयोजक संजय शेट्ये यांनी सांगितले.

या चित्रपट महोत्सवात १५ चित्रपट दाखवण्यात आले. तसेच गजेंद्र अहिरे यांच्या 'पोस्टकार्ड' या चित्रपटाचा प्रीमियर झाला.

• **पालिकेतर्फे श्री. द. महाजन यांचा मानपत्र देऊन सत्कार**

अवतीभवती दिसणारी झाडे जगतात तरी कशी, त्यांना किती पाणी लागते, कोणती फुले येतात, फळांचा हंगाम, झाडांचा इतिहास इथपासून ते त्यांची तांत्रिक शास्त्रीय माहिती सोप्या पद्धतीने सांगून 'बापू'नी आम्हाला वनस्पतीप्रेमी कधी बनवले हे कळालेच नाही. वनस्पतींच्याच विश्वात रमणाऱ्या महाजन सरांनी आम्हालाही या विश्वाकडे आकर्षित केले आहे... अशा शब्दांत वनस्पती तज्ज्ञ प्रा. श्री. द. महाजन यांचा जीवनप्रवास त्यांच्या चाहत्यांनी उलगडला.

पर्यावरण दिनानिमित्त पुणे महापालिकेतर्फे ज्येष्ठ वनस्पती तज्ज्ञ प्रा. श्री. द. महाजन यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. महापौर वैशाली बनकर यांनी महाजन यांचा सन्मान केला. या वेळी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. एरक भरूचा, खासदार वंदना चव्हाण, नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे उपस्थित होत्या.

'वनसंपदेतील एखादा घटक घेऊन अनेकजण अभ्यास करीत असतात पण महाजन सर म्हणजे वनस्पतीचा विश्वकोशच,' असे मत डॉ. भरूचा यांनी व्यक्त केले.

पर्यावरणवादी आणि विकासवादी या दोन विचारांमधील दरी वाढते आहे. खरे तर पर्यावरण हे विज्ञान आहे. त्यामुळे कोणतीही विकासाची कृती करताना, त्याचा अभ्यास झाला पाहिजे, असे मत महाजन यांनी व्यक्त केले.

• **मसाप पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने वार्षिक ग्रंथ व ग्रंथकार पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या वर्षी ग्रंथकार पुरस्कार डॉ. यशवंत पाठक, आशुतोष जावडेकर, यांना देण्यात आले. वार्षिक ग्रंथ पारितोषिक ॲड. वि. पु. शिंत्रे, अरविंद व्यं.

## नवे कोरे




# शब्दवेध

लेखक
**प्रा. डॉ. चंद्रकांत सहस्रबुद्धे**

**किंमत : १००/-रु.**
**पोस्टेज: २५/-रु.**

मुळाक्षरे ही भाषा, समाज, संस्कृती यांची आधारस्तंभ असतात. काही अपवाद सोडल्यास एकेकटी अक्षरे तशी अर्थहीनच! दोन वा अधिक अक्षरांचा अर्थवाही संच म्हणजे 'शब्द'.
दोन वा अधिक अक्षरांचे अर्थहीन संचदेखील अगणित असतात. त्यामुळे शब्द कसे तयार झाले असतील, कोणी बनवले असतील, याचे कुतूहल आपल्याला असतेच.
काही निरर्थक अक्षरसंचांना अर्थ मिळतो व नवे शब्द तयार होतात. एका भाषेतला अर्थहीन अक्षरसंच दुसऱ्या भाषेत शब्द असू शकतो. काही-काही शब्द वा अक्षरसंच वाचल्यावर कुतूहल चाळवले जाते, जसे 'मरुला', 'टाटुराना', 'योक्टो', 'अँटार्क्टिक स्टेअर' वगैरे.
शब्दांचा अर्थ कळला, त्यातले विज्ञान कळले की, गंमत वाटते; मनोरंजन होते व शब्दांची भुरळही पडते.
अशाच काही शब्दांचा हा मनोरंजक शब्दवेध...




२६ वी आवृत्ती

# पार्टनर

## व.पु.काळे

**किंमत : १३०/-रु.**

**पोस्टेज : २५/-**

तुला मी हाक कशी मारू?
पार्टनर ह्याच नावाने.
आपल्याला खरं तर नावच नसतं.
बारशाला नाव ठेवतात ते देहाचं.

पोरगी म्हणजे झुळूक.
अंगावरून जाते.
अमाप सुख देऊन जाते.
पण धरून ठेवता येत नाही.

आपल्याला हवा तेव्हा.
तिसरा माणूस न जाणे.
हाच नरक!

लक्षात ठेव दोस्त,
तुला मी हवा आहे
म्हणून मला तू हवा आहेस.

गोखले, छाया महाजन, सुहास मंत्री, डॉ. पां. ह. कुलकर्णी, डॉ. संदीप केळकर, डॉ. मुहम्मद आजम, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. इंदुमती अरकडी, अन्वर राजन, डॉ. पुष्पा भावे, अमोल वाघमारे, मोहन आपटे, उत्तम कांबळे, सुलभा ब्रह्मनाळकर आणि श्रीनिवास भणगे यांना देण्यात आले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वाटचालीत योगदान देणारे म. श्री. दीक्षित, डॉ. वि. भा. देशपांडे, ह.ल. निपुणगे यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

डॉ. शेजवलकर म्हणाले, ''गेल्या तीसचाळीस वर्षांपासून साहित्य निर्मितीला चालना मिळाली आहे. शोषित, पीडित वर्गातून उत्तम साहित्य निर्मिती होताना दिसत आहे. साहित्य निर्मितीबरोबरच उत्तम वाचक घडवण्यासाठी 'गाव तेथे ग्रंथालय' सारख्या योजना अमलात आणणे आवश्यक आहे.''

विदर्भ, मराठवाडा, गोवा या ठिकाणच्या मराठी साहित्यिकांसाठीही विशेष पुरस्कार ठेवण्यात यावेत, असे मत श्रीनिवास पाटील यांनी व्यक्त केले.

- **मंगेश पाडगावकर यांना 'म.सा.प. सन्मान पुरस्कार'**

''मनुष्यत्व आणि कवित्व यांचा ज्याच्यात संगम असतो तो खरा कवी! या संगमामुळेच संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांना खऱ्या अर्थाने युगप्रवर्तक कवी म्हणतात. आधुनिक काळात मंगेश पाडगावकर यांची कविता तशी आहे. त्यांच्यातील माणसाने त्यांच्यातील कवीवर कधी कुरघोडी केली नाही.'' असे मत संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०७व्या वर्धापनदिनानिमित्त ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांना मोरे यांच्या हस्ते 'म.सा.प. सन्मान पुरस्कार' प्रदान करून गौरवण्यात आले.

ज्येष्ठ लेखक डॉ. अशोक कामत यांना या वेळी 'भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' प्रदान करण्यात आला. डॉ. प्र.चिं. शेजवलकर, कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, प्रकाश पायगुडे, कार्यकारी विश्वस्त डॉ. शिवाजीराव कदम, उल्हास पवार या वेळी उपस्थित होते.

मोरे म्हणाले, ''पाडगावकर सौंदर्यवादी आहेत. त्यांना निसर्गाची ओढआहे. त्यांनी कवितेत सामाजिक समीक्षाही केली. 'कवीमधील माणूस वारंवार त्याच्यातील कवीवर आक्रमण करीत असतो. त्यामुळे कवी होणे फार जोखमीचे काम असते, असे कवी बा. भ. बोरकर म्हणत. पाडगावकर यांच्यातील माणसाने त्यांच्यातील कवीवर कधी मात केली नाही. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट ही त्रिमूर्ती मराठी कवितेतील ब्रम्हा, विष्णू आणि महेशच आहेत!''

डॉ. अशोक कामत यांनी पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासन उभे

केले. संतांच्या काव्याचा अभ्यास होतो पण संतांच्या कार्याचा अभ्यास होत नाही. त्यामुळे संत हे सामान्यांच्या जीवनात कसे मार्गदर्शक ठरतील याचा मागोवा घेतला पाहिजे  असे मत कामत यांनी व्यक्त केले.

- **सूर्यकांत पाठक यांना 'व्यापारभूषण' पुरस्कार**

स्टेशनरी, कटलरी अँड जनरल मर्चंट्स असोसिएशनतर्फे 'ग्राहकपेठ'चे कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक यांना यंदाचा 'व्यापारभूषण' पुरस्कार, खडकी येथील 'पूना जनरल स्टोअर्स'चे नानकचंद रावळ यांना उत्कृष्ट दुकान, 'नया संसार'चे अशोक महाबळेश्वरकर यांना उत्कृष्ट विक्रेता, 'ज्योती गॅस ॲप्लायन्सेस'चे प्रफुल्ल देसाई, 'कृष्णा कलेक्शन'च्या मनीषा ठक्कर यांना उत्कृष्ट महिला व्यापारी पुरस्कारांसह व्हॅनच्या माध्यमातून विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या अश्विनी नामजोशी यांना साधना गोरे स्मृती पुरस्कार देण्यात आले. माजी खासदार श्रीनिवास पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी याप्रसंगी उपस्थित होते.

- **नाट्य परिषदेचे पुरस्कार**

ज्येष्ठ रंगभूषाकार प्रभाकर भावे, ज्येष्ठ अभिनेत्री ललिता देसाई, लेखिका दिग्दर्शिका सुषमा देशपांडे, अभिनेत्री मृण्मयी देशपांडे व दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पुणे शाखेतर्फे पुरस्कार टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित देण्यात आले.

**पुरस्कार विजेते :**

**उत्कृष्ट नाट्यनिर्मिती** (राज्य नाट्य स्पर्धा): ध्यास पुणे

**उत्कृष्ट नाट्यनिर्मिती** (कामगार कल्याण स्पर्धा): कामगार कल्याण केंद्र, कसबा पेठ.

**उत्कृष्ट दिग्दर्शक** (राज्य नाट्य स्पर्धा): श्रीकांत भिडे,

**उत्कृष्ट दिग्दर्शक** (कामगार कल्याण): विवेक सरस्वते.

**उत्कृष्ट गद्य नट** (राज्य नाट्य): आशिष गिरमे.

**उत्कृष्ट अभिनय स्त्री** (कामगार कल्याण): स्वरदा राडकर.

**पार्श्वनाथ आळतेकर पारितोषिक उत्कृष्ट व्यावसायिक नाट्य दिग्दर्शक** : निपुण धर्माधिकारी.

**नाट्यलेखन** : सुषमा देशपांडे.

**ऐतिहासिक संगीत नाट्य** : आनंद पानसे.

**बालकलाकार** : साक्षी तिरुगावकर

**लोकनाट्यातील विनोदी कलावंत** : विजय राऊत
**उदयोन्मुख संगीत** : प्रियदर्शनी कुलकर्णी
**रंगभूमी अथवा त्रिपट विनोदी कलाकार** : अतुल कासवा.
**पडद्यामागील कलाकार** : सदाशिव कांबळे
**रमाबाई गडकरी स्मृती पारितोषिक** : शोभा उदयन काळे
**नाटक समीक्षक** : विनायक लिमये
**परिषद शाखा कार्यकर्ते** : प्रभाकर तुंगार
**सुनील तारे पुरस्कार** : मृण्मयी देशपांडे
**गिरीश आचरेकर रंगभूमीवरील प्रदीर्घ सेवेबद्दल** : माधव मोडक
**उत्कृष्ट गद्य नट, नटवर्य केशवराव दाते पुरस्कार** : उदय लागू
**नेपथ्यकार पु. श्री. काळे स्मृती पारितोषिक** : प्रदीप गिरी.

- **उमेद पुरस्कार**

'वरदलक्ष्मी चित्र'तर्फे जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते वहिदा रहमान, अभिनेते दिलीप प्रभावळकर, अशोक समर्थ, अभिजित खांडकेकर, भार्गवी चिरमुले आणि पार्श्वगायिका उषा उथ्थप यांना 'उमेद पुरस्कार' प्रदान करण्यात आला, उद्योजक अनिरुद्ध देशपांडे आणि संस्थेचे महेश टिळेकर या प्रसंगी उपस्थित होते.

'ढगाला लागली कळ' आणि 'बिंदिया चमकेगी' यासह आगामी खो खो चित्रपटातील गीताचे उषा उथ्थप यांनी केलेले गायन... दिलीप प्रभावळकर यांनी 'लगे रहो मुन्नाभाई'तील 'बापूं'ची करून दिलेली आठवण.. अभिजित खांडकेकर आणि भार्गवी चिरमुले यांनी घेतलेले उखाणे.. 'गाइड' चित्रपटातील देव आनंद यांचे संवाद या चित्रपटाची नायिका वहिदा रहमान यांच्याकडून ऐकताना 'आज फिर जीने की तमन्ना है' अशीच रसिकांची भावना झाली.

कलाकाराला जात, धर्म आणि पक्ष नसतो. कलाकार हा केवळ कलाकारच असतो, अशी भावना वहिदा रहमान यांनी व्यक्त केली. ''देव आनंद यांच्याबरोबर 'सीआयडी' हा पहिला चित्रपट केला. त्यानंतर सात चित्रपटांत आम्ही एकत्र असल्याने आमचे 'ट्यूनिंग' जमले. 'मदर इंडिया' चित्रपट करायला आवडला असता. मी तरुण असते तर 'जब वुई मेट' केला असता'' असेही त्यांनी सांगितले.

नेते आणि अभिनेते यात श्रेष्ठ कोण असे विचारले असता दिलीप प्रभावळकर म्हणाले, नेते हेच श्रेष्ठ अभिनेते असतात. आम्ही देखील त्यांना शरण जातो.

'दम मारो दम' हे गीत पूर्वी माझ्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आले होते. मात्र, चित्रपटामध्ये हे गीत आशा भोसले यांच्या स्वरामध्ये आहे. आर. डी. बर्मन

यांनी माझ्यासाठी गीत तयार असल्याचे सांगितले आणि 'हरे राम हरे कृष्ण' हे गीत माझ्या आवाजात स्वरबद्ध झाले. आपल्या हातून अशी बराच गाणी हिसकावली गेली खंत उषा उथ्थप यांनी व्यक्त केली.

- **सावरकर पुरस्कार**

"उत्तुंग ध्येयवाद असणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आपल्या समग्र वाङ्मयातून विज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. आहे. त्यामुळेच विज्ञाननिष्ठ सावरकरांचे विचार आणि कल्पना अत्यंत प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार आजच्या पिढीने अंगीकारले पाहिजेत," असे मत संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

'निनाद' संस्थेतर्फे उषा केसरी यांच्या स्मरणार्थ उषा केसरी यांच्या स्मरणार्थ





**१०वी आवृत्ती**

# माझ्या बापाची पेंड

**द.मा.मिरासदार**

**किंमत : १३०/-रु. पोस्टेज :२५/-रु.**

शेंगदाण्याची पेंड... 'माझ्या बापाची पेंड' बनल्यामुळे उडालेला सावळागोंधळ.... अनंता व केशव या शाळकरी मुलांमध्येही निर्माण झालेला 'भावकी'तला तेढ.... स्वत:च्या अन् दुसऱ्याच्याही आयुष्याला अर्थ प्राप्त करून देणारी, नाना घोडकेची 'नव्याण्णवबादची एक सफर'.... आई-बापाविना वाढलेल्या 'सोन्या बामणा'ची अधोगती.... मुलाच्या मृत्यूनंतरही कोरडा राहणारा 'रानमाणूस'... शिष्याने गुरूलाच व्यवहारिक धडे देणारी 'व्यंकूची शिकवणी'... 'हरवल्याचा शोध;' पण...?

आयुष्यातील अशी बोच विनोदी अंगाने मांडणारी
द. मा. मिरासदारांची आणखी एक मिरासदारी!

देण्यात येणारा 'ध्येयवादी स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' डॉ. भटकर यांच्या हस्ते 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांना प्रदान करण्यात आला. 'आर्मामेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट'चे (एआरडीई) संचालक अनिल दातार, महापालिका उपायुक्त सुनील केसरी, पं. वसंतराव गाडगीळ, मयुरेश जोशी व किशोर खैराटकर या वेळी उपस्थित होते.

डॉ. भटकर म्हणाले, "जहाल विचार व उत्तुंग ध्येयवाद असणाऱ्या महापुरुषांचे विचार आपल्या जीवनात अंगीकारायला हवेत. शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना विद्यार्थ्यांना महापुरुषांचे विचारही ज्ञात होणे गरजेचे आहे. एकविसाव्या शतकामध्ये वैदिक संस्कृतीची पुनर्स्थापना होईल असे वाटते."

डॉ.कराड म्हणाले, "भारतीय संस्कृतीत आरंभापासूनच देशासाठी त्याग व समर्पणाची भावना असणारे महापुरुष दिसून येतील. त्यात डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, विवेकानंद व लोकमान्य टिळकांचे योगदान अमूल्य आहे." दातार व गाडगीळ यांनी मनोगत व्यक्त केले. उदय जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

- **दिलीप प्रभावळकर यांना 'कलागौरव' पुरस्कार**

"आजवर लहान मुलांसाठी अनेक भूमिका केल्या तशाच प्रौढांसाठीही केल्या. पण, या सर्व भूमिका मुलांमध्येच अधिक गाजल्या. लहान मुले हेच माझे मोठे प्रेक्षक आहेत. तरीही या मुलांना, बाल कलावंतांना सांगावेसे वाटते, की त्यांनी टीव्ही कमी पहावा आणि अभ्यास जास्त करावा..." असा संदेश अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी दिला.

नटरंग ॲकॅडमीच्या वतीने आयोजित समारंभात प्रभावळकर यांना आमदार गिरीश बापट यांच्या हस्ते शाहीर मधू कडू स्मृती कलागौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'मुले श्रोते म्हणून मिळाली, त्यामुळेच मला उत्तम संवादफेक शिकता आली.' असे सांगून ते म्हणाले, "रेडिओ, मालिका, चित्रपट अशा वेगवेगळ्या क्षेत्रात मी वावरलो. पण मी मूळचा रंगभूमीवरचाच कलाकार आहे हे कधी विसरणार नाही."

- **संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार प्रदान**

'परफॉर्मिंग आदर्स' च्या क्षेत्रात देशात सर्वोच्च असलेल्या दिल्लीतील संगीत नाटक अकादमीतर्फे वर्ष २०१२ साली जाहीर झालेले राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. शास्त्रीय गायनात ठसा उमटवणारे ज्येष्ठ गायक पंडित अजय पोहनकर, गायिका सुलोचना चव्हाण, दिग्दर्शक वामन केंद्रे आणि प्रायोगिक नाट्य चळवळीचे एक उपासक अरुण काकडे यांचा या

पुरस्कारविजेत्यांमध्ये समावेश आहे.

दिल्लीतील दरबार हॉलमध्ये हा पुरस्कार सोहळा पार पडला. परफॉर्मिंग आर्ट्सचा सर्वोच्च पुरस्कार आणि तोही राष्ट्रपतींच्या हस्ते मिळणे हा आपल्या आयुष्यातील अद्वितीय क्षण असल्याची प्रतिक्रिया वामन केंद्रे यांनी दिली. पुरस्कारामुळे आतापर्यंत केलेल्या कामाचे चीज झाले, हा पुरस्कार आपल्याबरोबर काम केलेल्या सगळ्यांचा आणि प्रेक्षकांचाही आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**• पहिल्या 'प्रभात पुरस्कारां'चे वितरण. 'धग' सर्वोकृष्ट**

''गुडलक हॉटेलच्या पायऱ्या हे आमचे अभिनय शिकण्याचे विद्यापीठ होते आणि डॉ. श्रीराम लागू त्या विद्यापीठाचे कुलगुरू होते. या विद्यापीठामध्ये आमच्या पिढीला जे काही शिकायला मिळाले, ते आम्हाला आयुष्यभर उपयोगी पडले,'' असे मनोगत ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी व्यक्त केले.

प्रभात एंटरप्रायझेसतर्फे भारतीय चित्रपटसृष्टीच्या शताब्दीचे औचित्य साधून पहिल्या 'प्रभात पुरस्कारा'चे वितरण करण्यात आले.

या वेळी डॉ. श्रीराम लागू यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.

दीपा लागू म्हणाल्या,''प्रभातचे चित्रपट संस्कृतीचे मानदंड आहेत, प्रभातने हा पुरस्कार दिल्याबद्दल डॉ. लागू ऋणी आहेत. पण त्याचबरोबर प्रभातच्या चित्रपटांमध्ये काम करू शकले नाहीत याचा त्यांना खेदही वाटतो.'' या प्रसंगी मंगला गोडबोले यांनी लिहिलेल्या 'दामलेमामा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रभातबरोबर बालकलाकार म्हणून काम केलेल्या वासंती पटेल, बेबी शकुंतला, यशवंत दामले, तसेच पी. के. नायर, इसाक मुजावर, शशिकांत किणीकर, शिरीष पै यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

उत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'धग' या चित्रपटास मिळाला. विक्रम गोखले (उत्कृष्ट अभिनेता, अनुमती), सचिन खेडेकर (उत्कृष्ट अभिनेता, काकस्पर्श), देविका दफ्तरदार (उत्कृष्ट अभिनेत्री, संहिता), शिवाजी लोटन पाटील (दिग्दर्शक, धग), मकरंद अनासपुरे (सहाय्यक अभिनेता, भारतीय), मृण्मयी देशपांडे (सहाय्यक अभिनेत्री, मोकळा श्वास) यांनाही पुरस्कार देण्यात आले.

**• 'टॅग'च्या पुरस्कारांचे वितरण**

''सर्जनशीलता जपण्यासाठी कलाकाराने कलेकडे छंद म्हणून पाहिले पाहिजे. काम सर्जनशील होण्यासाठी वेळ दिला पाहिजे,'' असे मत परिसर संस्थेचे संस्थापक विश्वस्त सुजित पटवर्धन यांनी व्यक्त केले.

'टॅग'तर्फे (ॲक्टिव्ह ग्रुप) आयोजित जाहिरात स्पर्धेचे पुरस्कार वितरण लेखिका व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्यामला वनारसे आणि पटवर्धन यांच्या हस्ते झाले. या वेळी आईज् ॲडव्हर्टायझिंगच्या सुमती दिघे, ईश्वर दिघे, विद्या बाळ आणि मारुती पाटील उपस्थित होते.

डॉ. वनारसे म्हणाल्या, ''आर्थिक उद्योग क्षेत्रातला उत्पादनानंतरचा पुढचा भाग म्हणजे जाहिरात क्षेत्र, गरजा पुरवणाऱ्या उत्पादनांची माहिती देणे, काही उत्पादन व सेवांसाठी गरज भासवून त्यासाठी मागणी निर्माण करणे, असे जाहिरातींचे प्रमुख कार्य असते.''

झेबेक कम्युनिकेशन्स, साकेत कम्युनिकेशन्स, क्विकसेल कम्युनिकेशन्स, डिझाईन ॲडिक्ट, कला कल्पना, क्वाडंट कम्युनिकेशन्स, न्यू होरायझन ॲडव्हर्टाइजिंग, वर्डस्मिथ कम्युनिकेशन्स, आर. जे. डिझाईन प्रायव्हेट लिमिटेड, जेनेसिस ॲडव्हर्टाइजिंग, रिव्हेल परफेक्ट मीडिया सोल्यूशन, अशोक जैन, समन्वय कम्युनिकेशन्स, प्रकाश ऑफसेट, पोरे ब्रदर्स, आर. जे. डिझाईन प्रायव्हेट लिमिटेड, सुभाष जमदाडे, न्युमेरोओनो कम्युनिकेशन्स, गजानन जोशी, निर्मिती ॲडव्हर्टायझिंग, सेतू ॲडव्हर्टायझिंग, मोना ॲडव्हर्टायझिंग यांना पुरस्कार मिळाले.

- **'पुण्यभूषण' सुधीर गाडगीळ**

'लहानपणापासून कीर्तनकार-प्रवचनकार, आचार्य अत्रे- पु.ल. देशपांडे अशा अनेकांकडून शब्दांच्या छटा शिकत गेलो. आता कुठे मैफलीत रंग भरण्यास सुरवात झाली आहे.' अशी भावना सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केली. पुण्यभूषण फांऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ यांना यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार शरद पवार आणि ख्यातनाम गायिका आशा भोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

महापौर वैशाली बनकर, माजी केंद्रीय मंत्री मोहन धारिया, फांउडेशनचे अध्यक्ष सतीश देसाई, राजेंद्र पवार आणि हिराभाई शहा हे या वेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात नारायण सुरसे, छगनलाल अनेचा, बाळकृष्ण मिरजकर, चंद्रकांत पायगुडे आणि गणपतराव गायकवाड या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरव करण्यात आला.

''माणूस या गोष्टींविषयी मला प्रचंड कुतूहल असल्यामुळेच मिळेल ते पुस्तक आणि भेटेल तो माणूस वाचत गेलो आणि त्यामुळेच मी यशस्वी झालो, यापुढील काळात शब्द फाउंडेशन या संस्थेची स्थापना करणार असून कुटुंबांमध्ये संवाद वाढविण्याचा प्रयत्न करणार आहे,'' असेही गाडगीळ म्हणाले.

'जन्म कोठेही घेतलेला असला, तरी पुण्यात काही काळ घालवून आपले कर्तृत्व गाजविलेल्याला पुणेकर आपलेसे मानतात,' अशा भावना केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केली. 'यापूर्वीचे पुण्यभूषण विजेते सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार कोल्हापूरचे, मोहन धारिया महाडचे आणि जब्बार पटेल दौंडचे; पण त्यांनी पुण्यात कर्तृत्व गाजविले; त्यामुळे जन्म कोठेही घेतलेला असला तरी पुणेकर त्यांना आपले मानतात,' असे पवार म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक देसाई यांनी केले. काका धर्मावत यांनी आभार मानले. समीरण वाळवेकर यांनी सूत्रसंचालन केले. आशा भोसले यांनी थेट गाडगीळ यांच्या हाती माइक दिला आणि त्यांची मुलाखत घेतली. अनेकांच्या फिरक्या घेणाऱ्या गाडगीळ यांना कोंडीत पकडणारे प्रश्न त्यांनी विचारले. 'तुमचा पक्ष कोणता,' असे विचारले असता 'रसिकांचा' असे डिप्लोमॅटिक उत्तर गाडगीळ यांनी दिले, तेव्हा 'याला म्हणतात मस्का मारणे..,' अशीर कोपरखळी आशाबाईंनी मारली. पूर्वीच्या पिढीतले एस. एम. जोशी- कॉम्रेड डांगे आणि या पिढीतील बाळासाहेब ठाकरे-शरद पवार हे आपले आवडते राजकारणी आहेत, असे गाडगीळ यांनी सांगितले.

त्यापाठोपाठ 'तुमचे आवडते गायक-गायिका-संगीतकार कोण,' असा गुगली आशाबाईंनी टाकला. तेव्हा 'लता मंगेशकर, मदनमोहन आणि आशा भोसले - आर. डी. बर्मन' असे उत्तर गाडगीळ यांनी दिले. 'म्हणजे लता मंगेशकर आवडतात,' असे आशाबाई म्हणाल्या, त्यावर 'तुम्हालाही त्याच आवडतात,' अशी टिपण्णी गाडगीळ यांनी केली. 'एकाबाबत आदर आहे आणि दुसऱ्याबाबत जिव्हाळा आहे,' असे गाडगीळ यांनी म्हणताच आशाबाईंनी पुन्हा 'आदर कोठे आणि जिव्हाळा कोठे आहे,' असा उपप्रश्न करीत धमाल उडवून दिली. 'आपण जसे नसतो, तसे दाखवितात, त्यामुळे अशा राजकारण्यांच्या मुलाखती घेणे आपल्याला अधिक आवडते,' असे गाडगीळ यांनी सांगितले.

■■■





**द माइंड जिम**

*व्यायमशाळा, पण मनाची...*

अनुवाद **श्याम भुर्के**

**किंमत : २००/-रु. पोस्टेज :२५/-रु.**

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी आवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे**

| |
|---|
| पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, कानपूर रोड, टिळकवाडी, बेळगाव -५९०००६. टेलिफोन क्र.(०८३१)-४२००६७६ |
| शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६ |
| शॉप नं.- जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद-४३१००६. |

अधिक माहितीसाठी

**www.wordpowerbookshop@gmail.com**

येथे संपर्क साधा.




## नवे कोरे

# हे सर्व आपल्याला कोठे नेणार?

मूळ लेखक- **अरुण शौरी**
अनुवाद - **अशोक पाथरकर**

**किंमत : ६००/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

"आग लागलेल्या घरात गडबड व गोंधळ माजतो. चौकीदार आणि इतर लोक आग विझवण्यात गुंतलेले असताना घरातील वस्तू चोरण्याची संधी चोर साधू शकतो... युद्धकाळात संकटाला तोंड देणारा किंवा घसरणीला लागलेला देश अगदी त्या आग लागलेल्या घरासारखा असतो. अशा स्थितीतील देशावर हल्ला केल्यास अर्ध्या प्रयत्नात दुप्पट यश मिळते...." 'The Wiles of War'

"जेव्हा अधिकाऱ्यांमध्ये गटबाजी होते, प्रत्येक जण आपल्या मित्राला वर आणण्याच्या प्रयत्नात असतो, चांगल्या व हुशार लोकांना डावलून बदमाश लोकांच्या नियुक्त्या करतो, स्वत:च्या फायद्यासाठी लोकांकडे पाठ फिरवतो, सहकाऱ्यांना बदनाम करतो – ह्याला अंदाधुंदीचा 'उगम' म्हणतात.

"जेव्हा कारस्थानी दुष्ट लोकांना शक्तिशाली घराणी गोळा करतात, तेव्हा ते कोणतेही अधिकारपद नसतानासुद्धा प्रख्यात होतात आणि त्यांच्या ताकदीमुळे लोक चळाचळा कापतात. लोकांची बारीक-सारीक कामे करून ते झाडाला विळखा घालणाऱ्या वेलीप्रमाणे त्यांना कायमचे अंकित करून घेतात; अधिकारपदावरील लोकांचे अधिकार बळकावून सामान्य माणसाला नाडतात. देशात गदारोळ माजतो, पण सरकारी मंत्री तो झाकून ठेवतात आणि त्याची माहिती देत नाहीत – ह्याला अंदाधुंदीचे 'मूळ' म्हणतात. "जेव्हा चांगल्या लोकांना 'चांगले' म्हणून मान्यता दिली जाते, पण त्यांना पदोन्नती दिली जात नाही; जेव्हा दुष्ट लोकांना ओळखूनसुद्धा बाहेर काढले जात नाही; जेव्हा भ्रष्टाचारी सत्तेत असतात आणि चांगल्या लोकांना देशोधडीला लावले जाते; तेव्हा देशाचे भयानक नुकसान होते."




# शॅपेल वस्तुस्थिती, पुरावा, सत्य

अमली पदार्थ बॅगेत सापडल्याने इंडोनेशियाच्या कारावासात
खितपत पडलेल्या तरुणीची दुर्दैवी कहाणी




मूळ लेखक **टोनी विल्सन**
अनुवाद **सुनीति काणे**

पृष्ठे **२२४।** २४० रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

टोनी विल्सन हे गुन्ह्यांचा शोध घेणारे, ठळक बातम्यांमागचे सत्य शोधून काढणारे शोध पत्रकार.

अनवधानाने झालेल्या क्षुल्लक चुकीमुळे, एक साधीशी सफर दु:स्वप्न ठरली. ह्या घटनेचा शोध आणि मागोवा घेणारं हे पुस्तक– शॅपेल, वस्तुस्थिती, पुरावा, सत्य.

तसा विचार केला तर ही ना कादंबरी, ना कहाणी. ही आहे सत्तावीस वर्षांच्या एका दुर्दैवी तरुणीची मन विषण्ण करणारी सत्यकथा. तिच्यातली वस्तुस्थिती खरी असली, तरी वास्तव मात्र भयानक चीड आणणारं आहे. सत्य पटत असलं, नव्हे त्याबद्दल खात्री असली, तरी त्या तरुणीला कोरडी सहानुभूती दाखवण्याव्यतिरिक्त, आपण तिच्यासाठी काहीही करू शकत नाही, ह्या अगतिकतेची ही कहाणी.

शॅपेलवर झालेल्या जगावेगळ्या अन्यायाची चीड आणणारी ही कहाणी बालीच्या देनपसार विमानतळावर सुरू होते, गोल्ड कोस्टवरच्या दुगूनमधल्या एका ऑस्ट्रेलियन विद्यार्थिनीला इंडोनेशियातल्या विमानतळावर कैद करण्यात येते कारण कस्टम ऑफिसरला एक्सरे स्कॅमध्ये, तिच्या बिनकुलुपाच्या बुगी बोर्ड बॅगेत एका प्लॅस्टिकच्या बॅगेत ठेवलेला चार किलो वजनाचा मारूजाना हा अंमली पदार्थ आढळतो. हा गुन्हा इंडोनेशियात मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्याइतका गंभीर मानला जातो.

शॅपेल ली कॉर्बी, तिचे आईवडिल, एक बहिण आणि एक भाऊ असे छोटेसे कुटुंब. श्रीमंत नसले तरी सुखात जगणारे. शॅपेलचे वडील मायकेल कॉर्बी प्रोस्टेटच्या कॅन्सरने आजारी होते. त्यांचं दुखणं शेवटच्या टप्प्यावर पोहोचलं होतं. मृत्यूच्या जवळ जवळ जात असलेल्या आपल्या वडिलांची, शॅपेल मनापासून आणि मायेनं शुश्रूषा करीत होती. ह्या कामातून थोडी विश्रांती मिळावी आणि बालीमध्ये राहणाऱ्या आपल्या बहिणीच्या – मर्सिडीसच्या तिसाव्या वाढदिवसाला उपस्थित राहावं म्हणून ती बालीला निघाली होती. तसेही तरुण ऑस्ट्रेलियन्सना बालीचं आकर्षण असल्यामुळे तिथे जाणे त्यांना अत्यंत प्रिय होते. त्याला कारणेही अनेक होती. मऊशार वाळूचे किनारे, स्वस्तात राहण्याची सोय, गजबजलेले नाईट क्लब्ज, बालीभोवतीच्या गूढरम्यतेचे आकर्षण आणि बरेच काही.

८ ऑक्टोबर २००४ ची गोष्ट. बालीला जाण्यासाठी चार उत्साही ऑस्ट्रेलियन प्रवासी ब्रिस्बेनच्या डोमेस्टिक एअरपोर्टवर दाखल झाले. शॅपेल ली कॉर्बी– वय वर्षे २७. शॅपेलच्या आईच्या दुकानात काम करणारी १८ वर्षांची कॅटरीना रिचर्डस्, शॅपेलची रूम पार्टनर पंचविशीतली ऑलिथ मॅककोम्ब आणि शॅपेलचा १७ वर्षांचा सावत्र भाऊ जेम्स. ब्रिस्बेन विमानतळावर त्या सर्वांच्या

सामानाची तपासणी झाली. तिथून पुढे ते सिडनीला गेले. तिथेही त्यांच्या सामानाची तपासणी झाली. सिडनीच्या विमानतळावर त्या बॅग्ज इंटरनॅशनल विमानात गेल्या. त्यानंतर त्या बालीला जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन फ्लाईटवर चढवल्या गेल्या. ह्या वेळपर्यंत शॅपेलच्या सामानात काही आक्षेपार्ह वस्तू असल्याचे निदर्शनास आले नाही.

विमान बालीला पोहोचले आणि कस्टम अधिकाऱ्यांना शॅपेलच्या बुगी बोर्ड बॅगेत ४ किलो मारूजाना हा अंमली पदार्थ सापडला. हा मारूजाना माझा नाही, तो कुणीतरी दुसऱ्यानं तिथं ठेवला असावा असे ती जिवाच्या आकांताने सांगत होती.

पण पुराव्यासकट सापडल्यामुळे, इंडोनेशियाच्या मादक अंमली पदार्थांबाबतच्या नियमानुसार, शॅपेलला विमानतळावरच अटक करण्यात आली आणि तिची रवानगी पोल्डाच्या पोलीस मुख्यालयात करण्यात आली. ड्रग्ज ट्रॅफिकिंगमध्ये माहीर असलेल्या माफिया गँगचा तिथे बोलबाला होताच. कैद्याची लाच द्यायची तयारी आहे का? असल्यास तो किती पैसे देऊ शकेल? हे पडताळून पाहून त्याप्रमाणे त्याच्याकडून पैसे उकळायचे आणि त्याला त्याच्या मायदेशी गुपचुप रवाना करायचे. हे काम करणारी टोळी पोल्डाच्या पोलिस मुख्यालयातच कार्यरत होती. पण शॅपेलचा आपल्या निरपराधीपणावर पक्का विश्वास असल्यामुळे तिने ती वाट चोखाळलीच नाही.

तिथून तिची रवानगी केरोबोकनच्या तुरुंगात झाली. उद्वेगानं त्या कोठडीला ती पिंजरा म्हणते. कल्पनेनेही अंगावर शहारे आणणाऱ्या वातावरणात ती राहत होती. नरकयातना भोगत होती. आश्चर्याची बाब म्हणजे त्या अत्यंत अस्वच्छ कोठडीत राहण्यासाठी पैसे मोजावे लागत होते. इतकंच काय, पण पिण्याचं पाणी, जेवण, स्त्रियांच्या नित्य नैमित्तिक गरजा, डॉक्टरचे उपचार, औषधे ह्यासाठीही पैसे मोजावे लागत होते. तिची पत्रं आणण्यासाठी, पाठवण्यासाठी, भेटीसाठी, तिची ने-आण करण्यासाठीदेखील गार्डला पैसे मोजावे लागत होते. पैसे देऊ शकला नाहीत तर केरोबोकन तुरुंगात मृत्यू हमखास ठरलेला!

इथूनच तिच्या दुर्दैवी आणि काळवंडलेल्या आयुष्याची सुरुवात झाली. अपिलांवर अपिलं हेच तिच्या जगण्याचं उद्दिष्ट होऊन बसलं. तिच्यावर केला गेलेला आरोप धादांत खोटा असल्याचा निर्वाळा तिच्या मित्रमैत्रिणींनी, नातेवाईकांनी, संबंधितांनी छातीठोकपणे दिला. पण पुराव्यानिशी पकडली गेल्यामुळे प्रत्येक अपिलात ती हरतच गेली.

तिच्या नजरेसमोर उभा आहे काळोख आणि फक्त काळोखच, तिच्या कमनशीबाची साठा प्रश्नांची कहाणी पांचा उत्तरीसुद्धा सुफळ झाली नाही.

शॅपेलची अटक, तुरुंगवास, अपिलं यांचं भांडवल करून जास्तीत जास्त फायदा घेतला प्रसार माध्यमांनी. प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया यांनी शॅपेलवर आलेलं संकट चक्क कॅश केलं. तिच्याबद्दलच्या खऱ्या-खोट्या बातम्या, अफवा लोक चवीनं वाचू लागले. पाहू लागले. त्यामुळे वर्तमानपत्रांचा खप वाढला. टी.व्ही चॅनेल्सचा टीआरपी वर चढला. त्यामुळे फक्त फायद्यावरच लक्ष असलेल्या प्रसारमाध्यमांनी, तिच्या केसच्या बाबतीत जबाबदारपणे चौकशी करून, प्रश्न धसाला लावण्याचा प्रयत्नच केला नाही. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून गंभीरपणे ह्या प्रकरणाचा मागोवा घेण्याऐवजी, त्याचा विचका करण्यातच धन्यता मानली. केरोबोकन तुरुंगात शॅपेलचे दोन प्रियकर आहेत. ती कायम त्यांच्याबरोबर असते, त्यांच्याबरोबर तिचे शरीरसंबंध आहेत एवढंच नाही तर तिला दिवसही गेलेले आहेत अशा सनसनाटी पण पूर्णपणे असत्य बातम्या देऊन आपली पोळी भाजून घेतली. इथे प्रिन्सेस डायनाच्या मागे लागलेल्या पापारात्झींची आवर्जून आठवण येते. इंडोनेशियन पीनल सिस्टिमप्रमाणे तुरुंगांतील चांगल्या वर्तणुकीबद्दल कैद्याच्या शिक्षेत घट होते. पण प्रसारमाध्यमांच्या अदाकारीमुळे तिच्या शिक्षेत सूट मिळण्याची शक्यता कमी होते आहे.

इतके असूनसुद्धा शॅपेलबद्दल सहानुभूती असलेले, तिच्या निरपराधीपणाची खात्री असलेले तिचे समर्थकही भरपूर होते. तिला आर्थिक मदत करण्यासाठी त्यांनी स्वेच्छेने पैसे गोळा केले, फंड उभारले. पण जमा झालेल्या पैशांना पाय फुटले आणि त्या पायांना शॅपेलच्या घराची वाट कधी सापडलीच नाही. उलट तिच्या घरातलेच पैसे चोरीला गेले. शॅपेलच्या आईने, रोस्लीने तिच्या मदतीकरता पैसे जमविण्यासाठी एक पेटी, स्वत:च्या दुकानात ठेवली होती. पण रोस्लीची नजर चुकवून त्या पेटीवर डल्ला मारणारा महाभागही भेटला.

ऑस्ट्रेलियातल्या डोमेस्टिक फ्लाईटवरून इंटरनॅशनल फ्लाईटवर सामान चढविताना किंवा ब्रिस्बेनच्या डोमेस्टिक फ्लाईटवरून बालीच्या इंटरनॅशनल फ्लाईटवर जाताना शॅपेलची बूगी बॅग तपासली गेली नव्हती. तिचे सामान तपासले गेल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध झाला नाही. ब्रिस्बेन एअरपोर्टवरच्या तपासणीची नोंद ७२ तासातच पुसून टाकण्यात आली होती. तिच्या बॅग्ज सिडनी विमानतळावरून पुढे जाताना एअरपोर्टवरचे सिक्युरिटी कॅमेरे चालू नव्हते. शॅपेलच्या बॅगच्या वजनाबाबतही असाच प्रकार घडला होता. ज्या दुहेरी पिशवीत मारूजाना सापडला होता, त्या पिशवीवरचे ठसे पुसण्यात आले होते. तिच्याकडे सापडलेला मारूजाना ऑस्ट्रेलियात विकत घेण्यासाठी बत्तीस हजार डॉलर्स खर्चावे लागले असते. त्याच वेळेस, त्याच वजनाच्या मारूजानाची किंमत बालीत फक्त चार




नवे कोरे

# माणसं अशीही

लेखक **महादेव मोरे**

**किंमत :** २५०/-रु.
**पोस्टेज :** ३०/-रु.

मानवी व्यवहारांच्या तपशीलवार वास्तववादी चित्रणामुळे महादेव मोरे यांचा व्यक्तिचित्रणांचा हा संग्रह मराठी साहित्यात महत्त्वाचा ठरतो. बेळगाव-निपाणी या महाराष्ट्राच्या सीमाभागातली वैशिष्ट्यपूर्ण बोलीभाषा, हेही या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे. या निमित्ताने मराठी वाचकांना या बोलीतल्या काही शब्दांचा परिचय होईल.

यात भेटणारी माणसं ही विविध जाती-जमातींची आहेत. ती गरीब, भोळीभाबडी आहेत, तशीच इरसालही आहेत; परिस्थितीने गांजलेली, पिचलेली, निराश झालेली आहेत, तशीच स्वप्नं पाहणारी, आशेच्या एके किरणामागे धावणारी आहेत. लेखकाच्या जीवनातले कडू-गोड प्रसंगही आहेत.

मराठी साहित्याच्या मुख्य परिघाबाहेरची ही माणसं कधी हसवतात; रडवतात, अचंबित करतात, मनात करुणभाव उत्पन्न करतात; तर कधी जीवनाबद्दलची अनोखी अंतर्दृष्टी देऊन जातात.

हजार पाचशे डॉलर्स एवढी होती. एवढे पुरावे असूनसुद्धा त्यांची दखल न घेता, तिला वीस वर्षाच्या कैदेची शिक्षा सुनावण्यात आली. तिच्या बॅगेत सापडलेल्या मारूजानाच्या पेक्षा कितीतरी जास्त वजनाचा मारूजाना जवळ सापडलेल्या काही जणांना, काही महिन्यांची, जास्तीत जास्त १५ वर्षांची शिक्षा झाली होती. पण शॅपेलच्या दुर्दैवानं इंडोनेशियन सरकारशी हातमिळवणी केली आणि तिला शिक्षा झाली – वीस वर्षांची कैद. २० वर्षे जगाशी ताटातूट आणि नजरेसमोर फक्त निराशेचा काळोख. ह्याला काय नाव द्यायचं? प्रारब्ध, संचित की आणखी काही? नाव काहीही दिलं तरी नशिबातला शिक्षेचा भोग हेच फक्त वास्तव, आणि हेच सत्य– राईएवढ्या चुकीला पर्वताएवढी शिक्षा! कवितेतल्या ओळी आठवतात –'कणभर चुकीलाही आभाळाएवढी शिक्षा असते! चूक आणि शिक्षा यांचा ताळेबंद कधी मांडायचा नसतो.'

हे सगळं वाचताना शॅपेलची आई रोस्ली कॉर्बी मला आई ह्या शब्दाचा खरा अर्थ सांगून गेली. तिचा नवरा दुर्धर आजारानं शेवटच्या घटका मोजत होता, त्याची चिंता. शॅपेलच्या केसमध्ये अपिलांवर अपिलं चाललेली म्हणून सतत बालीला हेलपाटे. शॅपेलचा तुरुंगांत राहण्याचा खर्च, स्वत:चे दुकान बंद केल्यामुळे पैशाचा ओघ आटल्यानं होणारी प्रचंड आर्थिक ओढाताण – ह्या जीवघेण्या परिस्थितीनं ती खचली होती, कोलमडली होती, पण निराश मात्र झाली नव्हती. लेकीच्या सुटकेच्या आशेनं धीरानं एकेक दिवस ढकलत होती. शॅपेलची बहिण मर्सिडीस बहिणीच्या मायेनं सर्वस्व झोकून देऊन आईला आधार देत होती. केवळ शॅपेलला बरं वाटावं म्हणून तिनं तिचे वाढदिवस, नाताळ, केरोबोकनच्या तुरुंगात उत्साहानं साजरे केले. न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगणारी लेक हेच रोस्लीचं सर्वस्व होतं. शॅपेलची निर्दोष मुक्तता आणि तिचा निर्भेळ आनंद, एवढेच फक्त रोस्लीच्या उर्वरित आयुष्याचे उद्दिष्ट होते. पण निर्दय नियती, एका हतबल आईचा हा हट्ट पुरवू शकली नाही. त्यावेळी स्वत:च्या मर्यादांची जाणीव झालेल्या अगतिक नियतीच्या पापण्याही कदाचित ओलावल्या असतील.

टोनी विल्सन गोल्ड कोस्ट बुलेटिनचे पत्रकार. गुन्ह्याचा सुगावा लागताच त्याचा मागोवा घेणारे शोध पत्रकार. शॅपेलच्या बातमीत, शोधाच्या दृष्टीनं बराच मालमसाला असेल, शोध पत्रकारितेच्या दृष्टीन ते एक आव्हान असेल, असं वाटलं म्हणून त्या घटनेचा पाठपुरावा करण्याचा त्यांनी निश्चय केला. ह्या कामासाठी त्यानं शॅपेलच्या मित्रमैत्रिणी, नातेवाईक, तिच्या गावातले लोक एवढेच नाही तर ड्रग डीलर्स यांच्याशी चर्चा केली. ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशिया ह्या दोन्ही देशांतले वकील शोधले. ह्या संदर्भात गोल्ड कोस्ट ते बाली अनेक वाऱ्या केल्या. कैदेतल्या

शॅपेलसोबत तिचे वाढदिवसही साजरे केले. तिच्या निरपराधीपणाची पूर्ण खात्री असल्यामुळे केवळ नि:स्वार्थ बुद्धीने तिला वाचविण्यासाठी प्रयत्न केले. सबळ पुरावे सादर करता न आल्याने, न्याय मिळण्याऐवजी वीस वर्षाचा तुरुंगवास तिच्या वाट्याला आला. टोनीनं केलेल्या अविश्रांत प्रयत्नांवर यशाची मोहोर उठलीच नाही.

ह्या साऱ्या प्रकरणात, टोनीची पत्नी इलेन हिने त्याला मनापासून साथ दिली. त्याच्या प्रत्येक प्रयत्नाला मदतीची जोड दिली. ह्या साऱ्या बाबतची कृतज्ञता, पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत व्यक्त केल्याशिवाय टोनीला राहवले नाही. ह्या पुस्तकाच्या निमित्ताने शोध पत्रकारितेबद्दलचे कुतूहल चाळवले. थोडी माहितीही मिळाली. मुख्य म्हणजे ह्या विषयाशी तोंडओळख झाली, हेही नसे थोडके.

शॅपेलच्या केसच्या संदर्भातला बारीकसारीक तपशील ह्या पुस्तकात आला आहे. विषयाच्या मांडणीची आवश्यकता म्हणून तपशील तारीखवार आला आहे. पुस्तकांत व्यक्तिरेखांचीही रेलचेल आहे. जिभेला योगासनं करायला लावून उच्चारावी लागणारी परदेशी नावं डोक्यात जरा पिंगाच घालतात.

ह्या पुस्तकाला म्हणावं असं कथानक नाही. त्यामुळे कथानकाला समांतर वा पूरक असं उपकथानकही नाही. शॅपेलकडून झालेली छोटीशी चूक, त्या चुकीला दिलं गेलेलं गुन्ह्याचं स्वरूप आणि त्यामुळे तिला भोगावी लागणारी शिक्षा हेच ह्या पुस्तकाचं सूत्र आहे. पुस्तक वाचकाला खिळवून ठेवतं. मनाला विचाराच्या चक्रव्यूहात गुंतवतं.

लेखक आणि अनुवादक ह्यामध्ये सुसूत्रता असल्याशिवाय, पुस्तक वाचकापर्यंत पोहोचूच शकत नाही, असं म्हटलं तर ते वावग ठरू नये. लेखक स्वत:चे विचार, स्वत:चं मत, स्वत:च्या कल्पना, स्वत:ची शैली, भाषा ह्या साऱ्यांचं खतपाणी घालून आपली साहित्यकृती फुलवतो. पण अनुवादकाला मात्र ही मुभा नसते. पुस्तकाच्या विषयाला, आशयाला, जराही धक्का पोहोचू नये म्हणून त्याला बरीच पथ्यं, बंधनं पाळावी लागतात. मूळ पुस्तकाची दुसऱ्या भाषेत काढलेली झेरॉक्स कॉपी असं अनुवादाचं स्वरूप असावं. अनुवादकानं त्यातलं काही गाळण्याचं किंवा त्यात भर घालण्याचं स्वातंत्र्य घेतल्यास ती एक प्रकारची अनास्था होईल. ह्या साऱ्या प्रकरणात अनुवादकाला खूप मर्यादा असतात. मूळ लेखकाचं भाषांतरीत पुस्तक जसंच्या तसं वाचकाच्या हातात ठेवणं हे एक आव्हान असतं. आणि हे आव्हान अनुवादिका सुनीति काणे यांनी समर्थपणे पेललं आहे.

कितीही सकारात्मक विचार करायचा म्हटल तरी मनातला आशेचा किरण फिकट होत होता. शिक्षा कोणत्या कारणानं? कधी संपेल? निदान कमी होईल?

ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशिया दोन्ही देश निदान एकट्या प्रश्नापुरती तरी सामंजस्याची भूमिका घेतील, राजकीय इच्छाशक्ती प्रबळ होईल, जनमताच्या रेट्यामुळे, टोनी विल्सनला शॅपेलच्या बाजूचा ठोस पुरावा मिळेल, कॉर्बी कुटुंबाचे भोग संपतील, आंधळ्या न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी किंचितशी सरकेल, तुरुंगातल्या प्रमोशनामुळे, शिक्षेत सुट मिळेल. ह्या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणून कदाचित तिची सुटका झाली तरी तिला न्याय मिळेल का? Justice delayed is justice denied. तिच्या भूतकाळातल्या जिव्हारी जखमा तिचं उरलं सुरलं आयुष्य कायम कुरतडतच राहतील– तिचं भविष्यही काळवंडून टाकतील. आणि जीव घेणारं वास्तव म्हणजे स्वत:च्या पंखावर मात्र आभाळ पेलण्याची तिची जिद्द, तिचा उत्साह, तिची रसरसलेली तरुणाई तिला कशी परत मिळणार! तिला भेदून बसलेला गडद अंधकारच ह्यांचं उत्तर देईल.

वाटतं, हजारो मैल दूरवरच्या त्या अश्राप जीवाला कवेत घ्यावं, पाठीवरून मायेचा हात फिरवावा आणि आपल्या उत्कट भावना तिच्यापर्यंत पोहोचवाव्यात, डोळ्यातलं पाणी पदराआड करून तिला दिलासा द्यावा– दिस जातील, दिस येतील. दु:ख जाईल, सुख येईल.

पुस्तक मिटलं आणि वाटलं, कुठेतरी शांत ठिकाणी जाऊन बसावं. जिथं आपल्याखेरीज दुसरं कोणीही नसेल. ना पायवाट रुळावणारे सज्जनांना मोठी वाट वहिवाटणारे दुर्जन. अगदी कोणीही नको. आपल्या मनानं स्वत:शी संवाद साधावा. आपणच आपलं सांत्वन करावं. 'शब्देविण संवादू, दूजेविण अनुवादू' ह्याचा हाच अर्थ असेल का? मुखपृष्ठावरचा तुरुंगाच्या गजाआडचा शॅपेलचा चेहरा मनापुढून हलत नव्हता. मनाची उलाघाल होत होती.

**- सौ. मीरा बाळकृष्ण शाळिग्राम**
'गोदावरी', पत्रकार नगर, पुणे ४११०१६.
दूरध्वनी २५६५८३६१



**१०वी आवृत्ती**

# तू भ्रमत आहासी वाया

लेखक : **वपु काळे**

**किंमत : ८०/-रु.**

**पोस्टेज : २५/-रु.**




# एक पायरी वर

आपल्या वैवाहिक आणि सामाजिक जीवनात आपण कुठल्या पायरीवर असतो? त्या पायरीच्या वरची पायरी गाठून पुढे जाण्यासाठी काय किंमत द्यावी लागते?




लेखिका : **स्वाती चांदोरकर**

पृष्ठे **१७२**।१६०रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

# मला हे असलं आयुष्य हवं होतं का?

स्वाती चांदोरकर यांची ‘एक पायरी वर’ ही कांदबरी वैष्णवी या नायिकेच्या रूपाने सद्य:कालीन कौटुंबिक व्यवस्थेला जे तडे जात आहेत त्याचे एक चित्र वाचकांपुढे उभे करते.

नगरपालिकेत कारकुनी करणाऱ्या बापाची चाळीत राहणारी पण कॉलेज क्वीन म्हणून निवडली गेलेली वैष्णवी दत्ताराम साळवी ही सौंदर्यसंपन्न तरुणी. तिच्या प्रेमात पागल झालेला प्रतोष. तो बऱ्यापैकी श्रीमंत. वैष्णवीच्या तुलनेने अधिक संपन्न घरातला. मध्यमवर्गीय कुटुंबातला. त्याचे घर मात्र मोठे असते.

गौरी या त्याच्या बहिणीचे लग्न झाल्यावर तिचे वास्तव्य नागपूरला असते. आर्थिक स्थिती चांगली. पण लग्नाला बरीच वर्षे होऊनही अपत्य नसल्याने दु:खी.

प्रतोषच्या आईला, पुष्पाबाईला वैष्णवी पसंत पडते; पण ती आपल्या जातीची नाही म्हणून थोडीशी नाराजीही वाटते. प्रतोषला लग्नाची घाई झाल्याने त्याचे वडीलही होकार देतात. लग्नानंतर आरंभीचे दिवस आनंदाचे जातात. वैष्णवीला चांगली नोकरी लागते. प्रतोष कन्सलटंट म्हणून वेगवेगळे उद्योग करत असतो. पण त्याला म्हणावे तसे आर्थिक स्थैर्य लाभत नाही. पैशाची नेहमी चणचण असते. तशात दारूचे व्यसन.

पहिली मुलगी सुषमा. ती दीड दोन वर्षाची होते तोवर सागरचा जन्म होतो. प्रतोष वैष्णवीकडे सतत पैशांची मागणी करत राहतो. न दिले तर मारहाणही करतो. वैष्णवी घरातल्या रोजच्या कटकटीला वैतागते. आणि ‘यासाठी का आपण लग्न केले’ असा प्रश्न स्वत:ला विचारत राहते. एक दिवस धाडस करून ती प्रतोषचे घर सोडून आपल्या शमी या मैत्रिणीकडे जाते.

शमी आणि तिचा नवरा विहंग. दोघे तिची समजूत काढू पाहतात. पण वैष्णवी आपल्या निर्णयावर ठाम राहते. ‘‘प्रतोष पतीची किंवा बापाची कर्तव्ये पाळत नाही, उलट मारहाण करतो. त्याच्याशी जमणे शक्य नाही’’ असे स्पष्ट करते. शमीच्या घरी ती राहते तेव्हा शमी-विहंग यांच्यात तिच्यावरून खटके उडतात. तेव्हा वैष्णवी तिथला मुक्काम हलवते. आपल्या आई - वडिलांकडे जाऊन भाईंदरच्या चाळीत राहते. आईला तिचा निर्णय रुचत नाही. मुलांना सोडून आल्याबद्दल ती लेकीला फैलावर घेते. दीड दोन महिन्यांनी एक छोटी खोली भाड्याने घेऊन वैष्णवी एकटी राहू लागते. नोकरी चालू असते. आर्थिक चणचण नसते. पण एकटेपणा अवघड वाटतो.

मुलगा सागर यांच्या पालनपोषणाची जबाबदारी गौरी-जयंत घेतात. त्याला नागपूरला आपल्या घरी नेतात.

मुलगी सुषमा कुटुंबात दादा-जान्हवी, नाना यांच्या छायेत वाढते.

काळ कोणासाठी थांबत नाही. वैष्णवीची नोकरी. चांगला पगार, मिहीर या मित्राचा मधूनमधून सहवास. यात ती रमते. मिहीर तिच्यापेक्षा कमी वयाचा. त्यामुळे लग्नाचा विचार ती करीत नाही. प्रतोषशी घटस्फोटाचाही विचार करत नाही. बॉस शर्मा तिला सूचकपणे म्हणतो, ''प्रमोशन हवे असेल तर–'' ती नोकरीतील स्थैर्यासाठी थोडीफार किंमत द्यावी लागणार हे समजून घेते. पण आपण प्रमोशन कामाच्या बळावर मिळवणार असे म्हणते. एक चांगला फ्लॅट घेते. तो सजवते, उंची फर्निचर वगैरे. बारा वर्षे जातात.

पण वैष्णवीला आपले हे आयुष्य व्यर्थ आहे म्हणून सतत सल वाटतो. नवरा, मुलगा, मुलगी यांच्याविना घराला खरे घरपण नाही असे तिला वाटत राहते.

एके दिवशी ती प्रतोषला निरोप पाठवते.

''झालं गेलं सगळं विसरून मी घरी येऊ इच्छिते. मला तू हवा आहेस. मुलं हवी आहेत. सागर-सुषमा यांच्याबरोबर रहायचं आहे. तर मला घरी येऊ देशील?''

ती प्रतोषला पुन्हापुन्हा निरोप पाठवते. तो आरंभी टाळाटाळ करतो. पण नंतर दोघांची भेट होते. कोणाचे काय चुकले याची गरमागरम चर्चा होते. आरोप-प्रत्यारोप होतात.

''तू व्यसनात पैसा उडवत होतास. मला मारत होतास. म्हणून घर सोडणे मला भाग पडले. तशात तू रागिणीशी संबंध ठेवत होतास.'' ती म्हणते

''इट इज माय बिझनेस. घरी तू येणार आहेस. शिवाय तू कुठे सती सावित्री होतीस? तूही कुणाकुणाबरोबर दिसत होतीस.'' प्रतोषचा प्रत्यारोप.

...पण शेवटी प्रतोष-वैष्णवी यांची दिलजमाई होते.

प्रतोषचे आईवडीलही तयार होतात.

एक दिवस वैष्णवी प्रतोषच्या प्रशस्त घरात पुन्हा प्रवेश करते. नवे प्रश्न उभे राहतात. ''सागरलाही नागपूरहून आणा. तो इथेच आपल्याजवळ राहील.''असे ती म्हणते. गौरी-जयंत यांनी सागरला आपला मुलगा म्हणून वाढवलेले. त्यांना वाईट वाटते. वैष्णवी सागरला आपल्यापासून हिरावून घेत आहे. अशी त्यांची धारणा होते. वैष्णवी 'घरी' आल्यावर पुष्पाबाई, प्रतोष, सागर, सुषमा हे सर्व छोट्या छोट्या गोष्टींसाठी तिच्यावर अवलंबून राहू लागले.

नाश्ता, जेवण, चहापाणी, स्वत:ची तयारी. ऑफिसमध्ये मेंदू शिणवणारा कामाचा रगाडा या धावपळीत ती हैराण होते. आपण एकटे राहत होतो ते काय वाईट होते? या सर्वांसाठी सगळी हमाली कामं करायची, त्यांना त्याची कदर नाही... या विचाराने स्वत:चीच तिला चीड येते. पण आपणच निर्णय घेतला. आता माघार घेऊन चालणार नाही. आहे हे असं आहे. ते मान्य करायलाच हवं. तिचा नाइलाज होतो. त्या

नाइलाजाचाच तिला त्रास होतो.

ती नवी स्विफ्ट कार घेते. सागर-सुषमा खूष. कारच्या निमित्ताने पार्टी होते.

प्रतोष ड्रिंक्स घेऊन तर्रर. त्याला तोलही सावरता येत नव्हता तरी कार मीच चालवणार म्हणून अडून बसलेला... त्याची समजूत कशी काढायची?

वैष्णवीला प्रश्न पडतो.

''मला हे असलं आयुष्य हवं होतं का? का घेतला परतून येण्याचा निर्णय?''

एका स्वामींवर तिची श्रद्धा असते. त्यांची प्रवचने ती ऐकत असते.

''आई ही मायाळू, ममत्व देणारी हवी. ज्या स्त्री मध्ये हे भाव नाहीत ती कधी आई होऊ शकत नाही. इतर वस्तूंना जन्म देणाऱ्या कारखान्यासारखी ती मानव निर्मितीची फॅक्टरीच... आपण ममीची आई होऊ शकत नाही. आपण प्रतोषची ममी होऊ शकत नाही. मुलांच्या डोक्यावरून हात फिरवताना तिचं मन भरून येतं.

बारा-चौदा वर्षाच्या सुषमा-सागरशी असणाऱ्या संबंधाचे प्रभाव निरनिराळ्या प्रसंगी कसे सर्वदूर पोचवले जातात याचे ज्ञान असायला हवे म्हणून आरामात वेळ घालवणाऱ्या प्रतोषला एकाकी बसण्यात आता अर्थ उरलेला नाही.

वैष्णवीवर बॉस नवनव्या जबाबदाऱ्या सोपवत राहतात. त्या पार पाडण्यात ती कसूर करत नाही. पण घरात मात्र तिला पदोपदी अवहेलना सोसावी लागते. नवऱ्याचा ऐदीपणा ती सहन करते; पण मुलगा सागरच तिचा पाणउतारा करतो तेव्हा ती अस्वस्थ होते.

आपल्या कर्तृत्त्वानं वैष्णवी ताठ उभी राहते!

वैष्णवी लॅपटॉप वरून सागरचा दहावीचा निकाल पाहते.

''सागर नापास झाला आहे.'' पण सागरला नापास होण्याचे किंचितही दुःख नाही. तो वैष्णवीला म्हणतो,

''मी मालक आहे ह्या घराचा. हे घर आजीने माझ्या नावावर केले आहे. मी अगदी लहान असताना तू मला सोडून गेलीस. आता मी तुला सोडून देतोय. माझ्या घरात तू मला नकोस. हे करू नकोस, ते करू नकोस अशी कटकट मला नको. इथं रहायचं असेल तर गुपचूप राहा...!'' तिचा मुलगा सागर तिलाच दोष देतो.

वैष्णवी स्वतःच्या रूममध्ये येते. आपल्या सुटकेसमध्ये आपल्या सर्व वस्तू भरते. स्नान करते. स्टार्च केलेली साडी परिधान करते. मेकअप करते आणि जड बॅग घेऊन दार उघडून उंबरठ्याबाहेर पडते. तिचा आत्मसन्मान उफाळून येतो.

''जिन्यावरून एकेक पायरी उतरताना मनाने ती एक पायरी वर वर चढत गेली. कुठलाही दबाव नसलेली, आभाळापर्यंत चढत जाणारी एक एक पायरी...'' अशा शब्दांनी या कादंबरीचा शेवट होतो.

'पायरी'चे प्रतीक कादंबरीत चार-पाच वेळा आले आहे.

''माझं तळागाळातलं पाऊल वर नेणाऱ्या या पहिल्या दुसऱ्या पायरीवर पडलंय. आपण आपला चढबघावा.'' (८९)

''आपण एक पायरी वर आलो.'' (९०)

''चढलेली पायरी उतरायची नाही. एक वेळ त्याच पायरीवर मुक्काम केलास तरी चालेल.'' (११७)

''येस, माय लव्ह. चढायची इतकी घाई नको.'' मिहीरचे वाक्य (११७)

'पायरी'ची अर्थपूर्णता याद्वारा पुरेशी प्रकट होत नाही. या कादंबरीचे नाव 'एक पायरी वर' हे का ठेवले असावे हे वाचकांना त्यामुळे स्पष्ट कळावे अशी लेखिकेने काळजी घेतलेली आहे. या कांदबरीत इतरही काही उपकथानके आली आहेत. परंतु मुख्य भर वैष्णवीच्या व्यक्तिरेखेवर आहे हेच लक्षात घेऊन तिच्याकडे बघायला हवे.

तीन-चार वर्षांच्या वैवाहिक संबंधानंतर, दोन मुलांचा जन्म झाल्यावर वैष्णवीने अचानक नवरा-मुले, सासरचे कुटुंब यांचा त्याग करण्याचा घेतलेला निर्णय आणि बारा वर्षानंतर पुन्हा परत येण्याचा घेतलेला निर्णय या दोन्हींच्या मागची भूमिका संदिग्ध व अनाकलनीय वाटते. लग्न करून मला हे असल्या प्रकारचे आयुष्य हवे होते का? असा प्रश्न वैष्णवी स्वत:ला विचारते. त्यामध्ये तिची जी मानसिकता दिसते तिचे अधिक पृथक्करण होण्याची गरज आहे.

वैष्णवी एका स्वामींची भक्त आहे. त्यांची प्रवचने ती ऐकते. त्या प्रवचनांमधून तिला काही जीवनसूत्रे गवसतात. त्यातून काही कृती घडतात. स्वामींच्या सल्ल्याची अधिक बारकाईने छाननी होण्याची गरज आहे. आपल्याला एखादी वैशिष्ट्यपूर्ण कल्पना सुचल्यावर ती तर्कसंगत कथावस्तू, परिपक्व चिंतन, नेमक्या व्यक्तिरेखा, थोडेच पण बांधेसूद प्रसंग यांच्या द्वारे शब्दबद्ध करण्यासाठी परिश्रम लागतात.

नवऱ्याला सोडून गेल्यावर बारा-तेरा वर्षांनी पुन्हा त्याच्या बरोबर जुळवून घेताना वैष्णवी प्रमाणेच प्रतोषलाही प्रचंड मानसिक संघर्षातून जावे लागणार. मध्यंतरी काहीच न घडल्यासारखे ते एकत्र येऊ शकतील? जवळीक साधू शकतील? त्याबद्दल ''तृप्त झालेल्या शरीरात थकवा नव्हता. तृप्तीची शांतता. समाधान. प्रतोषच्या चेहऱ्यावरही तिला तेच भाव दिसतात. खऱ्या संसाराला आज सुरवात झाली असं तिला वाटलं.'' असा एकदा उल्लेख होतो. एक पायरी वर आलो म्हणून ती खूष होते. वास्तवाचे अनेकविध पैलू असतात. वेगवेगळे राहताना, दुसऱ्या व्यक्तीशी संबंध साधताना कसलीही बोच वाटू नये इतकी न-नैतिक भूमिका निःशंकपणे घेता येईल? असे प्रश्न ही कादंबरी वाचकाच्या मनात निर्माण करील.

■■■




# माझी ललाटरेषा

मूळ लेखक : **नफिसा हाजी**
अनुवाद : **शीला कारखानीस**

**किंमत : ३०० /-रु. पोस्टेज : ३० /-रु.**

मी माझे डोळे मिटून घेते. आणि माझ्या लहानपणीच्या दुःस्वप्नांना पिटाळून लावून मला शांत करणारा माझ्या आईच्या हाताचा स्पर्श आठवू पाहते. स्वतंत्र वृत्तीची आणि बंडखोर अशी सायरा आपल्या सुंदर आणि आज्ञाधारक बहिणीबरोबर – अमिनाबरोबर, कॅलिफोर्नियात वाढली आहे. लहानपणापासून तिने आपली स्वातंत्र्याची इच्छा आणि आपल्या कुटुंबाच्या परंपरा यांना विभागणारी सीमारेषा ओलांडली आहे. विशेषतः मुंबईत वाढलेल्या तिच्या आईच्या मनात आपल्या मुलीने कसं वागावं याच्या ज्या कल्पना होत्या; त्या साऱ्या तिने मोडीत काढल्या होत्या. नवे-नवे अनुभव घेण्यासाठी आतूर असलेली आणि जगाबद्दल अपार कुतूहल असलेली सायरा एका लग्नाला हजर राहण्यासाठी कराचीला जाते. तिच्या कुटुंबातील काही रहस्यं तिच्यापुढे अचानक उभी ठाकतात – ती रहस्यं तिच्या पुढच्या आयुष्याला एक वेगळाच आकार दिला.

मागच्या तीन पिढ्यांना समजून घेण्याचा आणि त्यांच्याशी जुळवून घेण्याचा सायराचा जो प्रवास होता; त्याची ही सुरुवात होती. सायराच्या लक्षात येतं की, प्रेमाची, काहीतरी मिळवण्याची, आपल्या इच्छांची परिपूर्ती करण्याची जी लढाई ती लढत होती, तीच लढाई तिच्या आधीच्या पिढीतील व्यक्तींनीही लढली होती आणि म्हणूनच आपल्याला मिळालेला बहुआयामी वारसा आपण जपून ठेवला पाहिजे.




# ची रनिंग

उत्कृष्ट धावपटू स्नायूंच्या बळावर धावत नाहीत.
गुरुत्वाकर्षण शक्तीचा वापर करून आघाडीवर राहतात.




मूळ लेखक **डॅनी ड्रेअर** आणि **कॅथरिन ड्रेअर**
अनुवाद **डॉ. मीना शेटे-संभू**

पृष्ठे **३८०**।३२०रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

मॅरेथॉन, अल्ट्रा मॅरेथॉन, ट्रायथलॉन वगैरे स्पर्धांमुळे धावणे, रनिंग या क्रियांना क्रीडाप्रकार म्हणून मान्यता मिळाली आहे. हजारो धावपटू या स्पर्धांमध्ये भाग घेतात. पुरस्कार मिळवतात. धावण्याचे प्रशिक्षण देणारी केंद्रेही अनेक ठिकाणी कार्यरत आहेत.

धावपटूंच्या बाबतीत एक मोठाच धोका असतो.

धावताना पडले तर शरीराला दुखापत होते. कधी हाडे मोडतात. अंथरुणाला खिळून रहावे लागते. दैनंदिन जीवन त्यामुळे कठीण ठरते. अनेक धावपटूंना अपघातामुळे, दुखापतीमुळे, अस्थिभंगामुळे आपले या क्षेत्रातील करीयर मध्येच संपवावे लागते. धावणे हा क्रीडाप्रकार म्हणजे दुखापती होणे आणि त्यांची तीव्रता कमी व्हावी म्हणून विविध उपचार करून घेणे, हे दुष्टचक्र थांबवून 'दुखापती विरहित धावणे' ही एक निकडीची गरज ठरते.

**ताय ची** या चिनी कौशल्यावर आधारित 'ची-रनिंग' हे धावण्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्र डॅनी ड्रेयर यांनी विकसित केले. त्याचा वापर करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी सी एन एन, एन बी सी न्यूज, डिस्कव्हरी चॅनल यावर अनेक कार्यक्रम मालिका चालवल्या. ची वॉकिंग : फिटनेस वॉकिंग फॉर लाइफलाँग हेल्थ अँड एनर्जी, ची-रनिंग वगैरे पुस्तके डॅनी व त्याची पत्नी कॅथरिन यांनी प्रसिद्ध केली. 'ची-रनिंग'च्या दोन लाख प्रती अल्पावधीत अमेरिकेत विकल्या गेल्या. हजारो धावपटूंना आपल्या धावण्यात नवीन गती आणि सहजता आणता आली. धावपटू म्हणून त्यांचे आयुष्य बदलून गेले.

स्नायू सैलावत जाऊन शरीरभर ची-ऊर्जा खेळत असल्याची विलक्षण भावना जाणवणे, धावण्याची पद्धत बदलल्याने आपली पावले जमिनीशी संपर्क साधत सुंदर संगीत निर्माण होते आणि त्यातून ध्यानाची प्रसन्नता लाभते अशी प्रचीती आली असे अनेक धावपटूंनी सांगितले. वेगवगळ्या सर्वेक्षणांद्वारेही या धाव-प्रकाराचा फायदा होतो यावर शिक्कामोर्तब केले. आपल्या धावण्याच्या पद्धतीत ची रनिंगमुळे सुधारणा होते, अपघात टळतात, दुखापतींची तीव्रता कमी होते, धोक्यामुळे वाटणारा ताण कमी होतो, हे लक्षात आले. ची-रनिंगचे तंत्र सुलभपणे कसे आत्मसात करावे याचा संपूर्ण आराखडाच या पुस्तकात दिला आहे.

ची-रनिंगचे तंत्र हे क्रांतिकारक असून स्वत:च्या शरीराचा आणि तंत्राचा शोध घेत घेत ते आत्मसात करता येते.

या धावपद्धतीची काही वैशिष्ट्ये आरंभापासूनच लक्षात घेणे उपयुक्त ठरते.

१. धावताना पडण्याची शक्यता पावलोपावली असते. अमेरिकेतील २११ लाख धावपटूंपैकी साठ टक्के वर्षातून एकदा तरी पडतात. ची-रनिंग मध्ये ही पडण्याची शक्यता फारच क्वचित जाणवते. त्यामुळे धावणाऱ्याचा वेग वाढू शकतो.

२. खरे तर धावण्याने तुमच्या शरीराला दुखापत होत नाही. तुम्ही ज्या प्रकारे धावता, त्या पद्धतीमुळे तुमच्या शरीराला दुखापत होते. त्यामुळे शराराची हानी होते. वेदना वाढतात.

३. आपण धावताना, वेग वाढवताना, दीर्घ पल्ला गाठताना, दुखापत टाळण्याचा प्रयत्न करताना आपल्या पायांचे स्नायू बळकट हवेत असे गृहीत धरलेले असते. पायांच्या स्नायूंची ताकद वाढावी ही आपली जबाबदारी मानून चालतो.

ची तत्त्वानुसार असे दिसते की धावण्याची ही पद्धत शारीरिक असमतोल वाढवून पायाचा व दुखापतीचा धोका वाढवणारी आहे. स्नायूंच्या बळावर धावण्याऐवजी स्नायू सैल सोडून, सांधे सैल करून गुरुत्वाकर्षण शक्तीला तुम्हाला पुढे खेचण्याचे काम करू दिले तर सक्षमपणे धावण्याचे तंत्र तुम्हाला समजेल.

डॅनी ड्रेयर यांचे ठाम मत आहे की वेदना आणि दुखापती हा धावण्याचाच एक अटळ भाग आहे हा समज चुकीचा आहे. लहान मुले ज्या सहजपणाने धावतात त्या सहजपणाने प्रौढांनाही धावता यायला हवे. ताय ची च्या अभ्यासाने धावण्याचे नवे तंत्र त्याला उमजले. एका भारतीय प्रशिक्षकाकडून ध्यान प्रक्रिया शिकताना आपले मन शांत करून आपल्या शरीराचे म्हणणे ऐकणे आवश्यक असून आपल्या शरीराला मिळणाऱ्या ऊर्जेचा शोध घेणे, अज्ञाताचा वेध घेणे या दोन्ही गोष्टी एकमेकांत बेमालूम मिसळून गेल्याचे जाणवले. त्यामुळे धावण्याचा वेळ आणि वेग दोन्हींच्या क्षमता वाढल्या. दीर्घ पल्ल्याचे धावणे ची रनिंगमुळे अधिक आनंददायी बनले, तसेच मानसिक शक्ती एकवटल्याने शारीरिक हालचालीतही सहजपणा आला. स्नायूंची ताकद खर्च करण्याऐवजी स्नायू सैल होऊ लागले. स्नायूंचा आकार व ताकद यावर तुमची गती अवलंबून न रहाता योग्य शारीरिक फॉर्म, एकाग्रता आणि वेग यांच्या सुयोग्य सहकार्यातून आपले अस्तित्व अर्थपूर्ण ठरते. असे त्याच्या लक्षात आले.

४. ताय ची या चिनी तंत्राने शू झिलिन यांनी त्याला प्रशिक्षण दिले. या तंत्राद्वारे आपल्या शरीराच्या केंद्रस्थानापासून हालचाल करण्याचे आणि हात-पायांना आपल्या मागोमाग येऊ देण्याचे कौशल्य प्राप्त झाले. ची हा ऊर्जाप्रवाह वस्तूमध्ये प्राण फुंकतो. ही ऊर्जा पाठीच्या कण्यामधून वाहते. तिथूनच ती शरीराच्या सर्व भागांमध्ये विभाजित होते. ही ऊर्जेची जाणीव आपल्याला अवयवांच्या हालचाली आणि व्यायाम यांना दिशा देण्यासाठी वापरता येते. या तंत्रालाच ताय ची हे नाव आहे. चिनी लोकांना ताय ची चे ज्ञान दोन हजार वर्षांपासून आहे. झाडाची शक्ती त्याच्या बुंध्यात असते. फांद्यात व पानात नसते. मानवी शरीराची सर्व ऊर्जा पाठीच्या कण्यात असते. खांदे आणि नितंब सैलावले की पाठीच्या कण्यात भरपूर 'ची' गोळा झाल्याची जाणीव होते.

५. ची-रनिंग हे केवळ तुम्हाला उत्तम धावपटू बनवण्याचे तंत्र नाही. ते व्यक्तीला

समृद्ध करण्याचे तंत्र आहे. तुमच्या फॉर्ममध्ये सुधारणा करणारे, शरीराची संवेदना जाणवून देणारे, विविध पातळ्यांवरून आत्मशोध घेऊन स्वत:लाच समजून घेणे सुकर करणारे तंत्र आहे. आपल्या शरीराशी आपली अधिक ऊर्जाशील आणि एकाग्रतेने गुंतवणूक करणारे, आपले आपल्याशी मित्र-शिक्षक मार्गदर्शक म्हणून स्वस्थ, निरामय नाते जोडणारे तंत्र आहे. धावण्यातून अधिक चांगले संस्कार करणारे हे पुस्तक शारीरिक, भावनिक, मानसिक आणि आध्यात्मिक पातळ्यांवरील अस्तित्वाचा समतोल साधण्याची प्रेरणा देणारे आहे.

६. उत्तम धावपटू होण्यासाठी निसर्गाच्या नियमांशी सुसंवादी राहून नैसर्गिक शक्तींचा लाभ घेणे हे सरळ, सोयीस्कर, फलदायक ठरते. ची रनिंगमध्ये कमी श्रमात, कमी ऊर्जेत, इच्छित टप्पा गाठता येतो. स्नायूंवर फाजील ताण पडत नाही.

७. ची-रनिंग पुढील तीन तत्त्वांवर आधारित आहे.

(अ) शिस्तबद्ध हालचाल आणि त्यानंतर विसावा. शरीराची शिस्तबद्ध हालचाल म्हणजे ऊर्जा वा प्राणशक्ती केंद्रस्थानी एकवटणे. त्यामुळे तुमचे हात-पाय कापडासारखे मऊ होतात. त्यावर ताण नसतो. कापडी चेंडूत सुई उभी आत घुसवली तर ती तुमच्या शरीराचे व ऊर्जेचे प्रतिनिधित्व करते. सुईप्रमाणे सडपातळ, उभी व बळकट अशी तुमच्या शरीराची ऊर्जा तुमच्या केंद्रस्थानी एकवटते. तुमचे केंद्रस्थान नाभीच्या खाली आणि पाठीच्या कण्यांच्या पुढे असते. तुमचे हात आणि पाय यांच्याशी तुमची हाडे, स्नायुबंद आणि अस्थिबंद यांनी ते जोडलेले असते. तुमच्या केंद्रस्थानाचे काम सक्षम होण्यासाठी तुमच्या पाठीच्या कण्याची हालचाल सारखी सुई शिस्तबद्ध हालचाल होते; कमर आणि नितंब यांची हालचालही व्यवस्थित होते. धावताना या केंद्रस्थानातून ऊर्जा मिळाली तर तुम्हाला थकवा येत नाही. तुमचे केंद्रस्थान शोधा; त्या केंद्रस्थानाच्या सहाय्याने धावा. धावणे सुलभ, सुखद वाटेल.

(ब) हळूहळू, टप्प्याटप्प्याने प्रगती करून घ्या.

(क) हालचालीत समतोल, शारीरिक समतोल आणि पूरक समतोल साधा.

या तीन तत्त्वांमुळे तुमचे शरीर हे धावण्याचे एक साधन बनण्याऐवजी तुमचे धावणे हेच तुमच्या शरीराचे एक साधन बनेल.

८. ची रनिंग मध्ये चार कौशल्ये विकसित करावी लागतात.

(अ) मनावर लक्ष केंद्रित करणे

(ब) शरीराची संवेदना उच्च गतीपर्यंत पोचवणे.

(क) श्वसन ध्यान,

(ड) शरीर सैलावणे: किमान विरोधाचा मार्ग

डॅनी ड्रेयरने या पुस्तकाच्या चौथ्या प्रकरणात ची रनिंग साठी शरीराचा फॉर्म-

आकृतिबंध कसा हवा, त्याचे प्राथमिक घटक कोणते, श्रम विरहितपणे धावण्याचे टप्पे यांचे विस्तृत विवेचन केले आहे. शरीराचा फॉर्म म्हणजे ढब ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. डोक्यापासून पायापर्यंत आपले शरीर एका रेषेत ताठ राहील अशा प्रकारे स्तंभाप्रमाणे उभे रहायला हवे. आपले वजन स्नायूंनी नव्हे तर शरीराने व्यवस्थित तोलून धरायला हवे. शरीराचा स्तंभ नियंत्रित पद्धतीने पुढे झुकवता येणे ही ची रनिंग मागची मुख्य कळ आहे. त्यामुळे गुरुत्वाकर्षणाची शक्ती आपल्याला पुढच्या दिशेने ओढत नेते. आपण पुढे झुकतो तेव्हा आपले पाय जमिनीपासून हळूच वर उचलून स्वत:ला खाली पडण्यापासून वाचवतो. शरीर पुढे ढकलण्यासाठी आपल्या पायांचा, पोटऱ्यांचा, बोटांचा, टाचांचा वापर करीत नाही. पायांच्या हालचालीमुळे कमरेखालील व कमरेवरील शरीर उलटसुलट दिशेने फिरत असते. कमर आणि ओटीपोटाचा भाग पाठीच्या कण्याभोवती फिरत असतो. ची रनिंगमध्ये शरीराचा कमरेवरचा भाग धावण्याच्या क्रियेचे वा कार्यक्रमाचे पुढारपण करीत असतो. कमर आणि ओटीपाटाचा भाग पाठीच्या कण्याभोवती फिरत असतो. ची रनिंग मध्ये हालचालीतील लयबद्धता आणि दोन पावलांतील अंतर हेही सांभाळणे इष्ट ठरते.

ढब, झुकणे, शरीराचा कमरेखालचा भाग, ओटीपोटीचे फिरणे, कमरेचा वरचा भाग, आणि लयबद्धता या सहा घटकांचा समावेश फॉर्ममध्ये होतो. अनेक आकृत्यांद्वारे योग्य ढब आणि चुकीची ढब यांचे विवेचन केले आहे. स्थिर लयबद्धतेने कसे धावावे हे मेट्रोनोम बरोबर धावल्याने लक्षात येते. मेट्रोनोम हे या प्रशिक्षणात एक महत्त्वपूर्ण उपकरण ठरते.

धावायला सुरुवात करण्याआधी कसे उभे रहावे, धावण्यास सुरुवात कशी करावी, झुकण्याचे तंत्र, श्वसन, लयबद्धता, गिअर्स आणि दोन पावलांतील अंतर याबाबतचे संकेत पुढे स्पष्ट केले आहेत.

ची रनिंग शिकण्यासाठी दहा आवश्यक गोष्टी (धडे) पाचव्या प्रकरणात दिल्या आहेत. नवोदित धावपटूंनी तसेच मध्यम व प्रगत धावपटूंनी हे दहा धडे सदैव लक्षात ठेवायला हवेत.

१. शरीराची ढब राखण्याचा सराव करा. साधेपणा ठेवा.

२. शरीराच्या पवित्र्याशी झुकण्याचा मेळ घाला.

३. टाचा उंच करा. प्रत्येक पावलाबरोबर टाच वर उचला.

४. पायांचे स्नायू सैलावण्यासाठी वाळूच्या खड्यांचा व्यायाम करा.

५. ओटीपोटीचे चलनवलन व्यवस्थित जमावे म्हणून जलतरण तलावावर कवायत करा.

६. हातांचे हेलकावणे, डोळे, मान आणि खांदे- म्हणजे कमरेवरचा शरीराचा भाग स्थिर राखा.

७. मागच्या बाजूला पाय हेलकावत रहा.

८. गुडग्यातून पाय वाकवण्याचा व्यायाम करा.

९. लयबद्धता वाढवा.

१०. गिअर्स आणि पावलातील अंतर.

ची रनिंग तंत्राच्या विकासाचे तीन टप्पे म्हणजे फॉर्म, अंतर आणि गती. त्यांचा ऊहापोह कार्यक्रम विकास या सहाव्या प्रकरणात करण्यात आला आहे.

गुडघ्यात वेदना होऊ न देता धावणे, न दमता मॅरेथॉनमध्ये धावणे, दुखापती शिवाय धावणे. धावायला आरंभ करताना जी मानसिक उत्सुकता असते, त्यापेक्षा अधिक चांगली व प्रसन्न मन:स्थिती धावणे संपवताना असणे ही उद्दिष्टे समोर ठेवून धावण्याचा सर्वसमावेशक कार्यक्रम कसा असावा याची रूपरेखाही देण्यात आली आहे. गमतीने धावणे, टेकडीवरचे धावणे, टॅपो रन,वगैरे बाबतीत कोणती पथ्ये पाळायला हवीत, आपल्या कार्यक्रमात सुधारणा कशा व का कराव्या, धावताना कोणते शूज वापरावे, स्पोर्टस घड्याळाची निवड, पेट्रोनोम, हार्ट रेट मॉनिटर, जीपी एफ यंत्रणा, वॉटर बेल्टस याबाबतच्या व्यावहारिक सूचनाही उपयुक्त ठरतील. धावणे थांबवून नेहमीच्या स्थितीत येतानाही काही पथ्ये पाळावी लागतात.

धावण्यामुळे होणाऱ्या दुखापतीमध्ये मानदुखी, श्वसनाचा त्रास, शरीराच्या बाजूंचे दुखणे, खांदे दुखी, छातीत दुखणे, नितंब दुखी, मांडीचे स्नायू, आयटीबी सिंड्रोम, शिन स्पिलंटप, पोटऱ्यात गोळे येणे, स्नायूंमधील पेटके, टाचेच्या वरच्या भागात जळजळ, यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. त्यांच्याशी कसा  सामना करावा या बद्दलचे मार्गदर्शनही महत्त्वाचे आहे.  एकूणच धावण्याच्या संदर्भातील निरनिराळ्या घटकांबद्दल सर्वंकष विवेचन करणाऱ्या या पुस्तकामुळे सर्जनशील धावणे हे सर्जनशील जीवनाचे अधिष्ठान ठरू शकते. धावपटूला करावी लागणारी साधना ही ध्यानाच्या अंगाने जाणारी अध्यात्म साधनाच ठरते. ची रनिंगचे हे तंत्र आपला आत्मविश्वास वाढवून दैनंदिन कामालाही असामान्य पातळीवर नेते. आपल्या शरीराच्या विविध क्षमतांचे आपल्याला पुरेसे भान नसते, त्यामुळे अनेक दुखापती आणि वेदना व्यथा सोसत आपण आपले आयुष्य, वाया घालवले हे लक्षात येते. ची रनिंगचे तंत्र ताय ची या दोन हजार वर्षांपूर्वीच्या चिनी कौशल्यावर आधारित आहे. आपल्या भारतीय परंपरेतील योग सूत्रे, ध्यान धारणा, अतींद्रिय शक्ती, आयुर्वेद, तंत्रशास्त्र यांचा अभ्यास करून, आपले ऐहिक जीवन सुखकारक करता येईल, असे म्हणणे गैर ठरणार नाही.




२ री आवृत्ती

# बोचकं

लेखक **रवींद्र बागडे**

**किंमत : १६०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

'बोचकं' ही आत्मकथनात्मक कादंबरी समाजातल्या अनेक पदरांचं दर्शन घडवते. नारायणचं लग्न (१९६८) ते आईचा मृत्यू (२००२) या कालावधीतील ही कथा निव्वळ नारायणची नाही. गिरगावातील फूटपाथवर भाजी विकत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहणाऱ्या व मुलांना वाढवणाऱ्या नारायणची आई सावित्राबाई; नारायणची पत्नी उर्मिला, नारायणचे अन्य नातेवाईक, नारायणला त्याच्या समाजोपयोगी कार्यात खांद्याला खांदा लावून मदत करणारे कार्यकर्ते; नारायणला अनेक बरेवाईट अनुभव मिळवून देणारे अन्य अशा सर्वांची ही गोष्ट आहे.
'माझं दु:ख हे जगाचं दु:ख आहे व जगाचं दु:ख हे त्याहूनही मोठं आहे' हे प्रांजळपणे मांडलेले विचार वाचकाला अंतर्मुख करतात.
'गटुळं' ही रवींद्र बागडे यांची पहिली कादंबरी.
ही कादंबरी नारायणच्या जन्मापासून लग्नापर्यंतच्या जीवनप्रवासाचं वर्णन करते.

**२ री आवृत्ती**




# गटुळं

लेखक **रवींद्र बागडे**

**किंमत : १६०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

चर्मकार समाजात जन्मलेल्या आणि मुंबईतल्या फुटपाथवर वाढलेल्या श्री. रवींद्र बागडे यांची ही आत्मकथनात्मक कादंबरी. यातला 'नाऱ्या' हे लेखकाचंच प्रतिरूप. कमालीचं दारिद्र्य, दारूच्या व्यसनापायी कुटुंबाची धूळधाण करणारा बाप आणि नवऱ्याच्या छळाला तोंड देत सात पोरांच्या कुटुंबाच्या पोटाला घालण्यासाठी मरेमरेस्तोवर कष्ट करणारी आई; सोबतीला गलिच्छ फुटपाथवरचं जनावरांच्या मोलानं जगणं आणि भोवताली बहुरंगी, बहुढंगी मुंबई हे नाऱ्याचं प्राक्तन.

त्यामुळे त्याच्या कोवळ्या भावविश्वात अनेक 'जहरी' अनुभवांचं 'गटुळं' आहे. या आत्मकथनात केवळ चर्मकार समाजाचं दर्शन घडत नाही, तर गाळात रुतलेल्या माणसाच्या जगण्याच्या धडपडीचं आणि आपल्यासारख्या रुतलेल्यांना हात देण्याच्या जिद्दीचं वास्तव चित्र उमटलेलं आहे.

यातलं फुटपाथवरचं वातावरण, वेश्याव्यवसायाचं जग, रेस, जुगार यांचं विदारक चित्रण पांढरपेशा मनाला धक्का देणारं आहे !

आज असंख्य माणसं या परिस्थितीत जगतायत्. याला जबाबदार कोण? बालमजूर प्रतिबंधक कायदा नेमका कोणासाठी? यांच्या पोटाची सोय होत नाही, तोवर ही मुलं धंदापाणी सोडून शिकणार कशी? बोलभाषेत सहज उलगडत जात ही कादंबरी परिस्थितीचं विदारक दर्शन घडवते व वाचकांना अंतर्मुख करते.

अभिप्राय

# इमॅजिनिंग इंडिया

लेखक : नंदन निलेकणी

अनुवाद : अपर्णा वेलणकर

## भारताच्या भविष्याचे साक्षेपी चित्र




भारत नेमका कसा आहे, त्याची वाटचाल कोणत्या मार्गाने सुरू आहे, याविषयी प्रत्येक व्यक्तीची विशिष्ट मते असतात. इतिहासाविषयी, वर्तमानाच्या संदर्भात आणि भविष्याबाबतही असेच अनेक वेगवेगळे विचार असतात. सभोवताली घडणाऱ्या घटनांमुळे ही मते कमी अधिक प्रमाणात बदलत असतात. बरेचदा त्या विचारांचा गाभा मात्र कायम राहतो. नंदन निलेकणी या अशाच एका चिंतनशील भारतीयाने आपल्या देशाच्या जडणघडणीचा नवीन संकल्पनांच्या माध्यमातून वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वतंत्रपणे काहीतरी करण्यासाठी पुढे सरसावलेल्यांपैकी निलेकणीही एक उमदे व्यक्तिमत्त्व. १९८१मध्ये स्थापन झालेल्या 'इन्फोसिस' या आयटी क्षेत्रातील कंपनीचे सहसंस्थापक. या कंपनीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. काही वर्षापूर्वी, सर्व भारतीयांना 'आधार'च्या रूपाने समान ओळख देणाऱ्या केंद्र सरकारच्या 'युनिक आयडेन्टिटी ॲथॉरिटी ऑफ इंडिया'चे अध्यक्षपद त्यांच्याकडे सोपवण्यात आले. भारताचे भवितव्य कसे आहे, याच्याविषयी मतमतांतरे आहेत. निलेकणी यांनी याच गोंधळातून मार्ग शोधण्याचा प्रयत्न म्हणून 'इमॅजिनिंग इंडिया' हे पुस्तक लिहिले. त्याचा मराठी अनुवाद अपर्णा

वेलणकर यांनी केला असून 'मेहता पब्लिशिंग हाऊस ने तो प्रकाशित केला आहे.

भविष्याकडे कोणत्या दिशेने जावे, कसे आणि कोणत्या मार्गाने जावे, यावर एकमत नसल्याने सर्वत्र संघर्ष आहे. गोंधळ उडाला आहे. या गोंधळाच्या मुळाशी देश म्हणून आपल्याला असलेल्या आंतरिक मर्यादाही आहेत. या अंतर्गत संघर्षाचा अर्थ लावण्याचा, शक्य तर या संघर्षाच्या निराकरणाचे मार्ग शोधण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला गेला आहे. त्यांनी केलेला प्रवास, 'इन्फोसिस'च्या जडणघडणीतील अनुभव, त्याचबरोबर धोरणकर्ते, राज्यकर्ते यांच्याशी निरनिराळ्या निमित्ताने झालेल्या चर्चा, परदेशातील उद्योजक, विचारवंत यांचा भारता विषयक दृष्टिकोन या सगळ्यांचा साकल्याने आराखडा मांडत भविष्यातील भारताचे चित्र निलेकणी यांनी रेखाटले आहे.

या पुस्तकांमागची भूमिका 'वाकड्या वाटेला जाताना' या प्रस्तावनावजा लेखात निलेकणी यांनी अतिशय नेटकेपणाने विशद केली आहे. मतभिन्नता हा दोष नाही. तर ती चैतन्यशीलतेची ग्वाही असल्याचा धागा पकडून त्यांनी या पुस्तकाचे लिखाण केले आहे. स्वत:च्या उद्योजकतेच्या प्रवासाचा मागोवा घेत, गेल्या तीन दशकांत भारताची निरनिराळ्या क्षेत्रातील उत्क्रांतीचे टप्पे त्यांनी अधोरेखित केले आहेत.

भारताची सगळ्यात मोठी जमेची बाजू म्हणजे भारतातील मनुष्यबळ. जागतिक बाजारपेठांना या मनुष्यबळाचे आकर्षण आहे. शिवाय, आपल्याकडील उद्योजकांनीही त्याचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात केली आहे. अर्थात, हा बदल काही सोपा नव्हता. त्यात अनेक अडचणीचा सामना करावा लागला. या नवीन प्रवासाला निघाल्यावर आलेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक टप्प्यांचे विश्लेषण निलेकणी यांनी बारकाईने केले आहे. देशाची बदलती स्थिती, बदलते चेहरे, नवीन वाटा, संकल्पना या पार्श्वभूमीवर वादविवादांचे मोहोळ उठणे स्वाभाविकच. संकल्पनांच्या कोंडीपासून आपल्या उच्च शिक्षणाच्या पद्धतीपर्यंत अनेक वाद आहेत. त्यामुळे झालेल्या चळवळी, आंदोलने यांची उजळणी निलेकणी यांनी केली आहे. तर, भविष्य घडवणाऱ्या संकल्पनांचा वेध घेत असतानाच आरोग्य, सामाजिक असुरक्षितता,पर्यावरणावरील आक्रमण, ऊर्जेचे संकट यावरही निलेकणी यांनी भाष्य केले आहे.

शून्यातून उद्योगविश्व उभे करणारे नारायण मूर्ती आणि खेड्यातून आलेला महेंद्रसिंग धोनी हे नवीन भारताचे 'हिरो' आहेत. सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी काहीही असली तरी, सामान्य माणसे यशाच्या शिखरावर पोहोचू शकतात; असा विश्वास या देशात कधी नव्हे तो निर्माण झाला आहे. इतरांच्या यशाबद्दलचा आदर आणि तसे यश आपल्याही वाट्याला यावे, येऊ शकते, अशा विश्वासाने अविरत

कष्ट करण्यासाठी तयारी हा साऱ्या देशाला एकत्र करू शकणारा बळकट दुवा आहे; हे या आधी कधी घडले नव्हते, अशी मांडणी निलेकणी यांनी केली आहे.

आर्थिक विकास साधण्यासाठी, सामाजिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी नवीन संकल्पना, ध्येयधोरणे आखली जायला हवीत. त्यांचा विचार आला की तात्कालिक भावनाबाबत बाजूला ठेवावी आणि तर्कशुद्ध विचारांचा, यक्तिवादांचा आधार घ्यावा, हेच योग्य, या मनोभूमिकेतून साकारलेले 'इमॅजिनिंग इंडिया' विचार करायला भाग पाडते.

**- रवींद्र मांजरेकर**

**महाराष्ट्र टाईम्स, २६ मे २०१३**

# डॉ. कलाम यांना जाणवलेले आपल्या जीवनातील टर्निंग पॉइंट्स




डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या 'विंग्ज ऑफ फायर' या पुस्तकानंतरचा स्फूर्तिदायक भाग या पुस्तकात आला आहे. राष्ट्रपतीपदाच्या कालखंडात जे अनुभव आले त्याचे हे शब्दांकन आहे. एका आव्हानात्मक परिस्थितीमध्ये डॉ. कलाम राष्ट्रपती झाले.

चौदा विभागांमध्ये या पुस्तकाची रचना करण्यात आली असून भारताचे गुणगान मी केव्हा शकेन या पहिल्या प्रकरणापासून 'राष्ट्रपतिपदानंतर....' या शेवटच्या प्रकरणापर्यंत डॉ. कलाम आपल्या अनुभवांचे दान वाचकांच्या ओंजळीत देतात. यातील 'माझी गुजरात भेट' हे प्रकरण गुजरातच्या दंगलीनंतर जे काही झाले त्यावर आधारित आहे. थोडक्यात अनेक अशक्य वाटणाऱ्या कथा या पुस्तकात आल्या आहेत.

**गांवकरी,**

**दि. ९ जून २०१३**

# सुरस आणि चमत्कारिक (स्टोन्स इन्टू स्कूल्स)




ग्रेग मॉर्टेन्सन. बेस्ट सेलर म्हणून जगभरात गाजत असलेल्या 'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकाचा लेखक. हे पुस्तक पाकिस्तानमधील काराकोरम या अतिशय उंच व दुर्गम पर्वतराजीतील कॉर्फे या गावात ग्रेगच्या 'सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूट' ने ज्ञानाची आस असलेल्या लोकांसाठी बांधलेल्या शाळेची अद्भुत व अविश्वसनीय गोष्ट सांगते. फेब्रुवारी २००७ मध्ये प्रकाशित झालेले हे पुस्तक १४० आठवड्यांपेक्षा अधिक काळ 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या बेस्ट सेलर लिस्टमध्ये झळकत होते. तब्बल ४३ आठवडे ते सर्वाधिक विक्रीत पहिल्या क्रमांकावर होतं.

२००३ साली ज्या टप्प्यावर 'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकाची कथा थांबते, तिथून पुढची कथा 'स्टोन्स इन्टू स्कूल' या पुस्तकात आली आहे. या कहाणीचा प्रारंभ १९९३ साली पाकिस्तानमध्ये झाला. गिर्यारोहक ग्रेग हा जगातील द्वितीय क्रमांकाच्या शिखरावरती चढत असताना वाट चुकला आणि भरकटत कोर्फे या खेड्यात पोहोचला. तेथे पोहोचल्यावर तेथील लोकांच्या जगण्याचे जे भीषण वास्तव त्याच्यासमोर आले, त्यातून त्याच्या आयुष्याला नाट्यमय वळण मिळाले. आपले पुढचे आयुष्य या दुर्गम पर्वतराजीमध्ये शाळा बांधण्यासाठी वेचायचा निश्चय त्याने केला. त्या अनुभवातूनच 'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकाची निर्मिती झाली. या ठिकाणचे शाळा बांधण्याचे काम पूर्ण झाले. पण एवढ्यावरच थांबेल तर तो ग्रेग कसला? त्याला त्याच दरम्यान अफगाणिस्तानमधील ईशान्येकडील दूरवरच्या एकाकी कोपऱ्यातील किरगिझी लोकांनी आपल्या भागात शाळा बांधण्याची विनंती केली. त्यांच्या या हाकेला ओ देण्यासाठी ग्रेगने पाकिस्तानमध्ये बांधलेल्या शाळा प्रकल्पाहून कितीतरी अधिक आव्हानात्मक कामाला (ज्याला त्याचे सहकारी 'अफगाण साहस' म्हणतात!) हात घालण्याचा निश्चय केला.

'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकातील काही घटनांमुळे ग्रेगला त्याच्या कामाची सुसूत्र दिशा सापडली. त्यामुळे 'स्टोन्स इन्टू स्कूल'या पुस्तकाची पार्श्वभूमी

समजण्यासाठी ग्रेगने 'थ्री कप्स ऑफ टी'चा काही भाग या नव्या पुस्तकात दिला आहे.

सुमारे तीन दशके यादवी युद्ध आणि परकीय सत्तेच्या वर्चस्वाखाली होरपळत असलेल्या शतखंडित अफगणिस्तानचे भविष्य अक्षरश: अंध:कारमय झाले होते. प्रत्येक इलाख्यावर एकेक कट्टर मूलतत्त्ववादी टोळीप्रमुख सत्ता गाजवीत होता. या काळात सत्तेसाठी अनेक मुजाहिदीन गट एकमेकांशी लढत होते. एकेकाळी रशियाचा एकत्रितपणे सामना करणारे सगळे गट-तट सत्तेसाठी एकमेकांच्या जिवावर उठलेले होते. वेगवेगळ्या टोळ्या, संस्कृती, भाषा आणि भौगोलिकता याबाबत विविधता असलेल्या अफगणिस्तानात प्रचंड अराजकता, हिंसाचार, भ्रष्टाचार, बेकारी, अंमली पदार्थांची व्यसनाधीनता अशी सर्वव्यापी बजबजपुरी माजली होती. अशा अत्यंत कठीण काळात ग्रेग मॉर्टेन्सन आणि त्याच्या स्थानिक सहकाऱ्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी या देशात शाळा बांधण्याचे खडतर काम हाती घेतले. त्या तशा वातावरणात शुद्ध वेडेपणा ठरू शकणारी ही सगळी कहाणी 'स्टोन्स इन्टू स्कूल' या पुस्तकातून  आपल्यासमोर उलगडत जाते तेव्हा 'अशक्य' हा एकमेव शब्द आपल्यापुढे उभा राहतो.

अफगाणिस्तानमधील या सर्वांत कठीण काळात अनेक हिंसक तसेच थरारक घटना घडत होत्या. येथील तरुणांना जिहादच्या नावाखाली कट्टर तालिबानी बनविले जात होते. या तालिबान्यांनी सर्वांत मोठा घाला घातला तो येथील शिक्षणव्यवस्थेवर! मुलींनी हाती पुस्तक घेणे हे इस्लामबाह्य असल्याचे जाहीर करून त्यांना ठार मारण्याची शिक्षा या काळात अफगाणिस्तानात दिली जात होती. स्त्रियांची अवस्था जनावरांपेक्षा वाईट होती. चोरून, लपून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षिकांना जाहीररीत्या ठार मारले जात होते. अंगावर बॅटरीतील ॲसिड ओतणे, लैंगिक अत्याचार करणे हे तर नेहमीचेच वास्तव होते. कैदखान्यात कोंडलेलं आयुष्य जगणाऱ्या अफगाणिस्तानमधील बहुसंख्य स्त्रिया आणि मुली मानसिक आजाराने व दारिद्र्याने प्रत्यही आत्महत्या करीत होत्या. कट्टर मूलतत्त्ववादी सहकाऱ्यांच्या जोरावर चाललेला ओसामा बिन लादेनचा इस्लामचा अत्यंत विखारी प्रचार अफगाणिस्तानात शिगेला पोहोचला होता. या सर्व पार्श्वभूमीवर ग्रेग व त्याच्या सहकाऱ्यांच्या खडतर संघर्षाची आपण फक्त कल्पनाच करू शकतो.

अफगाणिस्तानमधील अस्थिरता ही बंदुका, रणगाडे, हवाई हल्ले यांनी नाही, तर वह्या, पुस्तकं, पेन, पेन्सिल या शिक्षणाच्या शस्त्रांनी संपणार आहे, यावर ग्रेगचा विश्वास असल्याने त्याने येथील मुलींच्या शिक्षणासाठी जे 'अफगाण साहस' केले ते शब्दश: जीवावर उदार होऊनच! ही सगळी कहाणी त्याने स्वत:ची

अजिबात स्तुतिस्तोत्रे न गाता तटस्थतेने मांडली आहे.

अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर तर अफगाणिस्तानमधील परिस्थिती अत्यंत घातक बनली होती. अमेरिकेने या हल्ल्याला जे प्रत्युत्तर दिले त्यात प्रचंड संहार झाला आणि हा देश विकासापासून दूर फेकला गेला. या युद्धानंतर अमेरिकेने हाती घेतलेल्या शांतीकार्याचाही अक्षरश: बोजवारा उडाला होता. अमेरिकन कंत्राटदारांनी या मदतकार्यात भ्रष्टाचाराची परिसीमा गाठलेली असतानाच उरल्यासुरल्या तोकड्या मदतीलाही अफगाणी नोकरशाहीने गळती लावली होती. अशावेळी दिवसात अवघी तीन तास झोप घेत, नुसत्या चहावर उत्साह टिकवून धरत ग्रेग आणि त्याचे सहकारी सहा-सहा महिने बर्फाने खिंडी बंद होणाऱ्या आणि जगातील सर्वाधिक भूसुरुंग पेरलेल्या अत्यंत धोकादायक भागात इथल्या मुलींना शिक्षणाची मूलभूत सुविधा पुरवण्याकरता शाळा बांधण्यासाठी धडपडत होते. तीस-तीस तासांचा अखंड व भीषण मोटारप्रवास, त्यानंतर घोड्यावरची दौड व सरतेशेवटी पायी प्रवास, महिनोन् महिने व आंघोळ न करता प्रचंड थंडीला सामोरे जात, वेदनाशामक गोळ्यांचे बारा ते पंधरा डोस दिवसभरात घेत... आपले इच्छित ध्येय गाठण्यासाठी ते अत्यंत तळमळीने प्रयत्न करीत होते. तालिबान्यांकडून जीवे मारण्याच्या धमक्या आणि अन्य अनेक धोके पत्करून त्यांनी अविश्रांतपणे केलेल्या कार्याचा आलेख अंगावर शहारे आणणारा आहे. दुसऱ्या बाजूला अफगाणी लोकांची व विद्यार्थिनींची शिक्षणाची तीव्र आस या भयानक परिस्थितीतही कमी झालेली नसल्याचे आपल्या लक्षात येते. शिक्षण हेच आपल्या अंध:कारमय जीवनात नवा प्रकाशकिरण घेऊन येईल, यावर येथील लोकांची ईश्वराइतकीच अढळ श्रद्धा होती. युद्धातील बॉम्बहल्ल्यांमुळे मोडलेल्या इमारती, मुताऱ्या, तंबू यांमध्ये अक्षरश: लपूनछपून शिक्षण घेण्याचे व देण्याचे पवित्र काम काही स्थानिक कार्यकर्त्यांच्या साहाय्याने जिवावर उदार होऊन इथे केले जात होते. ते पाहून ग्रेगला प्रेरणा मिळाली आणि या भागात शाळा बांधून देण्याचा त्याचा निश्चय दृढनिश्चयात रूपांतरित झाला. हे अविश्वसनीय वाटावे असे खरेखुरे वास्तव चित्र या पुस्तकात अत्यंत रोमहर्षक पद्धतीने उभे करण्यात आले आहे. एखाद्या अरबी सुरस कथेस लाजवेल अशी ही ‘सत्यकथा’ आहे.

याच दरम्यान पाकिस्तानात झालेल्या भूकंपात २१५९ शाळा-कॉलेजे नष्ट झाली होती. पाच लाख विद्यार्थ्यांच्या शिक्षणात त्यामुळे खंड पडला होता. चार मिनिटांत साक्षर विद्यार्थ्यांची एक संपूर्ण पिढीच्या पिढी संपली होती. आणि त्यातून उरलेले, वाचलेले सर्वच जण बधिर मन:स्थितीत होते. अशावेळी ग्रेगने स्थानिक रहिवाशांच्या मदतीने भूकंपग्रस्त भागात शाळाबांधणीची मोहीम हाती घेतली. वीज, पाणी, रस्ते या मूलभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या व जगाशी संपर्क तुटलेल्या या

भागांत त्याने केलेले काम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे जिहाद्यांची भयंकर दहशत असलेल्या या परिसरात केवळ दोन महिन्यांच्या काळात दोन डझनापेक्षा जास्त छोट्या शाळा सुरू करण्याची ग्रेग व त्याच्या सहकाऱ्यांनी जी यातायात केली, ती वाचून आपण अक्षरश: चक्रावून जातो. सरकारी वा परकीय मदतही पोहोचू न शकणाऱ्या या भूकंपग्रस्त भागांत अथक कष्टांनी उभ्या केलेल्या शाळांचे रोमांचक अनुभव या पुस्तकात चित्रदर्शी शैलीत मांडण्यात ग्रेग यशस्वी झाला आहे.

राजकारण्यांच्या पोपटपंचीपेक्षा एका कृतिशील व्यक्तीचे हे प्रचंड कार्य पाहून स्तिमित व्हायला होते. ग्रेग मॉर्टेन्सनचा दहशतवाद्यांच्या अत्याचारांना शह देण्याचा हा मार्ग निश्चितच प्रेरणादायी आहे. प्रसिद्ध पत्रकार टुडी रुबिन याने या पुस्तकाबाबत केलेले केलेले विधान सार्थ असल्याचे आपल्या प्रत्ययास येते.

मेहता प्रकाशनाने सुनीती काणे यांच्याकडे या मौलिक पुस्तकाच्या अनुवादाची जबाबदारी सोपवली ती किती योग्य होती, हे पुस्तक वाचताना पानोपानी जाणवते. अत्यंत समर्पक शब्दातील हा सहजसुलभ अनुवाद हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. चंद्रमोहन कुलकर्णी यांचे मुखपृष्ठ आशयपूर्ण आहे. दगडांच्या मध्यभागी पुस्तकांची चवड रचून त्यांनी शीर्षकाला कलात्मक न्याय दिला आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक खालीद हुसेन यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. तीही वाचनीय व संदर्भयुक्त आहे. बॉम्ब वापरून नव्हे, तर शाळा व पुस्तके यांच्या माध्यमातून पाकिस्तान व अफगाणिस्तानात शांतता प्रस्थापित करण्याचा ग्रेगचा हा प्रयत्न जागतिक शांततेचे महत्त्व अधोरेखित करतो, हे निश्चित.

**- भूषण राक्षे**

**लोकसत्ता, १६ जून २०१३**




**१५ वी आवृत्ती**

# धिंड

**शंकर पाटील**

**किंमत : ११०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**




२ री आवृत्ती

# याला जीवन ऐसे नाव

लेखक **संजीव परळीकर**

**किंमत : ८०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

गोष्टीची पुस्तके आपल्याला नेहमीच आवडतात. छोट्या छोट्या गोष्टींचा संग्रह जर एकाच पुस्तकात मिळाला तर आपल्याला आणखीनच आवडते, त्यातूनही त्या पुस्तकात जर प्राण्यांच्या गोष्टी असतील तर मग काय विचारता! तुम्ही जर माझ्याशी सहमत असाल तर हे पुस्तक तुम्हाला निश्चितपणे आवडेल. ह्या पुस्तकात मी छोट्या छोट्या चौदा गोष्टी लिहिल्या आहेत.

काही गोष्टी काल्पनिक आहेत, काही सत्यकथा आहेत, काही प्राण्यांच्या गोष्टी आहेत, तर काही इमेलद्वारे माझ्यापर्यंत पोहोचल्या आहेत. ह्या गोष्टींतून जे मोठे मोठे धडे घ्यायचे आहेत, ते तात्पर्यामध्ये लिहिलेच आहेत, पण हे धडे अमलात आणले तर आयुष्यावर दूरगामी परिणाम काय होतील ते मी सांराशामध्ये लिहिले आहेत. माझे हे गोष्टीचे पुस्तक तुम्हाला निश्चित आवडेल.




३ री आवृत्ती

# देवदास

लेखक :**शरच्चंद्र चट्टोपाध्याय**
अनुवाद : **मृणालिनी गडकरी**

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

*'देवदास'*
*शरदबाबूंच्या लेखणीतून साकारलेली एक अजरामर प्रेमकहाणी. ही त्यांची (१८७६-१९३८) लहान, पण गाजलेली कांदबरी.*

ह्या लहानशा कादंबरीतही शरदबाबूंची बहुतेक सर्व लेखन-वैशिष्ट्ये उतरलेली दिसतात. ह्यातील व्यक्तिरेखांना शरदबाबूंच्या प्रतिभेचा परीसस्पर्श झाल्यामुळे त्या विलक्षण असूनही जिवंत वाटतात. प्रेम-असूया, त्याग-लोभ, माणुसकी-अमानुषता, समंजसपणा-बेजबाबदारपणा, सेवापरायणता-आपमतलबीपणा, औदार्य-कृपणता, निरागसता-धूर्तपणा ह्या परस्पर-विरोधी भावनांबरोबरच ममता, वात्सल्य ह्या भावनांची मनोहर गुंफण ह्या कथानकात दिसून येते. वरवर अतिशय साधे वाटणारे पण बरंच काही सांगून जाणारे संवाद हे ह्या कादंबरीचं बलस्थान आहे. त्या विशिष्ट काळातील समाज हा पार्श्वभूमी म्हणून आला असला तरी आपल्या सहजसुंदर लेखनशैलीनं शरदबाबू त्याचे सम्यक दर्शन घडवतात. शरदबाबूंची प्रासादिक भाषा थेट रसिक मनालाच हात घालते. ह्यामुळेच ही प्रेमकहाणी फक्त शोकांतिकाच न ठरता त्याही पलीकडे जाऊन पोहोचते. म्हणून आजही ती मनाला आकर्षित करते.




**४ थी आवृत्ती**

# लवंगी मिरची कोल्हापूरची

**शंकर पाटील**

**किंमत : ६०/-रु. पोस्टेज : २५/-रु.**

गावचा इरसालपाटील. रसिक, रंगेल! एका चटकचांदणीच्या प्रेमात पडतो आणि चक्क दुसरी बायको म्हणून तिला घरात आणतो.
मग काय! दोन हक्काच्या बायकांमधे त्याची जी त्रेधातिरपीट उडते...
सुप्रसिद्ध लेखक शंकर पाटीलयांच्या खास शैलीतलं हे नाटक!
खटकेबाज संवाद, ढंगदार लावण्या आणि खास गावरान बोलीची लज्जत वाढवणारी... ''लवंगी मिरची कोल्हापूरची!''




**५ वी आवृत्ती**

# कथा अकलेच्या कांद्याची

**शंकर पाटील**

**किंमत : ७०/-रु. पोस्टेज : २५/-रु.**

अकलेचा कांदा!
त्यो ही अवचितरावाच्या मेंदुत!!
कवटीपरीक्षा वैद्य त्याच्यावर इलाज करतूया!!!
आणि अवचितरावाच्या अकलेच्या कांद्यावरीलइलाज केल्यावर काय घडतंय ते वाचायलाच पायजे गड्यांनो!




२ री आवृत्ती

# कृष्णदेवराय

**डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली**

**किंमत : २७०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

विजयनगर 'साम्राज्य' म्हणजे भारतीय हिंदुसंस्कृतीचा, हिंदवी स्वराज्य स्थापनेचा 'महोन्नत महामेरू' म्हणून ओळखले जाते. धर्म, संस्कृती, नृत्य, नाट्य, साहित्य, संगीत या संदर्भात या साम्राज्याचे फार मोठे योगदान आहे.

या साम्राज्याच्या इतिहासातील सर्व सम्राटांमध्ये 'कृष्णदेवराय' हा अतुलनीय असा सम्राट होता. त्याच्या कारकिर्दीत विजयनगरची सेना दिग्विजयी गणली गेली. श्री चैतन्य महाप्रभू, वल्लभाचार्य, संत कनकदास, संत पुरंदरदास आदी सत्पुरुषांना त्याने सन्मानित केले. प्रख्यात मध्वाचार्य श्री व्यासतीर्थ हे त्याचे गुरू होते.

कृष्णदेवराय हा केवळ लष्करी बाण्याचा सम्राट नव्हता, तो लोकहितदक्ष राजाही होता. त्याने आपल्या प्रजेच्या सुखासाठी, लोकहितासाठी अनेक कामे केली. त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्याविषयी तत्कालीन परकीय पोर्तुगीज प्रवाशांच्या वृत्तान्तातून विश्वसनीय माहिती व तपशील उपलब्ध

झाले आहेत. या प्रवाशांनी विजयनगरला भेट देऊन तेथे काही दिवस वास्तव्य केले होते. तसेच कृष्णदेवरायाने खोदलेल्या शिलालेखातूनही त्याच्या कार्याची माहिती मिळते. विजयनगरपासून बेळगाव, गोवा, कटक ते श्रीलंकेपर्यंत त्याने राज्य केले.

कन्नड, तेलुगु, तमिळ, संस्कृत या विविध भाषांतून त्याने मनोज्ञ असे ग्रंथलेखन केले. आंध्रचा 'भोजराजा' म्हणून त्याची ख्याती सर्वदूर दरवळली होती. त्याच्या दरबारात महान असे अष्टदिग्गज कवी होते. 'तेलुगु कालिदास' म्हणून सर्वश्रुत असलेल्या 'श्रीनाथ' कवीची त्याने सुवर्णतुला केली. अवघ्या एकोणीस वर्षांच्या कारकिर्दीत त्याने तिसाहून अधिक लढाया केल्या आणि सर्व जिंकल्या. त्याने लिहिलेल्या 'अमुक्तमाल्यदा' या काव्यग्रंथाची गणना तेलुगुतल्या सर्वश्रेष्ठ अशा पंचकाव्यात होते. शस्त्र आणि शास्त्र यांच्यावर अभूतपूर्व हुकमत गाजवणारा असा दुसरा सम्राट झाला नाही.

# पाहिजेत

पुस्तक प्रकाशन संस्थेत पुढील जागा त्वरित भरावयाच्या आहेत

## संपादक (‘ग्रंथजगत’ मासिक) (१ पद)

**मासिक वेतन :** १०,०००/- ते १२,०००/-

**पात्रता :** मराठी भाषेचे उत्तम ज्ञान, पेजमेकर, कोरल ड्रॉ, ले-आऊटचे, एम.एस.ऑफिसचे ज्ञान आवश्यक.

## डीटीपी ऑपरेटर – महिला उमेदवार

**मासिक वेतन :** ९,०००/- ते १०,०००/-

**पात्रता :** मराठी भाषा व व्याकरणाची उत्तम जाण, कॉम्प्युटर विशेषत: पेजमेकर, कोरल-ड्रॉ, फोटोशॉपची माहिती असणे आवश्यक.

## **Communicator** - Female (1 Post) **Salary :** 15,000/-

Skills : Excellent command over English and Marathi oral and written communication, Quick decision making, Professionalism

## **Godown Incharge** - Male (1 Post) **Salary :** 8,000/-

Skills : Graduate, Knowledge of MS-Office,
Prior experience in book shop will be preferred.

## **Telecaller** - Female (1 Post) **Salary :** 6,000/-

Skills : Graduate having good communication skills,
Smart & Active.

प्रकाशन संस्थेतील उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाईल.

**Mehta Publishing House**
1941, Sadashiv Peth, Madiwale Colony, Opp.
Bajirao Road Telephone Bhavan, Pune - 411030.

Send us your updated resume along with photograph
to above Address or
**e-mail to hr@mehtapublishinghouse.com**

English Books



**William Coles**

He has been a journalist for over 20 years and has worked for a number of papers including The Sun, The Express, The Mail and The Wall Street Journal.

He is the author of 'The Well Tempered Clavier' (2007), 'Lord Lucan: My Story' (2009), 'Dave Cameron's Schooldays' (2010), 'Mr Two Bomb' (2010) and 'Simon Cowell: The Sex Factor' (2011).

# Book Review




## MR.TWO BOMB

**WILLIAM COLES**

**Price Rs. 350/-**
Postage - Rs.30/-

They say, life gives us all one fair chance; but what would you say for a man who got not one but two fair chances at life itself? That too, not through some mundane mishap but through two of the biggest tragedies the world has experienced in the history of time!

'Mr. Two-Bomb', written by William Coles, is a work of fiction based on the true-life account of a twice-over-survivor of the atomic bomb attacks on both, Hiroshima and Nagasaki. The A-bombs dropped by USA on Japan unleashed one of the

worst exoduses ever. Lakhs of people were killed and thousands more suffered a lifetime of torture due to the resultant radiation sickness. Such was the ferocity of the bombs that entire parts of Hiroshima and Nagasaki were wiped out in a few seconds. Buildings, roads, water-bodies, animals, people all got mercilessly razed to the ground. A handful few managed to survive the attack due to coincidentally being in some safe place when the bomb dropped. But Mr. Two-Bomb (as the protagonist prefers to call himself, without revealing his real name) got lucky two times, as he survived the attack on Hiroshima, only to land up in Nagasaki and survive the attack there too!

The story begins with Mr. Two-Bomb describing his callous, selfish attitude towards everything in life. A self-confessed despicable man, Mr. Two-Bomb lives in Hiroshima, away from his wife Mako and son Toshiaki who live at Nagasaki. Life is carefree for him with his job as a kite-maker and scores of lovers to keep him entertained. Till then, it has been four years since Japan's attack on Pearl Harbour and increasingly, the buzz of America planning a vicious revenge had begun strengthening its hold. After the euphoria of

the attack dies down, Japan starts preparing for the impending blowback by America. But nothing could have prepared it for the enormity of what the enemy had in store for them.

# New Books









On the fateful day of 6th August 1945, the people of Hiroshima start their day as usual. Mr. Two-Bomb also languidly traipses off to his workplace, where he soon has an altercation with a senior official. Standing in the official's room listening to his rants, the protagonist happens to notice two B29 bomber planes zooming down at a rapid pace; but he doesn't think much of them till he goes into the warehouse to start work. Hardly does he lock the door of the warehouse, when the fist of fury slams Hiroshima in its face! In a matter of minutes, the city humming with mundane voices turns into a bedrock of anguished screams and cries! Having remained safe due to being in the warehouse, Mr. Two-Bomb comes out to see his colleagues bloodied and burnt and screaming for death! Hiroshima gets struck by a uranium A-bomb.

From thereon begins Mr. Two-Bomb's journey to becoming a changed man. Initially, his selfish, cold demeanour takes over instinctively as he coolly leaves his colleagues to go find his favourite paramour Sumie. Even the most pitiable sights of babies burnt to charcoal and people with their flesh hanging from their bodies does not melt Mr. Two-Bomb's heart. When he reaches Sumie's home, he finds it demolished and Sumie trapped under the debris. He tries to wrench Sumie out with the help of his friend Shinzo and a 7-year old neighbour girl, but fails to retrieve her alive. Thereafter the three people (Mr. Two-Bomb, Shinzo and the girl) begin their journey to the next safe place they can find. Meandering through heart-wrenching descriptions of the bomb-victims wailing for release and Mr. Two-Bomb's callous attitude towards them on the backdrop of Shinzo and the girl's strife to help them in every way possible, brings the trio to a makeshift hospital. This is where an incident occurs to change Mr. Two-Bomb for the better and soon, he too starts helping the victims. After two interminable days of seeing maggot-filled wounds, women with clumps of hair falling out, and men retching blood, the protagonist and the girl board a train to Nagasaki. Shinzo gets left on the station but he catches up in

due course.

The protagonist takes the girl to his home on the morning of 9th August 1945, where even as his wife Mako starts warming up to her, calamity strikes in the form of an even fiercer plutonium A-bomb! Yet again, by some sheer stroke of fate, the protagonist and the girl get saved but Mako gets gravely injured to die soon after. Shinzo, who reaches Nagasaki that morning itself, also gets burnt alive. However, Toshiaki (the baby) and Shinzo's wife Sakae live through the ordeal. The story ends on a note of hope as Mr. Two Bomb marries Sakae and adopts the girl (who he names Katsuko). In their own little way, the trio becomes an Ambassador for Little Boy and Fat Man (as the bombs were named); touring the world over, spreading knowledge about how Japan suffered due to those attacks.

The author William Coles deserves special credit for managing to weave fiction into such a heart-wrenching real-life account of a Hibakusha (A-bomb survivor). Not just that, he also manages to weave strings of romance and emotion into what could have been a very cut & dry account of life in the wake of those attacks. The description of what transpired after the bombs is grippingly lurid to say the least! The reader gets a chill down the spine as gruesome pictures of the victims' agony is put forth no-holds-barred. On that backdrop, Coles also paints a vivid picture of the transformation that Mr. Two-Bomb goes through. Such is the impact of Coles' words that the reader feels like he/she is walking amidst those hapless victims crying out for death, lying amidst the rubble that was once their home or workplace. The potency of the catastrophe; the impactful way in which its after-effects have been expressed; and the transformation of an ordinary man, who turned out to have an extra-ordinary life story, makes 'Mr. Two-Bomb' a sure-fire read!

**- Reshma S. Kulkarni**

**१० वी आवृत्ती**




# झोपाळा

लेखक : **वपु काळे**

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

मनाच्या विविध रंगछटांचं दर्शन वपुंच्या या पुस्तकातून घडतं.
यातल्या प्रत्येक कथेतला वेदनेचा अंत:स्रोत
वाचकांना वेढून टाकतो.
या वेदनेसह जगणाऱ्या मनस्वी व्यक्तींच्या मनस्वी कथा आपल्याला अंतर्मुख करतात.
स्वत:चा शोध घ्यायला भाग पाडतात.
या कथांमधीलमाणसांचे स्वभाव, त्यांची सुखदु:खे,
त्यांच्या समस्या, त्यांची स्वप्ने ही आपल्या आजूबाजूलाच आढळणारी आहेत. त्यांच्या आयुष्यात घडणारे प्रसंग
आपल्या आयुष्यात कधीतरी घडलेले असतात किंवा
इतरांच्या आयुष्यात त्याचे प्रतिबिंब बघितलेले असते
आणि म्हणून ती माणसे आपली वाटतात.
छोट्याशा कथाबीजाचे फुलवत फुलवत भावस्पर्शी कथेत
रूपांतर करण्याचे वपुंचे कसब व सामर्थ्य,
साध्या सोप्या संवादातून जीवनाचे एखादे तत्त्वज्ञान सांगण्याची त्यांची हातोटी, जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला वेगळेच बळ देतो.




३ री आवृत्ती

# विद्रोही

## ओशो

अनुवाद : **माधुरी काबरे**

**किंमत : १६०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

जगभरातील सर्वसामान्य माणसांपासून विचारवंतांपर्यंत अगणित माणसांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ओशोंची प्रश्नोत्तरांच्या स्वरूपातील प्रवचनं 'विद्रोही' या पुस्तकात संकलित केलेली आहेत.

ओशोंच्या दृष्टीनं विद्रोह हेच धार्मिक व्यक्तीचं व्यवच्छेदक लक्षण आहे. अध्यात्माचं शुद्ध रूप म्हणजेच विद्रोह, असं त्यांचं प्रतिपादन आहे.

ओशो भूतकाळातील कोणत्याही धार्मिक परंपरेशी वा तात्त्विक विचारप्रणालीही संबद्ध नाहीत. त्यांच्या आगमनाने नव्या युगाची सुरुवात व्हावी, इतकी त्यांची विचारधारा स्वतंत्र आहे. त्यांच्या दृष्टीसमोरचा समाज हा कोणत्याही खासगी मालमत्तेला व लग्नसंस्थेला नाकारणारा समाज आहे. या समाजाचं चित्र रेखाटताना ते कठोरपणे आपल्याला आपल्या जुनाट, त्याज्य संस्कारांची जाणीव करून देतात. अपेक्षित स्थितीपर्यंत पोचण्यासाठी ध्यानाला ते एकमेव अग्रक्रम देतात.

हा सारा आशय ओशो अतिशय सोप्या, प्रवाही भाषेत, मार्मिक उदाहरणं देत, कधी मिश्किलपणे, विनोदाची पखरण करत करत असा पटवून देतात, की ती प्रवचनं सहज संवाद बनतात. त्यांच्या द्रष्टेपणाची, प्रगाढअभ्यासाची, अफाट बुद्धिमत्तेची झेप जाणवून मती गुंग होत असतानाच त्यातील आशय वाचकांच्या मनावर आपसुख कोरला जातो.

# श्रद्धांजली

- **प्रख्यात दिग्दर्शक ऋतुपर्ण घोष यांचे निधन**



आपल्या भावनिक, मानसिक आणि लैंगिक भावसंघर्षाचा तरल वेध घेणारे बंगाली चित्रपटसृष्टीतील क्रांतिकारी दिग्दर्शक, लेखक आणि अभिनेते ऋतुपर्ण घोष (वय ४९) यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते स्वादुपिंड विकाराने आजारी होते.

घोष यांनी अवघ्या १९ वर्षांच्या चित्रकारकीर्दीत १२ राष्ट्रीय आणि काही आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवले होते. त्यांचे चित्रपट जाणकार रसिकांकडून गौरविले गेले तसेच अनेक चित्रपटांचे शुभारंभाचे खेळ परदेशी चित्रपट महोत्सवातही झाले. माणसा-माणसांतील भावनिक संघर्ष हा त्यांच्या सर्वच चित्रपटांचा समान धागा असला तरी त्यांचे चित्रपट कधीच भावबंबाळ मात्र झाले नाहीत.

वेशभूषेवरून आणि एकूणच देहबोलीवरून कायमच चर्चेत असणारे ऋतुपर्ण घोष हे बंगाली चित्रपटांच्या नवप्रवाहातील एक महत्त्वाचे नाव होते.

सामाजिक स्थित्यंतराचे दर्शन हा बंगाली चित्रपटांचा पहिल्यापासूनच स्थायीभाव राहिला आहे. सत्यजित रे, मृणाल सेन, ऋत्विक घटक, अपर्णा सेन अशी दिग्दर्शकांची समृद्ध परंपरा असणाऱ्या बंगालमध्ये ऋतुपर्ण घोष यांनी निर्माण केलेले आणि दिग्दर्शित केलेले चित्रपट राष्ट्रीय पातळीवरही चर्चेचा विषय ठरले. त्यातील संदर्भ बंगाली असले तरीही त्यात मांडलेला आशय आणि विषय वैश्विक होता.

३१ ऑगस्ट १९६३ रोजी कोलकाता शहरात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुनील घोष माहितीपटांचे दिग्दर्शन करत. त्यामुळे चित्रपटाचे बाळकडू लहानपणीच त्यांना मिळाले. एका जाहिरात कंपनीपासून त्यांनी कामाला सुरवात केली. १९९४

मध्ये 'हिरेर अंगती' या बालचित्रपटांच्या माध्यमातून त्यांनी बंगाली चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'उन्नीशे एप्रिल' मध्ये अपर्णा सेन आणि देवश्री रॉय यांच्या प्रमुख भूमिका होत्या. याच चित्रपटासाठी ऋतुपर्ण यांना पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यानंतर 'दहन, 'बारिवाली', 'शुभो महुरत', 'उत्सव', 'चोखेर बोली', 'दोसर', 'खेल', 'अबोहोमान', 'नौकाडुबी' या चित्रपटांचे त्यांनी दिग्दर्शन केले. २०१२ मध्ये प्रदर्शित झालेला 'चित्रांगदा' हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला. या चित्रपटात ऋतुपर्ण यांनी भूमिकाही केली होती. 'द लास्ट लिअर' या इंग्रजी सिनेमालाही राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. या चित्रपटांमध्ये अमिताभ बच्चन, प्रीती झिंटा, अर्जुन रामपाल आणि बिपाशा बसू यांनी भूमिका केल्या होत्या.

ऐश्वर्या रॉय, अजय देवगण ह्यांचा संयमित अभिनय आणि अनपेक्षित शेवट यामुळे अजरामर झालेल्या 'रेनकोट' या चित्रपटांमुळे ऋतुपर्ण घोष हे नाव गाजले. 'रेनकोट'ला अनेक पुरस्कार मिळाले. स्त्रियांचे समलिंगी संबंध त्यांच्या पटकथामध्ये वारंवार येत राहिले. गे, लेस्बियन यांना समाजामध्ये मिळणाऱ्या वागणुकीबद्दलही त्यांनी अनेकवेळा जाहीर मते मांडली. प्रचंड मेक-अप आणि स्त्रियांसारखा पेहराव यामुळे ऋतुपर्ण यांच्यावर टीकेची झोड उठली. तरीही कलेशी इमान राखून ते दर्जेदार चित्रपटांची निर्मिती करत गेले. त्यांच्या चित्रपटातील व्यक्तिरेखा या उत्कट होत्या, निर्मोही होत्या. त्यांच्या चित्रपटांना प्रचंड प्रेक्षक लाभला नाही. मात्र, त्यांनी चित्रचौकटीमधून मांडलेली भावनांची आंदोलने रसिकांच्या कायम लक्षात राहणारी ठरली.

- **श्रावण मोडक**

अभ्यासू पत्रकार, लेखक, भाषांतरकार श्रावण पद्माकर मोडक (वय ४५) यांचे नुकतेच मुंबईत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे आई, दोन बहिणी असा परिवार आहे. मोडक मूळचे बेळगावचे. त्यांनी १९८७ मध्ये कोल्हापूर सकाळमधून उपसंपादक म्हणून कारकीर्दीस प्रारंभ केला. मोडक हे समाजाच्या प्रश्नाशी समरूप होऊन लेखन करीत. 'नर्मदा बचाओ आंदोलना' च्या संपर्कात ते आले आणि त्या आंदोलनाचाच एक भाग होऊन गेले. विविध जनआंदोलनांचा राष्ट्रीय पातळीवर समन्वय करण्याच्या प्रक्रियेत ते सहभागी होते. विविध दैनिकांत पत्रकारिता करतानाही त्यांनी ठसा उमटविला. ते थेट प्रश्नांना भिडत. विज्ञानापासून इतिहासापर्यंत त्यांना विविध विषयांत रस होता. वाचन चौफेर होते. इंग्रजीतील साहित्याचा त्यांनी मराठीत अनुवाद केला. 'तिढा' ही त्यांची कादंबरी प्रसिद्ध आहे. 'शाश्वत विकास' या न्यासाचे ते विश्वस्त होते. मोडक यांच्यासारखा संवेदनशील पत्रकार-कार्यकर्ता अल्पवयात जाणे चटका लावणारे आहे.

- **'चिंटू'चे निर्माते प्रभाकर वाडेकर यांचे निधन**



आपल्या मिस्किलपणामुळे सर्वांनाच प्रिय वाटणाऱ्या लोभसवाण्या 'चिंटू'चे निर्माते आणि रंगभूमीवरील हरहुन्नरी कलावंत प्रभाकर वाडेकर (वय ५६) यांचे मेंदूतील रक्तस्त्रावामुळे १५ जून रोजी निधन झाले. मुतखड्याच्या त्रासामुळे रुग्णालयात दाखल झालेल्या वाडेकर यांना अर्धांगवायूचा झटका आला. मेंदूत प्रमाणापेक्षा रक्तस्त्रावही झाला. त्यांच्या मागे पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे.

मिस्किल स्वभाव आणि उत्तम विनोदबुद्धी असलेल्या वाडेकर यांचे शालेय शिक्षण नूतन मराठी विद्यालयात, तर महाविद्यालयीन शिक्षण बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात झाले. शाळेत असल्यापासून त्यांना नाटकांची आवड होती. १९७२ ते ७७ दरम्यान त्यांनी 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धेत भाग घेतला. या एकांकिकांत 'अर्थ काय या बेंबीच्या विश्वचक्रात', 'मंथन', 'ओंडका' यांचा समावेश होता. वाडेकर हे अनंत कान्हो यांना गुरुस्थानी मानत. त्यांच्या 'ड्रॉपर्स' या संस्थेमार्फत त्यांनी 'कोसळतो आज इथे देव्हारा अर्थात, मेलो मेलो मेलो' हे नाटक सादर केले. त्यात सुहास कुलकर्णी यांच्यासोबत प्रभावीपणे भूमिकाही केली. 'दूरदर्शन'वर गाजलेल्या 'इथे नांदतो बाळू' या मालिकेत वाडेकरांनी बाळूची भूमिका केली होती. पुढे 'सिनेमा सिनेमा' आणि 'नट' नावाच्या नाटकात प्रमुख भूमिका केल्या. 'गंमत-जंमत' या एकाच नाटकात अनेक भूमिका रंगवल्या. 'म्हातारीचा काळ' हे नाटकही त्यांनी लिहिले. 'खवय्येगिरी' या नावानेच त्यांचे खुसखुशीत स्तंभलेखनही प्रसिद्ध झाले. जाहिरात संस्थेत काम करताना वाडेकर आणि चारुहास पंडित यांना 'चिंटू' या 'कार्टून' मालिकेची कल्पना सुचली. मराठी वर्तमानपत्रात गाजलेली ही पहिलीच हास्यचित्रमालिका ठरली. 'सकाळ'मध्ये २१ नोव्हेंबर १९९१ पासून ही मालिका सुरू झाली. आपल्या खट्याळ स्वभावातून वाचकांनी सकाळ हसरी, आनंदी करणाऱ्या 'चिंटू'चा हा प्रवास गेल्या २२ वर्षांपासून अखंडपणे चालू होता. या चित्रमालिकेचा आधार घेत 'चिंटू' हा चित्रपटही रसिकांसमोर आला. त्याचे मुलांनी भरघोस स्वागत केले. चिंटू २ हा भागही नुकताच प्रदर्शित झाला.

- **डॉ. श्रीधर राजगुरू यांचे निधन**

'थिएटर ॲकेडमी' या आंतरराष्ट्रीय कीर्तिप्राप्त नाट्यसंस्थेचे व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यकर्ते डॉ. श्रीधर राजगुरू (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने ता. ११ जून रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा व सून असा

परिवार आहे. पुण्याच्या नौरोसजी वाडिया महाविद्यालयामधून क्रीडासंचालक पदावरून ते निवृत्त झाले होते. प्रयोगशील मराठी रंगभूमी व मराठी बालकुमार साहित्य संस्था या दोहोंच्या जडणघडणीतील त्यांचे योगदान मोलाचे होते.

प्रा. भालबा केळकर, वासुदेव पाळंदे, डॉ. श्रीराम लागू अशा दिग्गजांबरोबर प्रोग्रेसिव्ह ड्रॅमिटिक असोसिएशन (पीडीए) या हौशी नाट्यसंस्थेतून त्यांनी आपले काम सुरू केले. 'घाशीराम कोतवाल' या नाटकासंबंधीच्या वादातून 'पीडीए'मधून फुटून जन्माला आलेल्या 'थिएटर ॲकिडमी' या संस्थेच्या व्यवस्थापनाची धुरा त्यांनी स्वीकारली. 'घाशीराम कोतवाल', 'महानिर्वाण', 'तीन पैंशाचा तमाशा', 'बेगम बर्वे', 'पडघम' या गाजलेल्या नाटकांची निर्मिती व व्यवस्थापन सूत्रे त्यांनी सांभाळली. 'शिशुरंजन' ही बालनाट्यसंस्थाही त्यांनी चालवली.

**• डी. वीणा मुझुमदार**

विचार आणि कृती, अभ्यास आणि आंदोलन, तत्त्वज्ञान आणि वास्तवाचे भान यांचा मिलाफ साधणाऱ्या डॉ. वीणा मुझुमदार यांचे नुकतेच निधन झाले. त्यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात उभ्या राहिलेल्या स्त्रीवादी चळवळीच्या त्या प्रणेत्याच बनल्या. भारतीय महिलांच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारने नेमलेल्या पहिल्या समितीच्या त्या सचिव होत्या. या समितीने १९७४ साली 'समतेच्या दिशेने' (Towards Equality) या शीर्षकाचा जो अहवाल सादर केला, त्याने देशातील स्त्रियांबद्दलच्या भल्याभल्यांच्या समजुतींना सुरूंग लावला. स्वत:च्या पायावर उभे करायचे असेल तर आरक्षण दिले पाहिजे, असे प्रतिपादन पहिल्यांदा या अहवालात केले गेले आणि त्यानंतर तब्बल ३६ वर्षांनी महिला आरक्षणाचे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. कोलकात्यातील मध्यमवर्गात जनमलेल्या परंतु उदारमतवादी वातावरणात वाढलेल्या, चळवळींचे वारे अंगावर घेतलेल्या डॉ. वीणा मुझुमदार ऑक्सफर्डच्या पदवीधर आणि डॉक्टरेटच्या मानकरी होत्या. त्यांनी पाटणा विद्यापीठात प्राध्यापकीपासून नोकरीला सुरुवात केली, शिक्षकांच्या संघटनेत प्रवेश केला. पुढे विद्यापीठ अनुदान आयोगात या शिक्षणाधिकारी म्हणून रुजू झाल्या. प. बंगालमधील जंगल खात्याच्या जुलुमांना बळी पडलेल्या आदिवासी स्त्रियांना संघटित करून त्यांनी आंदोलन केले. त्यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चच्या 'स्त्री विकास अभ्यास केंद्रा'ची स्थापना (१९८०) या केंद्राच्या त्या संस्थापक संचालक होत्या. तेथून त्या १९९१ साली निवृत्त झाल्या. स्त्रियांच्या समतेच्या लढ्यातील बिनीची शिलेदार म्हणून त्यांची आठवण कायम राहील.

**• वरदा प्रकाशनचे ह. अ. भावे यांचे निधन**

दुर्मिळ साहित्य प्रकाशित करून मराठी वाचकांची गरज भागवणारे 'वरदा

प्रकाशन'चे हनुमंत अनंत ऊर्फ ह. अ. भावे (वय ८१) यांचे अल्प आजाराने १८ जून रोजी निधन झाले. पाटबंधारे विभागात काम करत असलेल्या भावे यांना प्रकाशनाच्या क्षेत्रात काहीतरी करण्याची इच्छा होती. त्यासाठी धुळ्याहून ते पुण्यात आले. त्यांनी स्वेट मॉर्टेन या ब्रिटिश लेखकाच्या बऱ्याच पुस्तकांचे अनुवाद करून ते प्रकाशित केले. तसेच रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील आठवणी', न्या. महादेव गोविंद रानडे चरित्र, 'कौटिल्याचे अर्थशास्त्र', इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे 'महिकावतीची बखर' या दुर्मिळ पुस्तकांसह राजारामशास्त्री भागवत आणि दुर्गा भागवत यांचे साहित्यही त्यांनी प्रकाशित केले. वा. गो. आपटे संपादित 'शब्दरत्नाकर' हा मराठी शब्दकोश आणि 'महाराष्ट्र शब्दकोश' प्रकाशित करून त्यांनी कोशवाङ्मयामध्ये भर घातली. शास्त्रज्ञ थॉमस एडिसन, अभियांत्रिकी, चित्रकला अशा विषयांवरही त्यांनी लेखन केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

- **डॉ. शोभना गोखले यांचे निधन**

पुराभिलेख आणि नाणकशास्त्र या विषयांत संशोधन आणि लेखन करणाऱ्या तज्ज्ञ डॉ. शोभना गोखले (वय ८५) यांचे दीर्घ आजाराने २२ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यामागे मुलगा, मुलगी, आणि नातवंडे असा परिवार आहे.

शोभनाताई या मूळच्या सांगलीच्या. अमरावती येथे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले. पत्रकार ल. ना. गोखले यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या पुण्यात आल्या. पीएच. डी. संपादन केल्यांनतर त्या १९६० मध्ये डेक्कन कॉलेज येथे लिपिशास्त्रज्ञ व व्याख्यात्या म्हणून रुजू झाल्या. शोभनाताईनी संस्कृत, इतिहास विषयांच्या अभ्यासाला नवी दिशा दिली. ठिकठिकाणी पायी फिरून त्यांनी शिलालेखांचा शोध घेत दुर्मिळ माहिती संकलित केली. १९७४ मध्ये त्यांनी कान्हेरी येथील २६ शिलालेख शोधून काढले. त्यांचे १५० शोधनिबंध आणि पुराभिलेखविद्या, भारतीय संस्कृतिवैभव यांसह दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, भारतीय इतिहास संशोधन मंडळ आणि अखिल भारतीय नाणकशास्त्र परिषद यांच्या त्या सदस्य होत्या. रांजणगावजवळ दुसऱ्या-तिसऱ्या शतकातील नाणी सापडली. या नाण्यांचा त्यांनी अभ्यास केला. वाशिमजवळ शिलालेख, जुन्नर येथे मिळालेल्या सातवाहनकालीन नाण्यांचे वाचन केले. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील लेखाचे पुनर्वसन करीत त्यांनी नवा सिद्धांत मांडला.

■■■

# बालनगरी

## कासवदादा झाडावर चढतात



**त्या**दिवशी एका कासवदादाला केळ्यांचा एक घड मिळाला. तो घड आपल्या टणक पाठीवर ठेवून तो घराकडे निघाला. उकाडा खूपच होता अन् तशात रस्ताही धुळीने भरलेला. अगदी तडफड चालली होती त्याच्या जिवाची!

रस्त्याच्या कडेला एक झाड होते. त्यावर एक माकड उड्या मारत होते. कासवाच्या पाठीवरचा तो केळ्यांचा घड बघून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याने आवाज दिला.

“कासवदादा, अहो कासवदादा!”

“काय रे हुप् हुप् माकडा?”

“कासवदादा, काय पिवळीधमक केळी आहेत ही! मला द्या ना दोन-चार. खूप भूक लागलीय हो. आज पांचशे उड्या मारल्या, या फांदीवरून त्या फांदीवर अशा. सगळ्यात जास्त. पहिला नंबर लागला माझा. पण त्यामुळे पोटात कावळे ओरडायला लागले आहेत. मग देता ना थोडी केळी!”

कासवदादा आपला सरळमार्गी प्राणी. धोपट मार्ग सोडू नको हा त्याचा बाणा.

“कशाला रे उड्याबिड्या मारतोस एवढ्या? धडपडशील अन् घेशील हातपाय मोडून.” तो म्हणाला.

“खरंच की दादा.” माकड डोळे मिचकावून म्हणाला, “तुम्ही उड्या मारायला लागलात तर खरंच मोडायचे हो हातपाय! तुम्ही आपले नाकासमोर चालावे अन् तेही गोगलगायीसारखे हळू हळू!”

“तर तर! हुप्या, माझ्या चालण्याला नावं ठेवतोस होय. उर्मट लेकाचा! तरी बरं, तो एवढा चपळ ससा; त्याला शर्यतीत मागं टाकलं होतं! ते साऱ्या माणसांना माहीत आहे. वडीलधाऱ्यांशी जरा मर्यादा राखून बोलत जा, सांगून ठेवतो.” कासवदादा रागाने लाल झाला होता. पाठ काय धाडधाड् वरखाली होत होती त्याची! पण कासवदादाची सरबत्ती काही थांबेना.

“भिकारी कुठला! म्हणे काय पिवळीधमक केळी आहेत हो! मला द्या ना दोनचार! खूप भूक लागलीय मला. वारे वा! आयतोबा आहेस नुसता. लोकांकडे भीक मागायला लाज कशी वाटत नाही रे लालतोंड्या? काही काम का नाही करीत त्यापेक्षा?”

बिचारे माकड! हा एवढासा कासव; तो खाऊन खाऊन किती केळी खाणार? तेवढा मोठा घड त्याला काय कामाला येणार? असा विचार करून आपण दोन-चार केळी मागितली तर ही असली कडू बोलणी खावी लागली. त्याचे तोंड इवलेसे झाले! रागही आला त्याला. पण

स्वत:ला सावरून तो म्हणाला,

"काम न करायला काय झालं? तुम्ही देता काही काम?"

"माझ्याकडे काही काम नाही तुझ्यासाठी! अन् असतं तरी तुला कामावर ठेवलं नसतं मी! तुझ्यासारख्या आयतोबाला कोण कामावर ठेवील! आळशी कुठला...!"

"हे बघा कासवदादा," माकड म्हणाला. "तुम्ही माझ्यापेक्षा जास्त पावसाळे बघितले. तुम्ही काही बोलला तरी मी ऐकून घेईन. पण आळशी मात्र म्हणू नका मला. मघाशीच सांगितलं ना की, पांचशे उड्या मारून पहिला नंबर मिळविला म्हणून."

आणि अधिक लाडीगोडीच्या आवाजात त्याने विचारले,

"पण दादा, खरोखरच दोन-चार केळी जास्त नाहीत का तुमच्याकडे! खूप भूक लागलीय हो! तुम्ही घरी जाईपर्यंत यातली निम्मीअर्धी केळी खराब होऊन जातील."

"खराब झाली तरी चालतील मला. उकिरड्यावर फेकून देईन मी; पण तुला देणार नाही."

माकडाच्या लक्षात आले की कासवदादा सरळपणे केळी देणार नाही. काहीतरी वेगळी करामतच येथे केली पाहिजे आणि मग विषय बदलून त्याने म्हटले, "दादा दादा, सूर्य डोक्यावर आलाय अन् उकाडा हा मी म्हणतोय. तुम्ही दमला असाल ना! पण इथं झाडाच्या या फांद्यांवर कसं गार गार आहे सारं! अहाहा! खाली रस्त्यावर राहून इथली मजा कळायची नाही तुम्हाला. उत्तरेकडे पहा ना; कसा लांबवर निळा निळाभोर समुद्र उन्हात चकाकतो आहे. अन् त्यातली ती बोट किती झकास आहे हो! तिच्यावरचे तिरंगी निशाण तर अशा डौलानं फडफडत आहे की, स्वत: डोळ्यानंच बघायला हवं!"

ते ऐकताच कासवाला वाटले की आपणही बघायला हवे ते सुंदर दृश्य.

"अन् बरं का हो कासवदादा," माकड दक्षिणेकडे पाहून म्हणाला, "या दक्षिणेला फार मोठं शहर आहे! एकेक इमारत अगदी आकाशाला

भिडलीय्. त्यातला तो राजवाडा! वा! काय त्याचा कळस आहे, सोन्याचा आहे, सोन्याचा! काय त्याचं तेज आहे! नजर ठरत नाही.''

कासव अगदी आशाळभूतपणे वर पाहू लागला.

''अन् इकडे या उगवतीला किनई लांबलचक दरीखोरी पसरली आहेत. त्यातली हिरवीगार शेतं वाऱ्याच्या झुळकांबरोबर जणू नाच करताहेत. काय वैभव आहे निसर्गाचं!''

कासवाच्या जीवाला चैन पडेना. उंच उडी मारावी अन् हे सगळे बघावे असे त्याला वाटू लागले.

''अन् मावळतीचा डोंगर तर किती उंच आहे. त्या शिखरावर रुपेरी चंदेरी ढग किती गोळा झाले आहेत, ओ हो! तो धबधबा काय प्रचंड वेगाने खाली कोसळतो आहे!''

कासव आपल्या बुटक्या पायावर उभा राहून डोळे विस्फारून माकडाकडे बघत म्हणाला, ''अरे मित्रा, खरंच इतकं सुंदर दृश्य दिसते झाडावरून? मला येईल झाडावर चढायला? शिकवितोस का तू मला?''

''वा! का नाही? बोलूनचालून तुम्ही कासवदादा, तुम्हाला तर शिकवायलाच हवं झाडावर चढायला.''

''मग कर सुरुवात,'' कासवदादाने आपल्या पाठीवरचा केळ्यांचा घड तेथेच झाडाखाली ठेवला. झाडाच्या बुंध्याकडे तो जाऊ लागला.

''पण कासवदादा,'' माकडाने म्हटले. ''शिकविण्याची फी मला द्यावी लागेल बरं का! फार नाही, फक्त सहा केळी घेऊन तुम्हाला अगदी वरच्या फांदीपर्यंत चढायला शिकवीन.''

''सहा केळी! अर्धा डझन!'' कासव आश्चर्यचकित होऊन म्हणाला, ''ही फी म्हणजे भयंकरच आहे.''

''बरं दादा, चार केळी द्या. तुम्हांला म्हणून सवलत देतो.''

''नाही बुवा. आपल्याला नाही ही फी परवडत.''

''बरं. दोन केळी द्या.''

''हे बघ, एक केळ देईन मी तुला. अन् तेही मी जे देईन ते घ्यावं

लागेल, आहे तयारी?''

''फारच चिकट आहा तुम्ही कासवदादा... मात्र तुम्हाला इतकी सवलत दिली हे इतर कुणाला सांगू नका. हं, नाहीतर आमचे बाकीचे विद्यार्थीही फीबाबत अशीच कुरकुर करायला लागायचे, अन् आमच्या पोटावर पाय यायचा!''

मग कासवाने त्या घडांतून एक केळे तोडून काढले. ते माकडाने घेतले अन् तोंडात टाकले. थू थू... कच्चेच केळ होते ते! नसते खाल्ले तरी बरे झाले असते असे त्याला वाटले.

''काय कासवदादा, झाली तयारी?''

''होय.''

''मग माझ्या शेपटाचे टोक धरा तुमच्या तोंडात.'' माकडाने आज्ञा दिली, ''अन् जेव्हा मी वर चढायला सुरुवात करीन तेव्हा तुमच्या पायाची नखं झाडाच्या सालीत खोचत जा. आपण चालतो आहोत असं समजून पायाची हालचाल करायला मात्र विसरायचं नाही हो.''

माकड झाडावर चढू लागला. कासवाने त्याचे शेपूट धरलेले होतेच. अर्ध्या वाटेवर गेल्यावर माकड खेकसून म्हणाला, ''अहो, जरा गच्च पकडा की! काय वजन आहे तुमचं! माझं शेपूट उपटून काढणार आहात काय? बापरे!''

कासवाने काहीच उत्तर दिले नाही, तोंड उघडल्याबरोबर खाली कोसळायची भीती होतीच.

अखेर एकदाचे ते पोचले झाडाच्या शेंड्यावर! तेथील कावळ्याच्या घरट्यात माकडाने आपल्या ह्या विद्यार्थ्याला बसवले.

कासवदादा इकडे तिकडे बराच वेळ पहात राहिला. माकडाने वर्णन केल्याप्रमाणे त्याला समुद्रांतील बोटीवरचे फडफडणारे तिरंगी निशाण, शहरातील राजवाड्याचा झगमगणारा सोन्याचा कळस; दऱ्याखोऱ्यांत पसरलेली हिरवीगार भातशेते, प्रचंड वेगाने खाली कोसळणारा धबधबा वगैरे दृश्ये दिसली की नाही कुणास ठाऊक, पण थोड्याच वेळात कासवाने म्हटले, ''बस्स. खूप बघून झालं. आता मला खाली उतरायचं

आहे.'' पण काहीच उत्तर मिळाले नाही.

त्याने आजूबाजूला बघितले; पण माकडाचा कुठे पत्ता नाही! झाडाच्या बुंध्याकडे त्याची नजर गेली, तेव्हा मात्र रागाने भडका उडाला त्याचा.

खाली केळ्याच्या घडाशेजारी माकड बसलेला होता.

''अरे ए, लालतोंड्या, चल वर ये अन् मला खाली कसं उतरायचं ते शिकव.''

''कासवदादा, आपल्या गुरूशी कसं वागावं हे देखील तुम्हाला कळत नाही. आईबापांनी मुळीच वळण लावलेलं दिसत नाही





**४ थी आवृत्ती**

# पूर्वसंध्या

**शान्ता ज. शेळके**

**किंमत : ९०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

'गोंदण', 'अनोळख', 'जन्मजान्हवी' या कवितासंग्रहांनंतर शान्ताबाईंचा

'पूर्वसंध्या' हा नवा कवितासंग्रह रसिकांसमोर येत आहे. मराठी कवितेच्या पूर्वपरंपरेशी असलेले आपले नाते जपत असतानाच शान्ताबाईंनी नव्या कवितेशीही सुजाण रसिकपणाने अनुबंध जोडला आणि तिच्यातली स्वत:ला भावलेली वैशिष्ट्ये आत्मसात केली. भाषेची नवी वळणे, आशयसंपृक्तता, वेगळी प्रतिमासृष्टी हे सारे त्यांच्या कवितेने स्वत:त मुरवून घेतले, पण हे जुने-नवे काव्यसंस्कार घेतानाही त्यांची कविता ही पुन्हा त्यांचीच राहिली. साधी, सरळ, सहजपणे आपले मनोगत व्यक्त करणारी आणि रसिकांशी मोकळ्या जिव्हाळ्याने बोलणारी...

तुम्हाला!''

''ए, तोंड बंद कर. झाडावर चढायला शिकवण्याबद्दल फी दिलीय मी तुला!''

''मग मी कुठं नाही म्हणतोय?'' हसत हसत माकडाने म्हटले, ''तुम्हाला झाडावर चढायला शिकविण्याचं आपलं ठरलं होतं. झाडावरून उतरण्याबद्दल आपलं काही एक ठरलेलं नाही. ते दुसऱ्या धड्यात आहे.''

कासवाला भयंकर संताप आला. पण करतो काय बिचारा? झाडावरून उडी मारायची तर नाकतोंड फुटायची भीती! शेवटी केविलवाणे तोंड करून तो म्हणाला, ''बरं, हा दुसरा धडा शिकवायला काय फी घेणार रे तू?''

''एक डझन केळी.''

''डझन! ही काय फी झाली?''

''मग अर्धा डझन.''

''तरीही खूप होते ही फी!''

''मग तीन केळी तरी देशील?''

''नाही.'' कासव म्हणाला, ''दोन केळी देईन पाहिजे तर! अन् तीही मी देईन ती घ्यायला हवीत.''

''ठीक आहे.'' माकडाने म्हटले. थोड्या वेळाने तो ओरडला.

''नीचे कूद दो.'' (खाली उडी मारा).

मग माकडाने तो घडच्या घड घेतला. हसत हसत एकेक केळ तोंडात टाकत तो निघून गेला.

कासवाला हा धडा महागातच पडला असावा.

आमच्या कल्पनेप्रमाणे कासवदादा अजून झाडावरच असावा.

(लेखक - आर्थर मीकर, अनुवाद - शंकर सारडा)

■■■

# ओळखा पाहू



**‘कोण होईल मराठी करोडपती’
या कार्यक्रमाचे सूत्रधार**

विजेत्यास कोणत्याही पुस्तकाच्या खरेदीवर
आकर्षक सवलत देण्यात येईल.
ही सवलत फक्त एका खरेदीसाठी राहील.

आपली उत्तरे दिनांक १५ ऑगस्ट २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल सप्टेंबर १३ च्या अंकात जाहीर होईल.

## ‘मे’ अंकातील ‘ओळखा पाहू’चे उत्तर

तेलुगू भाषेतील ज्ञानपीठ पुरस्काराचे तिसरे मानकरी - डॉ. रावुरी भारद्वाज

ओळखा पाहू स्पर्धेचे विजेते - **संपतराव मारणे** -
सरीता एलिगन्स, फ्लॅट नं. ६०५, पु. ल. देशपांडे उद्यानासमोर,
सिंहगड रोड, पुणे. ४११०३०

## ‘मे’ अंकातील ‘चित्रकोडे’चे उत्तर

१) चौंडकं २) चकाट्या ३) बेंडबाजा ४) अॅज आय सी - स्त्रियांचे सक्षमीकरण ५) अर्थाच्या शोधात ६) आमेन ७) मृत्युंजय ८) डोंगरी ते दुबई ९) कोल्ड स्टील

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत

| एक वर्षाला | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| २०% | २५% | ३०% |

**१** वर्षाची वर्गणी रु १५०/-

**३** वर्षांची वर्गणी रु ३५०/-

**५** वर्षांची वर्गणी रु ५००/-

**३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तके भेट!**

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**






३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी'** आणि **'घड्याळातली कोकिळा आणि गडबड गोष्टी'** -निर्मला मोने
ही प्रत्येकी ३० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-






५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'** - गायत्री सेवक व **'चला जाणून घेऊ या चक्रं आणि नाडी'** - सुभाष जोशी
ही प्रत्येकी ४० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-

भेट पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 July 2013

# आगामी




'हुबेहूब' नक्कल करणाऱ्या बबनचे वास्तविक आयुष्यही
नकलेसारखेच झाले...
पोटाची खळगी भरण्यासाठी स्वार्थी माणसाने
देवालाही 'घाम' फोडायला लावला...
स्वत:च्या जीवापेक्षाही मुक्या जनावरांवर जीवापाड
प्रेम करणारा तात्या म्हातारा...
'तगई'साठी पैसे खाणाऱ्या प्रत्येक माणसाला
जन्मभराची अद्दल घडविणारा अण्णा भागवत...
'जेवणवेळ' झाली की, लिंबाखाली बसणाऱ्या आबामुळे
कितीतरी चांगल्या गोष्टी घडल्या आणि
वाईट गोष्टी टळल्याही...
केस कोणती अन् कशीही असू दे; दिगुअण्णा 'साक्षीदार' असले की,
निकाल लागलाच म्हणून समजा...

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.